नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी
१९८५

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

ऑगस्ट-सप्टेंबर १९७५

श्रावण-भाद्रपद शके १८९६

संपादक डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर

कार्यकारी संपादक वसंत खेरडीकर

मूल्य दोन रुपये वर्ष ३१ अंक ५-६

तत्कालीन सामाजिक समस्यांची समर्थ जाण जपणारे, केतकरी शैलीचे कादंबरीकार,

कै. बाळकृष्ण संतुराम गडकरी

अंधत्वामुळे सरकारी सेवेतून लौकरच निवृत्त व्हावे लागले तरी अखेरचा निश्वास सोडीपर्यंत आपल्या सामाजिक चिंतनाने, जनतेची अमोल सेवा साहित्यनिर्मिती द्वारा अव्याहत करणारे, कै. बा. सं. गडकरी, १० डिसेंबर १९७४ ला वयाच्या ९२ व्या वर्षी निवर्तले. अवघ्या एकोणविशीत "मनोरमा" अर्थात् "सुधारणेचा मध्यकाळ", ही खळबळजनक कादंबरी लिहून या गडकऱ्यांनीहि एक विक्रमच केला. ही सामाजिक कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हा समाज खडबडला, साहित्याला नवी सामाजिक जाण आली आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांचे चाळे वर्णिलेले, म्हणून सरकारची झोप उडाली ! ती कादंबरी तेव्हा जप्त झाली ! कै. गडकरी स्वतःला हरीभाऊ आपटेंचे शिष्य म्हणवीत. वैधव्यव्याकुळ वनिता, पुर्नविवाहोत्सुक बालविधवा व समाज सुधारणांच्या कल्पनांनी वाहवलेली विदग्ध तरुणी असल्या त्रिविध स्त्रीरुपांचे चित्रण करून सामाजिक, शासकीय व साहित्यिक स्वरुपाच्या त्रिविध क्षेत्रात, त्रिविक्रमी पाऊल टाकणारा हा वैदर्भीय साहित्यिक 'विचारसम्राट' म्हणून गाजला. १० कादंबऱ्या, ३ नाटके व २ प्रहसने त्यांनी लिहिली. ज्ञानकोशकार डॉ. केतकरांचे सहकार्य त्यांना सतत लाभले. नाथमाधव या गाजलेल्या कादंबरीकाराला पुढे आणणाऱ्या "महाराष्ट्र वाग्विलास" मासिकाचे श्री गडकऱ्यांनी अनेक वर्षे संपादन केले. प्रचलित मराठी शुद्धलेखनाच्या नियमातील विसंगती दाखवून ती घालविण्यासाठी उतारवयात त्यांनी "व्याकरणादर्श" लिहिला ! एक नाटककार गडकरी सुविख्यात आहेतच. मराठी साहित्य क्षेत्रातील हे 'द्वितीय' कादंबरीकार गडकरीहि 'अद्वितीयच' होत ! विदर्भ साहित्य संघ व तमाम रसिकातर्फे या थोर साहित्यिकाला विनम्र अभिवादन !

— संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर * कार्यकारी संपादक वसंत खेरडीकर

संपादक–मंडळ : डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, प्रा. सुरेश म. डोळके, प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. म. शं. वाबगावकर, प्रा. भी. रा. जहागीरदार, प्रा. यशवंत मनोहर.

निवड–उपसमित्यांचे सदस्य

कविता : प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. या. मु. पाठक, प्रा. सौ. उषा लिमये, श्री. मनोहर चिंतामणि वझे * **समीक्षा व ग्रंथपरीक्षण :** प्रा. म. शं. वाबगावकर, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. भा. श्री. परांजपे * **संशोधन :** डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, प्रा. सुरेश म. डोळके, डॉ. ना. कृ. शनवारे, प्रा. म. रा. जोशी, प्रा. म. ना. लोही, * **ललित लेखन :** प्रा. यशवंत मनोहर, प्रा. सौ. शकुंतला खोत, प्रा. तारा शास्त्री, प्रा. भी. रा. जहागीरदार.

अनुक्रमणिका

जनाबाई आणि मीराबाई शारदा मधुकर देशपांडे १०३, आणि अर्थ आकार घेतो ना. कृ शनवारे : १०६, 'पंढरपूर चौऱ्यांशी'चा शिलालेख–नामचर्चेवर नवा प्रकाश : म. शं. वाबगावकर १०९, भारत, भारतीय भाषा आणि हिंदी श्याम सोनारे ११२, वहिणाईचे भावविश्व–एक उकल विमल भालेराव ११७, शामराजाच्या आख्यानकाव्याचा नामनिर्देश वि. बा. प्रभुदेशाई १२१, :: कविता– गर्द झाडीत शिरण्यापूर्वी प्रफुल्ल चौधरी; १२४, फक्त निवेदन सु. म. तडकोडकर १२४, तू थांब जरा मी येते रे उषा लिमये १२४, मिरुग : रंजना विगम १२४, श्रावण : कृष्णा चौधरी १२५, बिलोरी वासंती इनामदार १२५, दुभंगली वाट दे. शि. दुधलकर १२५, डोळ्यातील कवितेच्या कालिंदी जळात उ. रा. गिरी १२५, अपाराच्या पाराखालो ! नारायण रा. पेडणेकर १२६, तिथेच तर नीळकंठ महाजन १२६, फळ शिरीष गोपाळ देशपांडे १२६, बेवारशी : वा. रा. सोनार १२६, लोटून जातं निलेपण सुशील पगारीया १२६, पोकळतो मी : फुलसिंग परदेशी १२७, अनामिका विजया जहागिरदार १२७, उन्हाचे दिवे सुधाकर नेर्लेकर १२७ :: पाण्यातली वर्तुळं मुरलीधर कुळकर्णी १२८, शांतवन आशा दामले १३३, कॉन्शस सुनील जोग : १३६, पतीचा स्त्रीधनावरील अधिकार संध्यादेव १३७.

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर–१२.
मुद्रक : श्री. वि. गंधे, प्रदीप मुद्रणालय, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – १०.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जनाबाई आणि मीराबाई

शारदा मधुकर देशपांडे

जनाबाई महाराष्ट्राची आणि मीराबाई राजस्थानची. पण दोघीही महाराष्ट्राला जितक्या परिचित तितक्याच प्रिय आहेत. मराठी माणूस 'जनी म्हणे....' हे जितक्या आपुलकीनं म्हणतो त्याच आपुलकीनं 'मीरा कहे....' हेही आळवतो. दोघीही मोठ्या भागवद्भक्त म्हणून ख्यातनाम. आपल्या आर्त भक्तीनं परमेश्वराप्रत पोहोचलेल्या पण दोघींचे लौकिक जीवन भिन्न. व्यक्तिमत्त्वाची तऱ्हा आगळी नि भक्तीचा आविष्कारही वेगळा.

जनाबाई ही एक बाळपणी पोरकी झालेली आणि नामदेवांच्या घरी कावाडकष्ट करणारी दासी होती. 'विदुराच्या कुळीं' च्या आपण, तेव्हा परमेश्वर आपला अंगिकार कसा करणार अशा तऱ्हेची शंका प्रथम तिच्या मनात आलीही. पण जनाबाई पूर्णत्वाने जगली. स्त्रीत्वाच्या जाणिवेने किंवा दास्यत्वाच्या व्यथेने तिला कधीच दुबळे केले नाही. तिचे मन सैरावैरा कधी भटकलेच नाही. नामदेवांच्या घरी जनाबाईला सर्व प्रकारची कामे करावी लागत. रानात गोवऱ्या वेचायला जावे लागे, धुणे धुवावे लागे, भांडी घासावी लागत. पायलीच्या पायली दळण दळावे लागे. देहभान विसरून नामदेवांच्या संसारातील सर्व कष्ट जनाबाईला उपसावे लागत. त्यांच्या घरी माणसेही खूप. क्षणाची उसंत तिला मिळत नसे. अशा स्थितीत विठ्ठलाची ती सावळी मूर्ती तिच्या हृदयात विंबली. विठ्ठलप्रेमाने ती व्याकुळ होत होती. पण हा व्याकुळपणा तिच्या स्वभावतच होता. संसारात हात पोळला म्हणून ती ईश्वराला हाक मारीत होती असे नव्हे. तिने सावरावा किंवा सोडून द्यावा असा तिला संसार नव्हता. त्यामुळे त्याला विटून ती देवाला शरण गेली नव्हती. देवाच्या प्रेमानेच ती देवाकडे गेली आहे. मीराबाई जशी अगदी बाळपणीच श्रीकृष्णाच्या प्रेमात पडली तशी जनाबाईही. दोघींच्या या सर्वान्तःकरणाच्या भावनेत साम्य आहे. फरक आहे तो आविष्काराच्या रीतीत, सलगीच्या पद्धतीत आणि लौकिक जीवनाच्या स्थितीत.

मीराबाईचे लौकिक जीवन जनाबाईच्या अगदी विरुद्ध टोकाचे. जनाबाई एक दासी होती. मीराबाई एक राणी होती. स्वतः मीराबाईच्या काव्यातील अंतर्गत पुराव्यावरून मीराबाईच्या चरित्राची रूपरेषा आखता येते. तिचा जन्म राठोड वंशात झाला. बालपणीच ती श्रीकृष्णाच्या प्रेमात पडली. तिचे लग्न सिसोदिया वंशातील राणाशी झाले. पण ती संसारात रमू शकली नाही. एवढे मोठे ऐश्वर्य मिळूनही त्याचा उपभोग घेण्याची इच्छा मीराबाईला झाली नाही. संसाराविषयी पूर्ण उदास होऊन, लोकलाज सोडून ती श्रीकृष्णाच्या भक्तीत रंगून गेली. त्याचा परिणाम तिच्या पतीवर विपरीत झाला. अपमान, द्वेष व लोकलाज यांनी भारावून जाऊन त्याने मीराबाईला मारून टाकण्याचे प्रयत्न केले. विषाचा प्याला त्यानेच तिच्याकडे पाठवला. मीराबाईने ते श्रीकृष्णाचे चरणामृत म्हणून प्राशन केले. त्याचा प्रभाव तिच्यावर पडला नाही. राणाने परत एक विषारी साप पेटाऱ्यातून पाठविला. पण मीराबाईने पेटारा उघडताच त्याचा सुगंधी पुष्पहार बनला. संसारात मीराबाईचा छळ झाला पण लोकलाज गिरिधरभक्तीत सोडून दिलेल्या मीराबाईची कृष्णभक्ति अधिक तेजस्वी झाली व तिने संसाराकडे पूर्ण पाठ फिरविली. तिने मेवाड सोडले. ती गोकुळ वृंदावनास गेली व शेवटी द्वारकेस जाऊन तिने श्रीकृष्णाजवळ अक्षय वास केला.

मीराबाईच्या श्रीकृष्ण प्रेमापेक्षा जनाबाईचे विठ्ठल प्रेम वेगळे आहे. एक दैवी पण शरीरधारी प्रियकर म्हणून मीराबाई गिरिधर गोपालावर प्रेम करते. प्रेमाच्या तिच्या आविष्कारात पार्थिव भावनांपासून दूर पळण्याचा प्रयत्न नाही. श्रीकृष्णाने तिच्याकडे बघून हसावे, तिला शरीरस्पर्शाचे सुख द्यावे याविषयीची उत्कटता ती लपवीत नाही. प्रेमिकेची वल्लभेची भूमिका ती अगदी आर्तपणाने, सहजपणाने घेते इतकेच नव्हे तर पूर्वजन्मी आपण व्रज गोपी होतो परंतु आपल्या हातून अपराध घडला म्हणून आपल्याला हा जन्म घ्यावा लागला अशी भावना ती व्यक्त करते. म्हणून या जन्मी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्यावर अधिकार एकट्या श्रीकृष्णाचाच "मैं तो गिरीधरके घर जाऊ, गिरिधर म्हारो साचो प्रीतम, देखत रुप लुभाऊ" अशी आपल्या मनाची अवस्था ती पतीजवळ व्यक्त करते. गिरीधर आपला पति असल्याची कबुली तिने अनेकवार दिली आहे.

जनाबाईच्या विठ्ठलप्रीतीत ही भावना कधीच उभरली नाही. मीराबाईचे प्रेम जसे उघडउघड वल्लभेचे प्रेम आहे तसे जनाबाईचं प्रेम हे उघडउघड अतीन्द्रिय स्वरुपाचे, शुद्ध स्वरुपाचे आहे. मीराबाईप्रमाणे कृष्णाच्या दैवी स्वरुपाचा विसर तिलाही पडला आहे. देव तर तिला रोजच्या सर्व कामात हरप्रकारे मदत करी. तिने झाडलोट केली की देवाने केर भरावा, ती रानात शेण्या वेचायला गेली कीं देव तिला मदत करी. देवाने जनाबाईसाठी रांजण भरावे. सडासारवण करावे, धुणे धुवावे. जनाबाईबरोबर दळण दळायचा तर त्याला छंदच. 'माझ्याबरोबर येऊ नकोस' म्हणून ती तोडून बोलली तरी 'या चाकराने, मदतीसाठी तिच्यामागे जावेच. आजपर्यंत अनेक भक्तांनी हरप्रकारे देवाची सेवा केली असेल आणि क्वचित तो त्यांच्यासाठी धावून आला असेल. पण देवाकडून नित्य सेवा घेणारी एकटी जनाबाईच ! 'जनीचिया बोले करी नित्य काम' अशी प्रेमाची हुकमत ती देवावर गाजवी. आपली देवाविषयीची भक्ति वर्णन करण्यापेक्षा देवाची तिच्याविषयीची प्रीतीच तिने अधिक तल्लीनतेने वर्णिली आहे. 'एके दिवशी जनाबाई न्हायला बसली, विसाणासाठी थंड पाणी घ्यायला विसरली. देव धावून आला. 'शीतल पाणी घे गं' म्हणाला, इतकेच काय 'एके प्रसंगी जनाबाई डोईने गांजली. देव धावत आला. तिचा बुचडा सोडला. उवा मारल्या. केस विंचरुन मोकळे केले. दासी जनीच्या प्रेमाखातर देवाने वाटेल ती कामे केली आहेत. जनाबाई-च्या या अभंगात कोणता पारमार्थिक अर्थ असेल तो पारमार्थिकांनी पहावा. प्रस्तुतच्या संदर्भात एवढे खरे ी मीराबाईप्रमाणे जनाबाईलाही देवाच्या दैवी स्व-
ष्मरण ठेवावे लागले नाही. देवाने देहधारी
पाण्य। त्यांचे लाड पुरविले आहेत. मीरेने
१३६, पतीचा आपली स्त्रीसहजप्रेमभावना व्यक्त
———ारिकता लपविली नाही. त्यासाठी
या मा। तिने केला नाही. जनाबाईच्या
दरातील कागद अ ाचा, अस्पष्टतेचा भाग फारच
———का थोडा. भक्ताकरिता

प्रकाशक : गो.

मुद्रक : श्री. वि

ईश्वराने धूसर अवकाशातून यावे, मानवी रुप धारण करावे आणि मानवी भक्ताचे लाड पुरवावेत ही मागणी अनेक भक्तांनी केली आहे. मात्र जनाबाई आणि मीराबाई यांच्या उत्कटतेने हा अनुभव प्रत्यक्षच घेतला आहे. मीराबाईचे वल्लभेचे प्रेम अगदी स्पष्ट अन् उघड आहे. ती गीरधरासाठी साज शृंगार करते त्याला जेवू घालण्यासाठी नाना तऱ्हेचे पदार्थ करते. इतकेच काय कृष्णकन्हैया घराच्या आसपास फिरताना मीरेने पाहिला आणि ती लज्जेने चूर झाली. 'आवत मोरी गलियनमे गिरधारी। मैं तो छुप गयी लाजकी मारी।' अशा रीतीने मीराबाईची प्रीति आहे. मीराबाईचे काव्य वाचीत असता स्त्रीत्वाच्या नाजुक, हळुवार छटा मनाला मोह घालतात. परमेश्वराची भक्ती करताना अनेक संतांनी स्वतःवर स्त्रीत्वाचा आरोप करुन घेऊन आपली भक्तीची गूढ अनिर्वचनीय भावना व्यक्त केली आहे. भक्तीची उत्कटता व्यक्त करताना लक्षणेसाठी स्त्री-पुरुषातील आसक्तीचा आधार घेतला आहे. हिंदी संत कवी कबीर तर स्वतःला 'रामकी बहुरिया' म्हणवीत. असे हे देवाशी प्रियकर प्रेयसीचे नाते आध्यात्मिकतेचे निदर्शन म्हणून मीराबाईने सर्रास एकरुपतेने वापरले आहे. जनाबाई मात्र विठ्ठलाशी हे नाते चुकूनही कधी जोडीत नाही. तिने विठ्ठलावर बालपणापासून प्रेम केले पण शेवटपर्यंत तिची भावना शुद्ध अतीन्द्रिय स्वरुपाचीच उरली. विठ्ठल तिला आलिंगन देतो, निरंतर तिच्या सहवासात राहतो. पण तिच्या प्रेमाला शरीर आसक्तीचा स्पर्शच होत नाही. 'मायबाप, बंधुवहिणी । तू बा सखा चक्रपाणी ।' अशी सर्व नाती येथे एकवटली असली तरी बहुधा जनाबाई विठ्ठलाला 'माऊली' तरी मानते किंवा प्रिय, सखी विठाबाई.' म्हणजे स्वतःच्या स्त्रीत्वाच्या भावना विसरुन तिने त्या देवावर आरोपित केल्या आहेत. तसे करण्यात सामाजिक नीतीचा अवलंब तिला करावयाचा होता असे मात्र नव्हे. तसे असते तर तिच्या विठ्ठलाविषयीच्या भावनेला वेगळे रुप आले असते. पण तसे नाही. ती पोरकी होती, बालपणीच मातृसुखाला पारखी झाली होती म्हणून आसुसल्यामुळे असे घडले असेही नाही. कारण तिच्या प्रेमात पावित्र्याबरोबर निर्हेतुकता आणि आर्ततेबरोबर उत्कटता आहे. आणि म्हणूनच विठ्ठलप्रेमाचे तिच्या आविष्कारात पार्थिव संकेतांना चिकटून राहण्याचा प्रयत्न आहे असे म्हणणे अन्यायाचे आहे. जितक्या अधिरतेने ती विठ्ठलाला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संखया' म्हणते, भावनेच्या त्याच ओलाव्याने ती त्याला 'रुक्मिणीच्या कांता' अथवा 'रुक्मिणीच्या कुंका' म्हणून संबोधिते, आणि प्रसंगी त्याला 'रुक्मिणीची आण' घालते. तिच्या प्रेमाचे स्वरुपच वेगळे आहे. ती रुक्मिणी-च्या प्रेमाचा हेवा करीत नाही आणि इतर भक्तांप्रमाणे विठुलाच्या प्रियेचा आवही आणीत नाही. तो तिचा स्वभावच नव्हे.

जनाबाईने केवळ विठुलावरच असे शरीरनिरपेक्ष प्रेम केले आणि विठुलाच्याच बाबतीत तिला शरीराहून अधिक आकर्षणाचा भाग सापडला होता असे नव्हे. ज्ञानेश्वर आणि नामदेवावरही तिची प्रीति होती. पण ती देखील वत्साची गाईवर असते तशी. किंवा सखीची सखीवर असते तशी. ती ज्ञानेश्वरांना 'आई ज्ञानाबाई' असे म्हणते. ती नामयाची जनी खरी पण, 'सखा विरळा ज्ञानेश्वर। नामयाचे जो जिव्हार' असेही म्हणते. ज्ञानेश्वर 'निः संगाचा अग्रगणी' असे म्हणून ती त्यांचेच ध्यान करते. इतकेच काय, मरुन जावे नि यांच्याच पोटी जन्माला यावे असे तिला वाटते. परमार्थ विचाराची मांत झाली असे वाटते तेव्हा ती ज्ञानेश्वरांची साक्ष काढते. नामदेवाबद्दलचे तिचे प्रेम अनुपम आहे, पण तेही त्यांनी तिला आश्रय दिला म्हणून नव्हे तर देवाला नामदेवाचा वियोग सहन होत नसे म्हणून सोपानाविषयी तर 'माझ्या जीवींच्या जीवना। हृदयी राही तू सोपान।' असे ती म्हणते. सर्वांविषयीचे तिचे प्रेम सहजस्फूर्त आहे. पोटात संयम आणि सोवळेपणा ठेऊन ती कुठेच भावनाविष्कार करीत नाही. तिचे प्रेम सहज, अनिरुद्ध आणि शरीरातीत आहे. वत्सलभावनेने ओतप्रोत भर-लेले आहे. सेवा हे तिचे व्रत आणि विरक्ती हा तिचा गुण आहे. जनाबाई कुणाची प्रिया नाही आणि कामिनी तर नाहीच नाही. स्त्रीचे आणि पुरुषाचे मन वेगळे असते, अपेक्षा भिन्न असतात असे जण ती मानीतच नाही. त्यामुळे परमार्थात डुंबत असताही स्त्रीत्वाची निंदा तिने चुकूनही केली नाही. स्त्री म्हणून आपण जन्माला आलो याचा तिला खेद होत नाही 'स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास। साधुसंतां ऐसे केले जनी।' असा दृढ विश्वास ठेवून तिने भक्ती केली. स्त्रीत्वाने तिला काचले नाही, जाचले नाही. कामवासनेचे प्राबल्यही ती जाणते पण त्या प्रभावी भावनेचे तिने समूळ उच्चाटण केले होते. प्रवृत्तीचा अंकुर जनाबाईच्या जीवनाला फुटलेलाच नव्हता.

सर्वान्तःकरणाच्या आर्ततेने परमेश्वराप्रत गेलेल्या जनाबाई आणि मीराबाई या भक्ती भावनेच्या दोन विरुद्ध आविष्काराच्या संत आहेत. मीराबाई स्त्रीम्हणू-नच देवाशी एकरुप झाली. स्त्रीत्वाच्या भावनेच्या पर-मोच्च अवस्थेत ती देवाशी रममाण झाली तर जनाबाई पुरी निष्काम होऊन, लौकिक ऐहिक भावना विसरुन 'देहातच देहाभिमानरहित' होऊन परमेश्वरात विलीन झाली. दोघींचेही मन एकरंगी, एकरसी व एकपोती आहे पण आविष्कार मात्र भिन्न आहे. लोकांना 'मीराके प्रभु' जसे सुपरिचित आहे तसं 'जनी म्हणे' हेही. या चार शब्दात दोघींच्या भक्तिमार्गाचे वैशिष्टच स्पष्ट होते. मीराबाईने प्रभुला मीराचा करुन टाकला होता. उलट जनाबाई स्वतःला 'जनी' म्हणविते. हे तिचे जन्मनाव असेल अथवा नसेलही. 'जनी' हे संस्कृत 'ज्ञानी' शब्दाचे मराठी रुपान्तर आहे आणि ते जनाबाईला सार्थ आहे. ती कधी मायेच्या भ्रांतीत गुरफटली नाही. ती तृप्त आहे. परमेश्वराविषयीच्या ज्ञानाने तिच्या जीवग्रंथी सुटल्या. देह दिव्य झाला. त्याला अमृतकळा लाभली व सर्वत्र आत्मानंद कोंदाटल्याचा अनुभव तिने याची देही घेतला म्हणून ती 'जनी' होय.

● ●

वर्गणीदारांस सूचना

युगवाणीची वार्षिक वर्गणी रु. १५ (पंधरा) आहे. वर्गणीचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंत धरण्यात येईल. मध्येच वर्गणी भरल्यास वर्गणीदारास त्या महिन्याच्या अगोदरचे अंक शिल्लक असल्यास पाठविण्यात येतील.

– कार्यकारी संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि अर्थ आकार घेतो

ना. कृ. शनवारे

'खालील कडव्याचा संदर्भासहीत अर्थ लिहा' असे प्रश्न पूर्वी विचारले जात. आजही विचारले जातात. 'रसग्रहण करा' असाही प्रश्न विचारण्याची पद्धत आहे. अलीकडच्या कवितेचा अर्थ सांगणे किंवा रसग्रहण करणे कठीण झाले आहे अशी ओरड ऐकू येते.

का कठीण झाले आहे अर्थ सांगणे ? एक म्हणजे कविता आम्हाला समजत नाही. तिचा जो भावानुभव आहे त्याच्याशी आमचा संवाद होऊ शकत नाही. याला कारण आमचा त्रुटित जीवनानुभव असू शकतो किंवा आकलन शक्तीची मर्यादाही असू शकते. लेखक ज्या पातळीवरून अनुभव नोंदवीत असतो ती आम्हाला अगम्य असते किंवा अज्ञेय असते. दुसरे असे की कवितेचा अर्थ साधारणतः सारखा असावा अशीआपली समजूत आहे. कवितेच्या कडव्याचा अर्थ दहा जणांनी दहा प्रकारचा लिहावा ही कल्पना आम्हाला पटू शकत नाही. रसग्रहणातही फार तफावत किंवा अंतर आपल्याला रूचत नाही.

जुने काव्य समजायला अगदीच सोपे होते काय ? नाही. पंडिती काव्यातील पांडित्य प्रसिद्धच आहे. श्लेष व अलंकाराची मौज समजली नाही तर ते काव्य समजणे म्हणावयाचे काय ? शिवाय ध्वनीलाही जुन्या काव्यात महत्व आहे. इथे अभ्यास आवश्यक असला तरी या जुन्या काव्यात एक प्रकारची वस्तुनिष्टा होती हे मान्य करावे लागेल.

आजच्या कवितेतही ध्वनी आहे. ध्वनी हा तर काव्याचा आत्माच आहे. पण आजच्या कवितेतील ध्वनीचे स्वरूप पूर्वीच्या कवितेतील ध्वनीच्या स्वरूपाहून भिन्न आहे. या नव्या ध्वनीचे पोषण वस्तूनिष्ठेपेक्षा आत्मनिष्ठेवरच जास्त अवलंबून आहे. कविता कवीच्या मनात एक विशिष्ट आकार घेते. ती रसिकापुढे आल्यावर तिच्या वाचनातून रसिक मनात वेगळाच आकार धारण करते. नवीन कवितेच्या बाबतीत हे दोन आकार जुळतीलच असे नाही. प्रतिमांच्या वापरातून आजच्या कवितेला संपन्न व्यक्तिमत्वाचा लाभ झाला आहे. खऱ्या अर्थाने ती नवनवोन्मेष शालिनी झाली आहे. ध्वनिकाव्यालाही मागे टाकणारी प्रतिमासृष्टी हे आजच्या कवितेचे खरे वैशिष्टच होय.

आजच्या कवितेचा आस्वाद घेताना मला दुसऱ्या कुणावर अवलंबून राहण्याची जरूर नाही. माझा अनुभव, माझे शिक्षण, वाचन मला उपयोगी पडणार आहे. पण तरी शेवटी कविता वाचताना मी—मी तिचा वाचक आहे. समोरची कविता माझ्या मनात अर्थरूपाने साकार होणार आहे. माझ्यापुरते त्या कवितेचे रसग्रहण तेच असणार आहे. असे रसग्रहण आम्हाला वाचता आले पाहिजे; करता आले पाहिजे. नवीन कवितेची आपल्याकडून हीच अपेक्षा आहे.

मी वाचलेली कविता माझ्या मनात नेहमी एकच आकार घेऊन वसत असते का ? नाही. मागचे वर्षी वाचलेली कविता व तिचा माझ्या मनातील आकृतिबंध आज पुन्हा तिचे वाचन व नवा आकृतिबंध यांत पुष्कळदा जमीन अस्मानाचे अंतर पडले असते.

'विझता विझता स्वतःला' ही नारायण सुर्वे यांची कविता मी काही वर्षापूर्वी वाचली होती. त्यावेळी ती विशेष भावली नाही. वाटले हा काहीसा खाजगी स्वरूपाचा अनुभव कवीने कवितेत मांडला आहे. पुढे कवीच्या इतरही कविता वाचण्यात आल्या. त्यांचा काव्यसंग्रह सलग वाचून काढला. तुकारामाच्या कवितेप्रमाणे नारायण सुर्वे यांची कविता खाजगी अनुभवातून वैश्विक पातळीवर आरूढ होते. हे आता लक्षात आले. 'विझता विझता स्वतःला' या कवितेचे नवे वाचन एक नवा साक्षात्कार वाटला. नव्या वाचनातही कविता मला खालून वर अशा उलटचा मार्गाने उकलत गेली. पूर्ण कविता तशी छोटी आहे. खालील प्रमाणे

"झूट बोलून आयुष्य कुणालाही सजवता येते
अशी आमंत्रणे आम्हालाही आली; नाहीच असे नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असे किती हंगाम शीळ घालीत गेले घरावरून
शब्दांनी डोळे उचलून पाहिलेच नाही, असेही नाही.
शास्त्राने दडवावा अर्थ, आम्ही फक्त टाळच कुटावे
आयुष्याचा अनुवादच करा सांगणारे खूप;
नाहीत असे नाही.
असे इमान विकत घेणारी दुकाने माडचा-माडयांवर
डोकी गहाण ठेवणारे महाभाग; नाहीत असेही नाही.
अशा बेईमान उजेडात एक वात जपून नेताना
विझता विझता स्वतःला सावरलेच नाही, असेही नाही."

कविता संपता संपता शेवटच्या कडव्यातील 'बेईमान उजेड' या प्रतिमेने लक्ष वेधून घेतले. ज्ञान व अज्ञान या संदर्भात वापरली जाणारी प्रकाश व काळोख ही भारतीय परंपरेतील फार जुनी प्रतीके आहेत.

'तमसो मा ज्योतिर्गमय' अशी आपण ईश्वराजवळ प्रार्थना करतो. हा प्रकाश बेईमान कसा होईल? उजेड या प्राकृत शब्दाची योजना मार्मिक आहे. अलीकडच्या शिक्षणातून येणारी बेईमानी आपल्या परिचयाची आहे. माणसं परंपरेची, पैशाची, सत्तेची गुलाम झालेली आपण पाहतो आहोत. बेईमान उजेड या नव्या प्रतिमेची योजना मार्मिक आहे. अंधार, उजेड, विझणे या जुन्या संकल्पनांचा आधार घेत तिने नवे वळ धरले आहे; जणू नवे स्वत्व जागवले आहे.

खालून वर, दुसऱ्या कडव्याच्या संदर्भात काही पाठभेद असल्याचे मला नंतर कळले. पुष्कळदा या पाठभेदांचे आपण नसते स्तोम माजवतो. इथे कवी हयात आहे म्हणून आपण निश्चित काय ते माहीत करून घेऊ शकतो. पण जिथे ते शक्य नाही तिथे दोनतीन वेगळ्या प्रकारांनी अर्थ लावण्यास काय हरकत असावी? जिथे अर्थ लागण्यात विक्षेपच निर्माण होत असेल तिथे गोष्ट वेगळी

माडचा-माडयांवर हा शब्द विलक्षण अर्थवाही वाटला. माडी या शब्दातून श्रीमंतीची कल्पना माझ्या मनापुढे उभी राहिली. श्रीमंती व गरिबी! फार पूर्वीपासूनचा हा सामाजिक विरोध आहे. अंधार व उजेड ही सनातन सत्ये आपण समजतो. ज्ञान व अज्ञानाच्या संदर्भात या प्रतिमांचा वापर करतो. पण तरी मानवाची सतत प्रार्थना राहिली आहे.– 'हे प्रभो, मला अंधारातून प्रकाशाकडे घेऊन चल.' अंधारावर मात करण्याचा विज्ञानाचा प्रयत्न लक्षणीय आहे. जगातून अज्ञान नाहीसे करण्याच्या प्रयत्नालाही यश लाभले आहे. श्रीमंती–गरिबी यामधील भिंती का तोडल्या जाऊ नयेत? अलीकडच्या काळात या दिशेने झालेले काही प्रयत्न लक्षणीय वाटतात. या भिंती तोडायला माडचा-माडयांवर राहणाऱ्या व्यक्तींचा विरोध होणार हे निश्चित. पैसा काय करू शकत नाही? तो माणसाची बुद्धिमत्ता विकत घेऊ शकतो. डोकी गहाण ठेवणारे महाभाग त्यांना भेटतात.

माडी या शब्दाचा अर्थ वेश्यागृह असाही होतो. इथेही डोकी गहाण टाकली जातात. पैसा व सद्सद्विवेकबुद्धी दोन्ही इथे गहाण पडतात. पैशापेक्षाही सद्सद्विवेकबुद्धी विशेष महत्वाची. ती सुटली की मग काय राहिले? सद्सद्विवेकबुद्धी म्हणजेच प्रकाश–हा प्रकाशच बेईमान झाला तर!

" सूर्य अस्ताला जाताना चिंता करतो. माझ्यामागे या लोकांना प्रकाश कोण दाखवणार! सगळे हतबुद्ध झालेले. यावेळी एक पणती समोर येते.– – –"

'शास्त्राने दडवावा अर्थ, आम्ही फक्त टाळच कुटावे' शास्त्र म्हणजे ज्ञान' प्रकाश! पण यांना म्हणे वेदांचा अधिकार नाही. प्रकाशाने अंधाराचा विटाळ मानावा तसे हे काही. भारतीय परंपरेत व धर्मशास्त्रात अशा सोवळचा ओवळचाला फार प्राधान्य मिळाले. 'टाळ कुटणे' या प्रतिमेतून हा सर्व इतिहास आपल्या मनात जागृत होतो. पण 'अनुवाद' शब्द क्षेत्र व कालाच्या मर्यादा तोडून टाकतो. परंपरे संबंधीची अंधश्रद्धा काय भारतातच आहे? आयुष्याचा अनुवादच करा सांगणारे जगभर पसरले आहेत. आज ज्याला पोथीवाद म्हणतात त्याचे स्वरूप काय आहे? खाजगी अनुभव वैश्विक पातळीवर कसा चढतो हे या ठिकाणी स्पष्ट व्हावे. शास्त्र या शब्दाचा आजचा अर्थ व्यापक आहे. धर्म हे शास्त्र आहे तसेच अर्थशास्त्र आहे. पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र हीही शास्त्रेच आहेत. नवे प्रमेय, नवा सिद्धांत मांडताना प्रत्येक शास्त्रात जुन्यांचा विरोध झाला आहे. जुनी पिढी नव्या पिढीला आयुष्याचा अनुवादच करायला सांगते. ही शोकांतिका आहे. ती एखाद्या वर्गाचीही असू शकते. पण खऱ्या अर्थाने ती मानवजातीचीच शोकांतिका आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'असे किती हंगाम शीळ घालीत गेले घरावरून
शब्दांनी डोळे उघडून पाहिलेच नाही, असेही नाही'

'शब्दांनी' हा या कडव्यातील शब्द निश्चितच आपली दृष्टी अधिक व्यापक करतो. शब्द सर्व शास्त्रांचे मूळ. ज्ञानाचे मुख्य माध्यम, ज्ञानाच्या तुलनेत अज्ञानाची पण जोपासना फार वर्षापासून होत गेली. कशासाठी झाली ही जोपासना? आपल्या घरी, आपल्या कुटुंबात हंगाम सजावा म्हणून. वैयक्तिक स्वार्थ! कुणाला तो सुटला आहे? सामाजिक विचारापेक्षा वैयक्तिक स्वार्थ हा मानवामध्ये नेहमीच प्रबळ राहिला आहे पण म्हणून शोषण विरहित सामाजिक समाजव्यवस्थेचं स्वप्न माणसानं सोडलं आहे का? स्वार्थ क्षणभर माणसाच्या मनात मोह निर्माण करतो. पण या जगात माणसं आहेत की जी या मोहावर मात करतात. हीच माणसं उद्याच्या जगाचं आशास्थान होत.

'हंगाम,' 'शीळ' हे या कडव्यातील शब्द प्रतिमारूप धारण करतात. त्यातून होणाऱ्या अर्थविस्ताराशी खेळण्यात मनाला मग आनंद वाटतो. हा अर्थविस्तार पुष्कळदा स्पष्ट असतो तर बरेचदा अस्पष्ट असतो. हा अस्पष्ट अर्थविस्तार हें ही त्या कवितेचे रसग्रहणच असते.

'झूट बोलून' या शब्दरचनेत पुरेपूर देशी वाण आहे. इथे आधुनिकता आहे. बोलण्यातील धिक्कार आहे; विरोध आहे. त्या विरोधामागील आवेश पण स्पष्ट आहे. झूट बोलणे म्हणजे खोटे बोलणे. खोटे खरे सत्य असत्य. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही' शेवटी सत्याची पताका उंच! सत्य म्हणजे ईश्वर–परमेश्वर मानवाचं अंतिम ध्येय–साध्य! सत्यं शिवं सुंदरम् ही एकाच भगवंताची रूपं. हे साध्य करणं म्हणजेच भगवंत साध्य करणं.

सत्य असत्य, खरं खोटं, चांगलं वाईट ही तशी सनातन स्वरूपाची द्वंद्वं आहेत. मानवाला ते आव्हान आहे. खोटेपणाचं आमंत्रण स्वीकारून या आव्हानाला आम्ही उत्तर देऊ शकत नाही. इथ आम्हाला मुळालाच हात घालायला हवा. स्वार्थ सोडून सामाजिकता मनी बाणायला हवी. सामाजिकतेत स्वार्थ अनुस्यूत आहे हें जाणायला हवे. भारतीय ऋषी सांगून गेले आहेत– 'अहं ब्रम्हास्मि'।

चांगली कविता अर्थाच्या दृष्टीने आपल्याला सतत खुणावीत असते. जरा मन मोकळं करून कवितेचं रसग्रहण करायला आपण शिकलं पाहिजे. अशा मोकळ्या रसग्रहणातून आपण त्या कवितेला व कवीला अधिक न्याय देऊ शकू. हे रसग्रहण आग्रही असणार नाही. ते काहीसे स्वच्छंद असेल. पण म्हणूनच ते आपल्याला व बहुधा वाचकांनाही अधिक आनंद देऊ शकेल.

● ●

साभार पोच

[दि. १६–७–७५ ते १५–९–७५ पर्यंत युगवाणीला भेट म्हणून आलेल्या पुस्तकांची पोच खाली दिली आहे.]

पुंडलिक चरित्र:– संपादक प्रा. माणिक धनमहावार मराठी विभाग, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद, पृष्ठे ८६.

संगीत सौभद्र (घटना आणि स्वरूप):– ले. श्री. व. दि. कुळकर्णी प्रकाशक श्री. स. कृ. पाध्ये, व्हिनस प्रकाशन, ३८१ अ, शनवार पेठ, पुणे ३०, मूल्य रु. ३५ पृष्ठें १४+३५९.

अमर वेल:– ले.– पु. भा. भावे, पृष्ठे १७९. मूल्य दिले नाही.

संनिचय (पूर्वार्ध):– पृष्ठे २२५, मूल्य १६ रु.
संनिचय (उत्तरार्ध):– पृष्ठे ४२२, मूल्य १६ रु.
प्रकाशकः श्री. दि. मा. धुमाळ, नागपूर प्रकाशन, नागपूर. ले.– प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडीत,

आदिमः–लेखकः– फं. मु. शिंदे, पृष्ठे ८० मूल्य ९ रु.

दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य:– ले.– फं. मु. शिंदे, पृष्ठे ४६ मूल्य ८ रु. प्रकाशक– श्री. मुरलीधर गवळी, कालचक्र प्रकाशन टिळकपथ औरंगाबाद.

सामान्यातील असामान्य:– ले. पंढरीनाथ पाटील, प्रकाशक– सौ. आशादेवी पं. पाटील, सरकारी वसाहत, बांद्रा (पूर्व) मुंबई, पृष्ठे २०४ मूल्य १० रु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'पंढरपूर चौऱ्यांशी'चा शिलालेख

- नामचर्चेवर नवा प्रकाश

म. शं. वाबगावकर

पंढरपूरचा चौऱ्यांशीचा शिलालेख यादवकालीन महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक दृष्टींनी विलक्षण महत्वाचा आहे. त्याचा पहिला निर्देश इ.स. १८८४ साली प्रसिद्ध झालेल्या सोलापूर गॅझेटियरमध्ये आढळतो.[१] या गॅझेटियरमध्ये पंढरपुर विषयीची माहिती पंढरपूरचे तेव्हाचे असिस्टंट सर्जन श्री शांताराम विनायक कंटक यांनी लिहिलेली असून तिच्यातील विठ्ठलमंदिराविषयीचा भाग पं. भगवानलाल इंद्रजी यांनी लिहिलेला आहे. त्यात सुमारे तीस ओळी मजकूर प्रस्तुत शिलालेखासंबंधी असून त्यात या लेखाला चौऱ्यांशीचा शिलालेख असे नाव पडण्याचे कारण पं. भगवानलाल इंद्रजी यांनी असे दिले आहे की या शिलेवरील सुरुवातीचा शकांक ११९४ असा असून त्यातील तिसरा ९ हा अंक वरवर पाहणाऱ्यास ८ सारखा दिसत असल्याने व शेवटचा ५ हा अंक चारासारखा दिसत असल्याने अज्ञांनी त्याचे वाचन ११८४ असे केले व त्यायोगे '८४ चा लेख' हे नाव पडले.

पुढे इतिहासाचार्य राजवाड्यांनी या शिलालेखाचे आपले सटीप व सटीक वाचन 'ग्रंथमाला' मासिकात प्रसिद्ध केले.[२] प्रस्तुत शिलालेखाला हे नाव प्राप्त होण्याची कारणमीमांसा राजवाड्यांनी पुढील प्रमाणे केली आहे. —"याला चौऱ्यांशीची शिला किंवा दगड वारकरी लोक म्हणतात. कां म्हणून शोध करता, असे कळते की, या शिलेवर वारकऱ्याने पाठ घासली असता तो चौऱ्यांशीच्या फेऱ्यातून म्हणजे चौऱ्याशी लक्ष योनीत जन्म घेण्याच्या खटाटोपातून मुक्त होतो. परंतु, ही शिला अनेक शतके विठोबाच्या आवारातील एका कोपऱ्यात लोळत पडली होती. पुढे गेल्या पाचपन्नास वर्षापूर्वी कोण्या द्रव्यदृष्टि बडव्याने तिला प्रस्तुत स्थळी आणून तिच्यावर एक देवीची मूर्ति स्थापन केली, त्या मूर्तिला चौऱ्यांशीची मूर्ति म्हणून नाव दिले, आणि जो कोणी मूर्तीची पूजा करील व शिलेवर पाठ घाशील त्याचा चौऱ्याशीचा फेरा चुकेल अशी अफवा उठविली. ती भाविक वारकऱ्यांना फारच पसंत पडली हे एक कारण झाले. दुसरे एक कारण असे देतात की या शिलालेखाच्या प्रारंभी शकाचा जो ११९५ चा आकडा आहे त्यातील ९५ अनभ्यस्त वाचकाला ८४ सारखे दिसतात. पाचाचा आकडा अर्धवट उमटल्यामुळे तो चारासारखा दिसतो व १२ व्या शतकातील नवाचा आकडा प्रस्तुतकालीन अनभ्यस्त वाचकाला सध्याच्या आठासारखा दिसतो. त्यामुळे शक ११८४ ची शिला अथवा संक्षेपाने चौऱ्यांशीची शिला असे नाव प्रचलित झाले.[३] या कारणात बराच सयुक्तिकपणा दिसतो. तिसरे एक कारण असे देतात की, या शिलेवर प्रथम चौऱ्यांशी नामांकित वर्गणीदारांची नावे खोदिली गेली. त्यावरुन चौऱ्यांशी पुण्यपुरुषांची शिला अथवा संक्षेपाने चौऱ्यांशीची शिला अशी प्रख्याति या दगडाची झाली. हेंहि कारण दुसऱ्याइतकेच, कदाचित् त्याहूनहि जास्त सयुक्तिक आहे. परंतु आठी खात्यांतील एकंदर नावे पहाता ती चौऱ्यांशीच्या दुपटीहूनही जास्त आहेत, तेव्हा हेहि कारण पूर्णपणे सयुक्तिक दिसत नाही. यापैकी सगळीहि कारणे खोटी असली, तरी सध्या या दगडाला चौऱ्यांशीचा दगड म्हणतात, हे मात्र खरे आहे व याच्या उत्पन्नावर एका ब्राह्मणाचे पोट चालते हे निर्विवाद आहे."[४]

---

१ Gazetteer of the Bombay Presidency, Vol. XX, pp. 421–422.

२ ग्रंथमाला, व. १२, अं. १, पृ. १–५५

३ राजवाड्यांनी उद्धृत केलेले मत भगवानलाल इंद्रजीचे होय हे वर दर्शविले आहेच.

४ ग्रंथमाला, व. १२ अं. १, पृ. ५०.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुढे डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी या शिलालेखाचे त्यांचे वाचन व संपादन इ. स. १९५३ मध्ये 'पुणे विद्यापीठ पत्रिके' तून प्रसिद्ध केले.[५] व त्यात आणखी पुस्ती दुरुस्ती करून 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या आपल्या ग्रंथात त्याचे पुनःसंपादन सादर केले. त्यात या शिलालेखास हे नाव कसे व केव्हा मिळाले याची चर्चा करताना डॉ. तुळपुळ्यांनी पं. भगवानलाल इंद्रजींच्या मताचे खंडन करतांना लिहिले आहे की इंद्रजींच्या मते "या शिलेवरील प्रारंभीचा शकांक ११९४ असा असून त्यातील तिसरा ९ हा आकडा वरवर पाहणारास ८ असा दिसत असल्यामुळे अज्ञांनी त्याचे वाचन ११८४ असे केले व त्यातूनच '८४ चा लेख' हे नाव सिद्ध झाले. वास्तविक पाहता ही सर्व कल्पना दिसते. कारण एक तर या सबंध लेखात ११९४ हा शकाचा आकडा कोठेहि नाही. प्रारंभीचा शकांक ११९५ असा आहे व त्यातील ९ चा आकडा ८ च्या आकड्यासारखा दिसत नाही. आणि एखाद्यास तसा दिसला तरी तो ११८५ वाचील ११८४ असे वाचणार नाही. त्यामुळे पं. इंद्रजींचे म्हणणे खरे असेल तर या लेखाचे नाव 'पंच्याऐंशीचा लेख' असे पडावयास पाहिजे होते. पण तसे ते पडलेले नाही. म्हणजे दृष्टिभ्रम हे प्रस्तुत लेखाच्या नावामागील खरे कारण नव्हे."[६]

राजवाड्यांनी दिलेले इंद्रजींचे म्हणणे मूळ स्वरुपात या लेखात आधी उद्धृत केलेले आहे. ते पाहिले म्हणजे डॉ. तुळपुळ्यांनी इंद्रजींच्या म्हणण्याची मोडतोड करून त्यातला सोयीपुरताच अंश उद्धृत करून मग त्याचे खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे असे उघड दिसते. याच मजकुरात पुढे राजवाड्यांच्या मताचे खंडन करतानाहि तुळपुळ्यांनी हाच प्रकार केलेला दिसतो. ते लिहितात— "या बाबतीत कै. राजवाडे यांची कल्पना अशी की या शिलालेखात एकूण ८४ देणगीदारांचा उल्लेख असल्याने तो 'चौऱ्यांशीचा लेख' या नावाने ओळखला जात असावा. परंतु वस्तुस्थिति तशी नाही. लेखात ८४ नव्हे, तर सुमारे दोनशे अडीचशे देणगीदारांचे उल्लेख आढळतात. अशा परिस्थितीत राजवाडे यांनी केलेली या लेखाची ही नाम मीमांसा टिकू शकत नाही."

वास्तविक पाहता खुद्द राजवाड्यांनीच "एकंदर नावे पाहता ती चौऱ्यांशीच्या दुपटीहूनहि जास्त आहेत. तेव्हा हेहिं कारण पूर्णपणे सयुक्तिक दिसत नाही. यापैकी सगळीहि कारणे खोटी असली—"असे स्वच्छ लिहून ठेविले आहे. तरीहि तुळपुळे राजवाड्यांचे म्हणणे मतलवापुरते अर्धवट उद्धृत करून त्यांच्याच युक्तिवादाने त्यांचे खंडन करण्याचा आव आणतात. या प्रकारास काय म्हणावे ? नावे ८४ च्या दुपटीहूनहि अधिक आहेत; त्यामुळे ८४ नावांवरुन या शिलेला चौऱ्यांशीचा शिलालेख हे नाव पडल्याचे म्हणता यावयाचे नाही हे खुद्द राजवाड्यांनीच आधीच स्वच्छ दाखविलेले आहे. किंबहुना, हें नाव पडण्याची दिली जाणारी ही तीनहि कारणे खोटी असल्याचेहि राजवाडे लिहितात. तरीहिं जे राजवाड्यांचे मतच नव्हे ते राजवाड्यांचे मत म्हणून डॉ. तुळपुळे अर्धवट उद्धृत करतात. म्हणजे असे की राजवाड्यांनी मांडलेला पूर्वपक्ष ते उद्धृत करतात. पण त्यावर स्वतः राजवाड्यांनीच केलेला खंडनात्मक उत्तरपक्ष ते वाचकांपुढे ठेवीत नाहीत व राजवाड्यांचाच उत्तरपक्ष स्वतःचा म्हणून राजवाड्यांविरूद्ध वापरतात हे पाहून गंमत वाटते.

या शिलालेखाला हे नाव पडण्याचे कारण डॉ. तुळपुळ्यांच्या मते पुढीलप्रमाणे आहे. डॉ. तुळपुळ्यांना पंढरपुरात विठ्ठलमंदिराच्या पश्चिम द्वारासमोरील सध्या 'वायकांची वारी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात एक अज्ञातपूर्व शिलालेख नव्यानेच उपलब्ध झाला या लेखाची शिला तेथील सार्वजनिक मुतारीला पायरीप्रमाणे वसविलेली होती. अर्थात् हे कृत्य एखाद्या अलिकडील स्थापत्य विशारदाचे असणार. मूळ शिला या कामासाठी नियोजित अर्थातच नव्हती. हा शिलालेख प्रथम डॉ. तुळपुळ्यांनीच १९५६ साली प्रसिद्ध केला.[७] 'प्राचीन मराठी कोरीव लेखांत त्यांनी, त्याच दरम्यान डॉ. मिराशी यांनी उपस्थित केलेल्या त्या संबंधीच्या शंका ध्यानात घेऊन पुनर्वाचन व पुनःसंपादन केले आहे.[८] हा लेख शके ११११ (इ. स. ११८९–

---

५ Journal of the University of Poona, Humanities, Vol. I, pp. 1–25.

६ प्राचीन मराठी कोरीव लेख. डॉ. तुळपुळे, पुणे विद्यापीठ, १९६३, पृ, १७६

७ म. सा. पत्रिका, व. ३०, अं. ११७.

८ प्रा. म. को. ले.-तुळपुळे, पुणे विद्यापीठ, १९६३, पृ. ८५–९२.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

९०) मधील असून त्यात पंढरपुरात विठ्ठलाचा "लान-मडु" म्हणजे लहान देऊळ स्थापन केल्याचा उल्लेख आहे. याचा अर्थ तो लेख शके ११११ मध्ये विठ्ठल मंदिराची स्थापना झाली त्या प्रसंगीचा आहे. या घटनेनंतर बरोबर ८४ वर्षांनी, म्हणजे शके ११९५ मध्ये त्या देवळाचा जीर्णोद्धार किंवा विस्तार करण्यात येऊन त्या निमित्ताने ज्याला आज ८४ चा शिलालेख म्हणण्यात येते ते शिलालिखित खोदण्यात आले. म्हणजे एका अर्थाने मूळच्या विठ्ठलमंदिराचा तो ८४ वा वाढदिवसच साजरा झाला व त्या प्रसंगाचे स्मारक म्हणून जी कोरीव शिला उभारण्यात आली ती साहजिकच ८४ ची शिला या नावाने ओळखली जाऊ लागली. शके ११९५ ते ११९९ या कालात निरनिराळ्या भक्तांकडून मिळालेल्या देणग्या या शिलेवर कोरल्या जात होत्या. पुढे कालांतराने देवळाच्या वाढीचा हा इतिहास जरी विस्मृतीत जमा झाला तरी त्याचे द्योतक असे 'चौऱ्यांशीची शिला किंवा लेख' हे नाव मात्र चालू राहिले, किंबहुना कायम झाले. डॉ. तुळपुळे यांचीही या शिलालेखाबाबतची नाममीमांसा देखील संदेहास्पद आहे. कारण 'लान मडु' च्या लेखातील शकाचे ११११ हे वाचन संदेहास्पद आहे. खुद्द तुळपुळ्यांनीच ते १११० असे आधी वाचले होते.[9] व ते वाचन चुकीचे असल्याचे स्वतः तुळपुळेच आता सांगत आहेत.[10] कारण त्यांच्याच हे लक्षात आले असावे की शके १११० हे वाचन प्रमाण धरले तर शके ११९५ पर्यंत वर्षे ८४ ऐवजी ८५ होतात ! खरे म्हणजे त्या लेखात फक्त आरंभीचे दोनच अंक स्पष्ट आहेत व ते तसे असल्याने त्यावर आधारलेली चौऱ्यांशीच्या शिलालेखाची डॉ. तुळपुळे प्रणीत नाममीमांसा देखील त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर 'टिकू शकत नाही.'

आमच्या मते प्रस्तुत शिलालेखाच्या या नावाची संभाव्य उकल पुढीलप्रमाणे शोधता येईल. देवगिरी यादवांच्या पूर्ववंशातील सेउणदेशाच्या ऐरमदेवाचा नगर जिल्ह्यातील अस्वी येथील शके १०२० मध्ये दिलेला संस्कृत ताम्रपट प्रसिद्ध आहे. त्यात संगमनेर चौऱ्यांशीमधील कोंकणे गाव ब्राह्मणांस दान दिल्याचा उल्लेख आहे तो असा '...कूकलपंडिताय यमनियमस्वाध्यायध्यानानुष्ठानरताय त्रिशत्‌ब्राह्मणसहिताय सेउणदेशे श्रीनगरसार्द्धसहस्त्रद्वयसंबद्धसंगमनेरचतुरा सीतिमध्ये कोंकणेग्रामः पादप्रक्षालनं कृत्वा मौलीकृत हस्तद्वयेन परमश्रेयार्थम् शासनयुक्तो दत्तः ।[11] " यात 'श्रीनगर अडीच हजार' (श्रीनगरसार्द्धद्वयसंबंध) म्हणजे अडीच हजार गावांच्या शासनविभागाचे प्रमुख ठाणे. जसे विदर्भात तळेगाव दशसहस्त्र या पुरातन नावाचे प्रसिद्ध प्राचीन गाव आजहि आहे ! या 'श्रीनगर अडीच हजारा'चा पोटविभाग 'संगमनेर चतुरशीति' म्हणजे ८४ खेड्यांच्या पोट परगण्याचे मुख्य ठाणे संगमनेर. या पोट परगण्यातले जे कोकणगाव (आजहि कोकणगावाचा तालुका संगमनेर व जिल्हा अहमदनगर आहे !) ते दिले ! यावरून पंढरपूर चौऱ्यांशी' म्हणजे तो शिलालेख खोदला गेला त्या काळात (शके ११९५ ते ११९९) म्हणजेच यादवकालात आजूबाजूच्या ८४ गावांच्या विभागाचे प्रमुख ठाणे पंढरपूर असावे व 'पंढरपूर चौऱ्यांशीचा शिलालेख 'या मूळ नावातील पंढरपूर कालांतराने लुप्त होऊन केवळ 'चौऱ्यांशीचा शिलालेख' एवढेच शिल्लक राहिले असावे. लेखाच्या पुसून गेलेल्या भागात 'पंढरपूर चौऱ्यांशी' अशा प्रदेशस्थलवाचक अर्थाचा निर्देश असण्याचीहि शक्यता नाकारता येत नाही.

● ●

---

९ पंढरपूर विठ्ठलमंदिराच्या इतिहासातील एक अज्ञात दुवा–तुळपुळे म. सा. पत्रिका, व. ३०, अं. ११७

१० प्रा. म. को. ले.–तुळपुळे, पुणे विद्यापीठ, १९६३, पा. ९१.

११ EI, XXXVI, pp. 249-56; JBBRAS (NS) III, pp. 189-9; QBISM, III, pp. 1-5.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारत, भारतीय भाषा आणि हिंदी

श्याम सोनारे

"आमची शिक्षण पद्धती चालू राहिली तर अवघ्या तीस वर्षाच्या काळात बंगालमध्ये एक व्यक्ती सुद्धा मूर्तिपूजक राहणार नाही असा मला विश्वास वाटतो." बंगाल प्रांतात प्रथमच १८३६ साली इंग्रजी शिक्षणाच्या शाळा उघडल्यावर आपल्या मातोश्रींना पाठविलेल्या पत्रात लॉर्ड मेकॉले यांनी हे अशुभ भविष्य वर्तविले होते. आज ते किती टक्के खरे उतरले आहे हे जाणून घेण्याची आणि त्यासाठी आणखी एखादा नवा ज्योतिषि शोधण्याची आता गरज उरलेली नाही. बंगालच्या प्राचीन आणि अर्वाचीन अशा दोन्ही प्रतिमा डोळ्यापुढे उभ्या केल्यावरोबर इंग्रजीने घडविलेल्या चमत्काराचा साक्षात्कार होवू शकतो. व्यापक प्रमाणावर घडून आलेले मध्यंतर स्पष्टपणे दिसून येते. अख्या बंगालची मति इंग्रजीने किती नि कशी फिरविली ते कळून येते. एका हाताने अमृतपान व दुसऱ्या हाताने विषपान करविणारी आंग्ल-नीति उमगते. स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचे वारे समाज जीवनात वाहविणारी व युगानुकूल आशा आकांक्षा जागविणारी इंग्रजी भाषा आमच्या उज्वल सांस्कृतिक मूल्याचे दफन करण्याच्या कामातहि मुळीच मागे राहिली नाही हे लक्षात आले म्हणजे तिला मायाविनी दुष्ट राक्षसीण म्हणावे की देशोद्धारक वरदायिनी देवी म्हणावे असा प्रश्न पडतो. इंग्रजी शिक्षणाने आपण आपला डाव साधू शकू अशी मेकॉले साहेबांना खात्री वाटत होती. तिचे पुरेपूर प्रत्यंतर आज आलेले आहे. आता केवळ आचार व विचारच नव्हेत तर इंग्रजीने आमचे मन व हृदयही वदलवून टाकले आहे.

भाषा एखाद्या मानव समाजाला कशी घडवित असते, कशी वदलवित असते हे या उदाहरणावरून सहज पटावे. आईचे दूध बालकाला बाळसेदार बनविते, मानवत असते. त्याचा सहज विकास साधित असते. परंतु आईच्या दुधाला आचवलेल्या लेकरांची स्थीति केविलवाणी होऊन जाते, दयनीय होवून जाते त्यांची शारीरिक व मानसिक वाढ खुंटल्याखेरिज राहत नाही. चेहऱ्यावरचा अकृत्रिम तजेला ओसरल्याशिवाय राहत नाही. वर दुधावरच्या पोरक्या बालकाप्रमाणेच अत्यंत दयनीय परिस्थिती भारतीय जनतेची इंग्रजीवर अवलंबून राहिल्यामुळे झाली. ज्या प्रांतामध्ये इंग्रजांनी आधी पाय ठेवले, सत्ता मिळविली, तेथे इंग्रजीचे प्रस्थ विशेष वाढले. तेथील लोक स्वार्थवश इंग्रजीच्या आहारी गेले. त्यांनी तिची भक्तीभावाने पूजा चालविली. मातृभाषेकडे पाठ फिरविली. त्यांची जीवने त्याच प्रमाणात भारतीयत्वाच्या आदर्शापासून ढळलेली दिसून येतात. कारण या दिशेने त्यांची वाढच खुंटली होती. मातृभाषेचे दुग्धपानच त्यांनी थांवविले होते. तिला फुटलेला पान्हा त्यांनी अव्हेरिला होता. म्हणूनच त्यांची मनोभूमिका आज बदललेली दिसते. मातृभाषांच्या अथवा संस्कृत किंवा हिंदी यांच्या सारख्या देशभाषांच्या स्वदेशीय सत्वशील दुग्धपानावर भारताच्या काही भागातील ज्या जनमनांचे पोषण झाले त्यांची घडण ज्या पद्धतीची व प्रकारची झालेली दिसून येते त्यापेक्षा आंग्लभाषांच्या परदेशीय व विजातीय स्तनपानावर आणि संस्कारावर पोसलेली भारतीय मने स्पष्टपणे निराळ्या प्रकाराने व पद्धतीने विकसित झालेली दिसून येतात. भाषा आणि समाज यांचे संबंध असे अन्योन्यपोषक असतात. त्यांचा विकास अन्योन्याश्रित असतो. भाषेचा समाज जीवनावर पक्का ठसा उमटतो. व्यापक प्रभाव पडतो. भाषा व समाज यांचे पारस्परिक अवलंबन आदिकालापासून आधुनिक काळापर्यंत असेच अव्याहतपणे चालत आले आहे. मानव समाज ज्या क्रमाने व ज्या प्रमाणात विकसित झाला त्या क्रमाने व त्या प्रमाणातच त्याच्या भाषेचा विकास झाला. मानव समाज ज्या क्रमाने व ज्या प्रमाणात समृद्ध होत गेला त्या क्रमाने व त्या प्रमाणातच त्याची भाषासुद्धा समृद्ध होत गेली. समाजाचा व भाषेचा विकास असा समांतर होत असतो. समाजाच्या भरभराटीमध्ये भाषेचा व भाषेच्या भरभराटीमध्ये समाजाचा मोठा वाटा असतो. या विकास क्रमात जेव्हा मानव समाज बदलतो तेव्हा भाषेमध्येसुद्धा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुणात्मक बदल घडून येत असतो. या परिवर्तनाचे स्वरूप पुष्कळदा आंशिक असते. परंतु कधी कधी पूर्व रूपांतरच घडून येत असते जुनी भाषा नवे रुप धारण करित असते. क्वचित नावही बदलविते. हल्ली जे देश जेवढे प्रगत पुढारलेले दिसतात त्यांची भाषा सुद्धा तेवढीच प्रगत व पुढारलेली असते. देशकाल परिस्थितीचे प्रतिबिंब वाङमयात पडलेले असते. आणि ते प्रतिबिंब सुस्पष्टपणे दाखविणाऱ्या नव्या शैलीची व शब्दरूपांची भर भाषेत नित्य पडत असते. या दृष्टीकोनातून भारत व हिन्दी म्हणजे राष्ट्र आणि राष्ट्रभाषा यांचा एकत्र विचार होणे इष्ट वाटते.

देशातील जनतेचे परिपूर्ण सहकार्य लाभल्याशिवाय प्रगतीचा वेग वाढू शकत नाही. देशाची सर्वांगीण प्रगति विशिष्ट वेगाने घडवून आणण्यासाठी जनतेचे जे संपूर्ण सहकार्य अपेक्षित असते ते मिळण्याकरिता जनता एका विचाराची व एका मनाची असावी लागते. जनतेला असे एका विचाराचे व एका मनाचे बनविण्याचे कार्य राष्ट्रभाषा करीत असते.

"एक हृदय हो भारत जननी" हेच तिचे मुख्य ध्येय असते. देशातील निरनिराळ्या भागातील निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे प्रश्न असतात. निरनिराळी सुखदुःखे व भाव-भावना असतात. निरनिराळे विचार व समजुती असतात. निरनिराळ्या श्रद्धा व समस्या असतात. निरनिराळ्या आशा व अपेक्षा असतात. या सर्व निरनिराळ्या गोष्टी त्यांच्या निरनिराळ्या प्रांतिक भाषामध्ये प्रगट झाल्या म्हणजे एकच गोंधळ माजतो. गैरसमज वाढतात. देशात दुहीची बीजे पेरली जातात. संघर्षाचे पीक वाढू लागते. राष्ट्रीय एकात्मता भंगते. राष्ट्रैक्य धोक्यात येते. प्रगतीच्या मार्गात अडथळे येतात. राष्ट्रोन्नतीचा वेग मंदावतो. हे अधःपतन टाळण्यासाठी व एकोपा राखण्यासाठी एका प्रातिनिधीक देशभाषेची गरज असते. एका सामान्यभाषेमुळे स्वतःपुरता वेगळा विचार करण्याच्या संकुचितपणाला आळा बसतो. निराळेपणाची भावना नष्ट होते. कोतेपणाच्या भिंती कोलमडतात. जनता एका विचाराची व एका दिलाची बनण्यास मदत होते. देशाची प्रगति झपाट्याने होऊ लागते. घरगुती व प्रांतिक गैरसोयी गौण वाटू लागतात. देशापुढील प्रश्नांचे व समस्यांचे महत्व अधिक वाटू लागते.

भारतासारख्या विशाल देशात विचारविनिमयाद्वारा सलोखा व मतैक्य राखण्यासाठी अशाच एका संपर्क भाषेची आवश्यकता निर्माण होणार असल्याचे भारतीय नेत्यांच्या व विद्वानांच्या लक्षात आले होते. हिन्दीचे नाव घेतले जावू लागले होते. राष्ट्रभाषापद हिन्दीला बहाल करण्यात यावे अशी मागणी आधी हिन्दी भाषिकांनी केली नव्हती हे येथे लक्षात घेतले पाहिजे. लॉर्ड मेकॉले यांच्या कृपेने ज्या बंगाल प्रांतात देशी भाषांना इंग्रजीचा सामुरवास सोसावा लागत होता त्या बंगाल प्रांतातील जाणत्या जननायकांनीच या बाबतीत प्रथम पुढाकार घेतला होता. एका राष्ट्रभाषेची आवश्यकता प्रतिपादन केली होती. हिन्दी भाषेचे अनन्यसाधारण महत्व ओळखले होते. अन्य भारतीय भाषांचे प्रतिनिधित्व करण्याची योग्यता एकट्या हिंदीच्या ठिकाणी असल्याबद्दलचा विश्वास व्यक्त केला होता. तिला राष्ट्रभाषा पदावर बसविण्यात यावे असा आग्रह धरला होता. भारतीय नवोत्थानाचे अग्रदूत आणि नूतन राष्ट्रभावनेचे जनक राजा राम मोहन रॉय यांनी इ. स. १८२६ पासूनच "बंगदूत" नावाच्या साप्ताहिकातून हिन्दीचा प्रचार चालविला होता. बाबू केशवचंद्र सेन, जस्टिस शारदाचरण मित्र आणि डॉ. सुनीति कुमार चॅटर्जी यांनी हिन्दीला भारतीय ऐक्याचे व राष्ट्रीयतेचे प्रतीक मानले होते. गुजरायमधल्या महात्मा गांधींनी राष्ट्रभाषेचा मान हिन्दीलाच दिला होता.

राष्ट्रभाषा विषयक वरील सूचनांचे देशात सर्वत्र स्वागत होत असतानाच राष्ट्रभाषा पदावर आरूढ होण्याचे बाबतीत स्पर्धा सुरू झाली. हिन्दी, उर्दू आणि हिन्दुस्थानी यांच्यापैकी हा मान कोणत्या एका भाषेला द्यावा यावद्दलचा व्यर्थ वादविवाद सुरू झाला. हिन्दी भाषांच्या समर्थकांमध्ये चांगलेच रण माजले. याचा फायदा घेऊन दक्षिणेत हिन्दी विरोधी शक्ती एकत्र आल्या. त्यांनी हिन्दीच्या विरूद्ध बंडाचा झेंडा उभारला. मोठे आंदोलन उभे केले. भारतीय संघराज्यातून फुटून निघण्याची भाषाही क्वचित बोलली गेली. श्री कामराज यांच्या विरूद्ध निवडणूक लढवून विजय मिळविणारे सुप्रसिद्ध विद्यार्थी नेते श्रीनिवासन यांनी तर एकदा "हिन्दीचा आणि भारताचा कोणताही संबंध नाही. ज्या भारतात हिन्दी असेल तो भारत तामिळभाषिकांना नको आहे. हिन्दी ही भारतीय ऐक्याच्या मार्गातील धोंड होय" असे द्वेषपूर्ण विचार व्यक्त केले होते. या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जहाल उद्गारावरून हिन्दी विरोधाने केवढे उग्र स्वरूप धारण केले होते ते स्पष्ट होते. वर्षोगणती प्रश्न तसाच चिघळत ठेवण्याचाच हा दुष्परिणाम म्हटला पाहिजे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तत्परतेने भाषा प्रश्न सोडविण्यात आला असता तर भाषावादाचा विषवृक्ष वाढला नसता. फुटिरतेची प्रवृत्ति अशी वेलगाम झाली नसती. तुर्कस्थानच्या कमाल पाशाचे तेजस्वी उदाहरण येथे आठवते. तुर्कस्थानचा राज्यकारभार कमाल पाशाचे हाती आल्यावर असाच भाषाप्रश्न उपस्थित झाला असता त्याने तो चुटकीसरशी सोडवून दाखविला. संबंधित अधिकाऱ्यांना समक्ष बोलावून आधी त्याने त्यांना असे विचारले की तुर्की भाषेतून राज्यकारभार सुरू करायला किती वर्षे लागतील ? कमीत कमी दहा वर्षे तरी लागतीलच असे अधिकाऱ्यांचे मत पडले. ते नुसते ऐकून घेवून त्याच क्षणी कमाल पाशाने हुकुम सोडला की, ती दहा वर्षे उद्या सकाळी दहा वाजता पूर्ण होतात असे समजा आणी सर्व कारभार दहावाजल्यानंतर तुर्कीतून सुरू करा. कमालपाशाचा हा आदेश शिरोधार्य मानला गेला. भाषा प्रश्न निकालात निघाला. भाषाविषयक वादविवाद गुंडाळण्यात आले. या अफलातून वादविवादामध्ये खर्च होणारी वुद्धीमत्ता व राष्ट्रशक्ती सत्कारणी लागली. कमालपाशाचे हे उदाहरण खरोखरच उद्वोधक नाही काय ?

हिन्दी विषयीचा द्वेषभाव व विरोध आता कमी झाला आहे. संपर्क भाषा या नात्याने तिचे महत्व सर्वांना उमगले आहे. हिन्दीने राजसत्तेचे बोट धरून आपला विकास साधला नाही. तिच्या निष्ठावंत चाहत्यांनी व सेवकांनीच तिला हे सन्मान्य स्थान मिळवून दिले आहे. वारंवार आघात-प्रत्याघात सोसून, पदोपदी अडचणींना तोंड देवून आणि दुःखीविरोधकांची मर्जी पुरेपूर सांभाळून तिने आपली आव राखली आहे. पत मिळविली आहे. स्थान निर्माण केले आहे. यश व दरारा वाढविलेला आहे. आज भारतातील सर्व भाषामध्ये समृद्ध आणि सामर्थ्यसंपन्न भाषा म्हणून लौकिक प्राप्त केला आहे. केवळ शंभर दीडशे वर्षांच्या अत्यल्प काळात ही शक्ती संजीवनी तिने संपादन केली आहे. बहुसंख्य जनतेचे लाभलेले निरपेक्ष प्रेम हेच तिच्या या उज्वल यशाचे रहस्य होय. विविध राजकीय हेतूंनी व स्वार्थांनी भारतीय पुढाऱ्यामध्ये जरी हिन्दी विषयी मतभेद व भांडणे राहिली, प्रादेशिक उद्दीप्टांनी व मातृभाषाभिमानाने प्रेरित होऊन अनेक विद्वानांनी जरी तिची घोर उपेक्षा चालविली तरी भारतातील सर्व साधारण जनतेत हिन्दी विषयीची खास आस्था वसत होती हे निश्चित. येथील जनता तिला आत्मसात करण्यासाठी उत्सुक व व्याकुळ होउन बसली होती. जनमनातील ही विशेष आस्था व ओढ हेच तिच्या प्रसाराचे मुख्य कारण होय. तिच्या या अपराजेय शक्तीमुळेच विरोधकांच्या मनातही विरोध करतानाच तिच्या विषयीचे प्रेम दाटून आले. तिचा तिरस्कार निषेध करताकरताच तिचे ते चाहते व ज्ञाते होऊन बसले. पाहता पाहता अख्खा भारत देश तिच्या पावन गंगौघात वाहून गेला. दक्षिण भारत सुद्धा आता तिने जिंकून घेतला आहे.

संस्कृत मधला "स" ध्वनी फारसी मध्ये "ह" होत असतो. फारसी भाषा बोलणाऱ्या लोकांचा संबंध जेव्हा सिंधू प्रदेशांशी आला तेव्हा ते "सिंधू" ला "हिंदू" आणि "सिंधी" ला हिन्दी म्हणू लागले. या दृष्टीने पाहिले असता हिन्दी हा शब्द फारसीकडून मिळालेली देणगी होय. उत्तर भारतातील मध्यदेशीय हिंदूंच्या आधुनिक साहित्यिक भाषेला हिन्दी हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. परंतु हिंद (भारत) देशात बोलल्या जाणाऱ्या कोणत्याही भाषेला हिंदी म्हणता येऊ शकते. आणखी एका अर्थाने हिंदी म्हणजे हिंद देशाची भाषा. संपूर्ण भारत वर्षाची जी भाषा ती हिंदी ठरते. तिच्या नावामध्ये सुद्धा अशी सार्वदेशिकता व्यापून आहे. राष्ट्रभाषेच्या अंगी हा गुण असण्याला विशेष महत्व आहे. इतर भाषांची नावेसुद्धा त्यांचे संकुचित कार्यक्षेत्र व प्रादेशिक मर्यादा स्पष्ट करणारी आहेत. उदाहरणार्थ—मराठी, बंगाली, गुजराथी इत्यादी भाषांचा प्रपंच अनुक्रमे महाराष्ट्र, बंगाल व गुजराथ या प्रांतापुरताच सीमित असल्याची साक्ष त्यांच्या नावावरूनच पटते. या एकेका भाषेचे निराळे व सीमित साहित्य "भारतीय साहित्य" या संज्ञेला पात्र ठरू शकत नाही. मात्र हिंदी ही संपूर्ण भारताचे व इतर भारतीय भाषांचे ही प्रतिनिधीत्व करते. ती सर्व भाषिकांशी संबंध प्रस्थापित करू शकते. देशात ऐक्यभाव रूजवू शकते. विचारांचे व भावनांचे सामंजस्य घडवू शकते. अंगच्या समन्वय शक्तीने समाज जीवन एकरस बनवू शकते.

जगाच्या कानाकोपऱ्यात इंग्रजीचा दरारा व मानमरातब वाढलेला असला तरी भारतात मात्र तिचा तो रूबाब राहिलेला नाही. येथे हिंदीच्या तुलनेने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इंग्रजीचा प्रभाव नगण्य आहे. सुमारे दोनशे वर्षापासून इंग्रजी शिक्षणाची प्रचंड प्रमाणावर सतत देवाण घेवाण चालविली आहे तरी यश मात्र नाममात्रच आले आहे. भारत वर्षातील दोन टक्के लोकांनाच फक्त ती वश होऊ शकली आहे. आणि राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काही या दोन टक्के शिक्षीतांचे व मूठभर धनिकांचे कृत्रिम ऐक्य नव्हे. राष्ट्रीय ऐक्यासाठी अशिक्षितांची, खेडूतांची, शेतावर खपणाऱ्यांची आणि कारखान्यामध्ये राबणाऱ्यांचीही गरज असते. या सर्व समाज घटकांना कळणारी व उपयुक्त ठरणारी भाषाच राष्ट्रभाषा होऊ शकते. अशी राष्ट्रैक्य साधणारी भाषा हिंदी शिवाय दुसरी नाही. म्हणूनच इंग्रजीला दोनशे वर्षाच्या सुदीर्घ कालखंडात जे साधले नाही ते हिंदीने अल्पकाळात साधून दाखविले आहे.

हिंदीला सार्वजनिक व सार्वदेशिक महत्व प्राप्त करून दिले मुसलमान राज्यकर्त्यांनी. हिंदू जुने ते सोने मानणारे. जुन्या परंपरेचे अभिमानी. ते जुन्याभाषा उराशी कवटाळून बसले. आपआपल्या प्रादेशिक भाषांच्या गौरव गायनात दंग झाले. त्यांच्या विषयीच्या अतिरेकी अभिमानाने अंध झाले. या प्रवृत्तीमुळे त्यांच्या प्रादेशिक भाषांचा विकास खोळंबून गेला. डबक्यात साचलेल्या पाण्यासारखी त्यांची स्थिती झाली. तेव्हा मुसलमान राज्यकर्त्यांनी दिल्ली, आग्रा, सहारनपूर आणि मेरठ येथील प्रचलित भाषेलाच नवे रूप दिले. देशाच्या निरनिराळ्या भागात असलेल्या लष्करी छावण्यांच्या व त्या सर्व सर्व टापूतील समाजाच्या व्यवहारीक सोयी लक्षात घेऊन आणि ठिकठिकाणची वैशिष्ट्ये समाविष्ट करून त्यांनी हिंदीला घडविले. अजूनही मुसलमान बंधूच्या घरात, बाहेर, लिहिण्यात व बोलण्यात हिंदीचाच वापर आहे. परंतू बहुसंख्य हिंदूंची मात्र हिंदीशी वागणूक आपपरभावाची आहे. ते हिंदीशी एकनिष्ठ नाहीत. ते बाहेर क्वचित हिंदीपुढे नम्र होत असले तरी घरात मात्र प्रादेशिक भाषेचेच दास आहेत. हिंदीला त्यांनी घराबाहेरच ठेवले आहे. हिंदूंचे हिंदी प्रेम या नमुन्याचे आहे. खडी बोली, पक्की बोली किंवा रेखता ही हिंदीचीच प्राचीन नावे होत.

भारतात अनेक राज्य व संस्थाने होती. त्यांचा कारभार वेगळा वेगळा असे. प्रजाजनांचे व्यवहार राज्यांतर्गतच चालत असत. दुसऱ्या राज्यामधील व्यक्तींशी नित्यसंबंध येत नसत. म्हणून राष्ट्रभाषेची गरजही भासत नसे. परंतु जेव्हा जेव्हा राज्याचे व संस्थानांचे एकीकरण झाले. देशातील जास्तीत जास्त भू-भाग एका शासनाखाली आला तेव्हा तेव्हा विचार व्यवहारांच्या विनिमयाकरिता एका प्रातिनिधीक संपर्क भाषेची आवश्यकता निर्माण झाली. या भाषा तत्कालीन राष्ट्रभाषा होत. साम्राज्य अशोकाचे काळात पालीने व गुप्तसाम्राज्य काळी संस्कृतने राष्ट्रभाषेचे पद भूषविले होते. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदी भाषेला तो बहुमान लाभला आहे.

घटनेच्या ३४३ (१) या कलमान्वये हिंदी ही भारतीय संघराज्याच्या सरकारी कामकाजाची भाषा ठरविण्यात आली आहे. वस्तुतः स्वातंत्र्य संग्रामात सर्वच भारतीय भाषांनी समान वाटा उचलला होता. तरी राष्ट्रभाषा पदाचे कायम पारितोषिक मात्र एकट्या हिंदीच्याच पदरात टाकण्यात आले हे कसे असा सहजच प्रश्न पडतो. परंतू हिंदीच्या ठिकाणी असणाऱ्या काही विशेष गुणांचा विचार मनात आला की, प्रस्तुत प्रश्नांचे आपोआपच निराकरण होऊन जाते. पैकी काही ठळक गुण असे– हिंदी ही इंग्रजी सारखी परदेशी भाषा नाही. ती स्वदेशी भाषा आहे. तिने संस्कृत शब्दांचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केला असल्यामुळे भारतातील अन्य भाषिकांशी जवळीकेचे संबंध प्रस्थापित होऊन त्यांची तिच्या विषयीची परकेपणाची भावना निघून गेली आहे. जिव्हाळा व आपुलकी वाढली आहे. प्रादेशिक भाषामधल्या शब्दांना स्वतःकडे आकर्षून घेण्याची व आत्मसात करण्याची खास प्रवृत्ति तिच्या ठायी आहे.

संत नामदेव, अमीर खुसरो, विद्यापति, नानक, मीराबाई आणि दादू दयाल या श्रेष्ठ कवी शिरोमणींच्या काव्यधनावर मराठी, उर्दू, मैथिली, पंजाबी आणि राजस्थानी या भाषा भगिनी आपआपला सारखाच हक्क सांगतात. परंतू असा हक्क सांगण्याचा खरा अधिकार एकट्या तिलाच फक्त पोहचतो हे ही त्या मोकळेपणाने मान्य करतात हे नवलच नव्हे काय ? यावरून हेच सिद्ध होत नाही काय की, हिंदीचे जे नाते संबंध वरील सर्व भाषांशी प्रस्थापित झाले आहेत ते वरवरचे नाहीत ? घनिष्ट आहेत. कृत्रिम नाहीत अकृत्रिम आहेत. या विशेष गुणामुळेच हिंदीचे एकछत्री साम्राज्य येथे प्रस्तापित झाले आहे. सर्व भारतीय भाषांचे प्रतिनिधित्व तिच्याकडे आले आहे. अन्य भाषा भगिनींमध्ये ज्येष्ठत्वाचा व श्रेष्ठत्वाचा मान मिळाला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री शहाजी राजे हे महाराष्ट्राचे थोर सुपुत्र होत. या सुप्रसिद्ध नात्याने मराठी ही त्यांची मातृभाषा होय. शहाजी महाराजांची तेलगु भाषेकडील ओढ सुप्रसिद्धच आहे. परंतु त्यांनी " राधावंसीधर बिलास " या नावाचे एक यक्ष काव्य हिंदीमध्ये लिहून महाराष्ट्राच्या वतीने पूर्वीच राष्ट्रभाषा प्रेम व्यक्त केले आहे. राष्ट्रीयबाण्याची वीररसप्रधान काव्यरचना करणारे हिंदीतील ख्यातनाम कविवर्य भूषण हे श्री शिवाजी महाराजांचे दरबारी कवि होते. शिवाजी महाराजांच्या दरबारात व राज्यात हिंदीला स्थान नसते, मान नसता, महाराष्ट्राचे व मराठी लोकांचे हिंदीशी संबंध नसते तर असा सुयोग घडून येताच ना.

हिंदीमधील कृष्ण काव्याचा प्रभाव थेट बंगालपर्यंत पडलेला दिसून येतो. ब्रजभाषेने बंगाली लोकांना वेड लावले. (हिंदी) ब्रज भाषेच्या प्रेमात व मोहात ते इतके पडले की, बंगाली या आपल्या मातृभाषेवर तिचा संस्कार करवून घेऊन " व्रजबुलि " या नावाची आणखी एक वेगळी काव्यभाषाच ते घडवून बसले.

वस्तुतः नागपूर व मुंबई ही मराठी मुलखाच्या राजधानीची शहरे. मराठीची माहेरघरे. हिंदी त्या मानाने येथे बाहेरची. परकी. परंतु नवलाची गोष्ट अशी की, या मराठी महानगरामध्ये हिंदीचा परकेपणा मुळीसुद्धा जाणवत नाही. ती परकी वाटतच नाही. येथे सर्वत्र मराठीशी ती बरोबरीच्या नात्याने वागताना दिसते. एस. टी. त, सिनेमात, रेल्वेत, बाजारात इत्यादी ठिकाणी तर पूर्णपणे हिंदीचेचे राज्य असते. मराठीपेक्षा तिचाच येथे विशेष पुढाकार असतो. जी गोष्ट नागपूर मुंबईची तीच गोष्ट भारतातील इतर मोठ्या शहरांची आहे.

भारतात शेकडो तिर्थस्थाने आहेत. हिंदीच्या प्रचार कार्यात या तीर्थस्थानाची विशेषत्वाने मदत झाली आहे. अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, कांचीपुरमा, उज्जैनी आणि द्वारका ही सात तिर्थक्षेत्रे विशेषच महत्वाची मानली जातात. ती देशाच्या एकाच भागात नाहीत. सर्व भागामध्ये व सर्व दिशांना आहेत, देशाच्या निरनिराळ्या भागातून असंख्य भाविक यात्रेकरू तेथे जमतात. तेव्हा त्यांची प्रादेशिक भाषा तेथे निरूपयोगी ठरते. देशाच्या सर्व भागातून एकत्र आलेल्या लोकांच्या प्रादेशिक भाषा वेगळ्या वेगळ्या असल्यामुळे त्यांचे वैचारिक आदान-प्रदान अशक्य होऊन जाते. मग हिंदीचेच सहाय्य त्यांना घ्यावें लागते. निरनिराळ्या प्रादेशीक भाषांच्या अनेकविध संस्कारांनी व लकबींनी युक्त अशी हिंदी मग प्रस्तुत होऊ लागते. तीर्थक्षेत्राचे ठिकाणी हिंदीच्या आधाराने बोलण्या चालण्याची जी भाषा विकसित व प्रचलित झाली तिलाच " गोसाई भाषा " हे नाव मिळाले आहे. दया, क्षमा, शांती, सत्य, अहिंसा, सहिष्णुता आणि उदारता व भक्ती विषयक सद्भावनांची पेरणी लक्षावधी भाविकांच्या हृदयामध्ये करण्याचे कार्य सातत्याने गोसाई भाषेच्या रूपाने हिंदी भाषा करीत असते.

राम, कृष्ण व वृषभ देव हे सर्वत्र पूजले जाऊ लागले. राष्ट्रपुरूष ठरले. हा संस्कृतचा पुण्य-प्रभाव होय. संस्कृतने राष्ट्राला ऐक्य सुत्रात ओवल्याची खूण होय. आधुनिक काळात तेच कार्य हिंदी करीत आहे.

भारत हा विशालकाय देश आहे. त्यांच्या निरनिराळ्या भागामध्ये निरनिराळ्या भाषांनी आपआपले बिऱ्हाड मांडले आहे आपआपला स्वतंत्र संसार थाटला आहे त्या प्रत्येक संसारात त्या प्रादेशिक भाषेचे वैशिष्ट्य प्रगटले आहे. प्रत्येक भाषेजवळ तिचे सरस व संपन्न साहित्य आहे. ते प्राचीनत्व, वैविध्य, गुण आणि परिमाण इत्यादि दृष्टींनी समृद्ध आहे. त्यांचे वेचक वाङमय एकत्र केल्यास ते विश्ववाङमयात अद्वितीय ठरू शकेल.

काही लोकांचा असा समज झालेला असतो की, हिंदी अन्त प्रादेशिक भाषांच्या अपकर्षाला कारण होईल. यांना पदच्युत करून त्यांचे स्थान ती पटकाविल. त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाला धोका उत्पन्न होईल. त्यांच्या कलात्मक व बौद्धीक संचित धनाची उपेक्षा होईल. अशी भीती त्यांच्या मनात उद्भवलेली आहे. पण ती निरर्थक आहे. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद प्रादेशिक भाषांना निरनिराळ्या रंगाच्या फुलांची उपमा देत असत. फुलांचे सौंदर्य त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वावरच अवलंबून असते. या भाषारूपी सतेज सुंदर फुलांना माळेचे मनोहर रूप देण्याकरिता एका सुत्राची आवश्यकता असते. या सुत्राचीच भूमिका राष्ट्रभाषेच्या रूपाने हिंदी पार पाडीत आहे. त्यांची शोभा वाढवित आहे. घटवित नाही. कारण माळा गुंफल्यावर फुलांचे मूळ सौन्दर्य अधिकच खुलून दिसत असते असा सर्वांचाच अनुभव आहे.

● ●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बहिणाईचे भावविश्व- एक उकल

विमल भालेराव

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवयित्री बहिणाई चौधरी यांची खानदेशी बोलीतील गाणी प्रसिद्ध आहेत. 'संसार' हेच या कवयित्रीचे भावविश्व आहे. 'संसार' या आपल्या भावविश्वासंबंधी बरेच मौलिक विचार मांडले आहेत. संसाराचे स्वरूप त्या समजावून देतात. माणसाच्या विविध वृत्ती उलगडून दाखवतात. स्त्रियांच्या मनोवृत्ती ओळखून त्यांनाही काही अमुल्य सूचना देतात. आपल्या क्षणभंगूर जीवनात मनुष्य कुठल्याही बाजूने उणा किंवा तोकडा पडू नये ही प्रेमळ मनीषा या सर्वांच्या मुळाशी आहे. वहिणाईचे भावविश्व उलगडण्याचा हा एक लहानसर प्रयत्न आहे.

संसार आणि सुखदुःखे

' बरा संसार संसार
जसा तावा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर '

अशी संसाराला चुलीवरच्या तव्याची उपमा देऊन त्याचे एक रूप वहिणाई स्पष्ट करतात. आणि लगेच आधी हाताला चटके बसत असले तरी नंतर भाकरी मिळते. हीच या संसारातील प्रत्येक सुखाची रीत असल्याचे सांगतात. प्रत्येक सुखासाठी आपल्याला जबरदस्त किंमत द्यावी लागते, पुढे त्या म्हणतात 'संसार म्हणजे '—

कधी नगद उधार
सुख दुःखाचा बेपार [२]

त्यातही माणसाची सुखे झरझर झिरपणारी असतात.

' माझं सुख, माझं सुख
हातातली काडवात ' [३]

सुख काडवातीसारखे आहे. क्षणभर तेवून विझणारे पण दुःखाची रीत मात्र वेगळी आहे. दुःखाचा निमिषही युगासारखा वाटतो.

' माझं दुःख, माझं दुःख
जशी अंधारली रात ' [४]

संसारातील दुःख ला त्या अशी अंधाऱ्या रात्रीची समर्पक उपमा देतात. दुःखे मनी रुतून बसणारी असून काट्यामारखी सलणारी असतात. या दुःखाने माणसाचे जीवन करपते हे त्या जाणून आहेत. ' सुख पाहता जवा पाडे दुःख पर्वता एवढे ' या भक्तशिरोमणी तुकारामाच्या सुभापिताची आठवण करून देणाऱ्या वरील ओळी आहेत. अशी संसाराची रीत असली तरी त्या माणसाला विफल करीत नाहीत. कारण विफलता फक्त वणवण् शकते. ती वाट शोधू शकत नाही याची त्यांना पुरेपूर जाण आहे.

' उतार चढणीच्या
दोन्ही सुखदुःखात
रमव तुझा जीव
धीर धर मनात ' [५]

असा धीर त्या माणसाला देतात. एवढे सांगून त्या थांबत नाहीत. तर माणसाचे जगणे फार मोलाचे आहे हे त्याला पटवून देतात.

---

१ वहिणाची गाणी—बहिणाबाई चौधरी, पॉप्युलर प्रकाशन, दुसरी आवृत्ती किंमत— सहा रुपये. 'संसार'— पृष्ठ १४.
२ कित्ता— पृष्ठ १५.
३ 'स्फुट ओव्या'— पृष्ठ ११८.
४ कित्ता— पृष्ठ ११८
५ 'वाटच्या वाटसरा'— पृष्ठ २८.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

' जग जग माझ्या जीवा
असं जगनं तोलाचं
– – – – – –
धरतीच्या रे मोलाचं ' [६]

आपल्या दैदीप्यमान विचाराचा भरीव टेकू मानवाच्या कोलमडणाऱ्या जीवनाला देतात. संसाराची ओळख करून दिल्यावर, माणसाच्या जगण्याची आवश्यकता पटवून दिल्यावर वहिणाई मानवाला महत्वाची धोक्याची सूचना देतात. वाटेत काटेकुटे आहेत. खाचखळगे आहेत. जग हे स्वार्थाने लडबडलेले आहे. माणसाने माणसाला दिलेल्या साथसोबतीलाही लक्ष्मण रेषा आहे. शेवटी प्रत्येकाला आपली वाट स्वतःच चालावी लागते व प्रत्यक्ष चालूनच संपवावी लागते. म्हणून वहिणाई म्हणतात,–

' लावनी पार आता
तुझी तुलेच नाव '

प्रत्येकाला कुठेतरी, कधीतरी, केव्हातरी स्वतःची ओळख पटवावी लागते. स्वत्व सापडावे लागते.

मानवी मनोविश्वातील विविधता

मानवी वृत्तींची उकलही वहिणाईंनी केलेली आहे. माणसाचे दोष त्या दाखवतात. त्याच्या दुष्ट प्रवृत्तीवर प्रहार करतात. माणसाचे मन फार ' वढाळ ' आहे. ' मोकाट ' आहे. ' चपळ ' आहे. मानवी मनाची लीला अकळ आहे.

' मन जह्यरी जह्यरी
त्याचं न्यारं रे तंतर
अरे, इचू साप बरा
त्याले उतारे मंतर '

असे मानवी मनाचे कटुसत्य वहिणाई उलगडून दाखवतात. माणसाच्या मनाच्या विषाचा थांगपत्ता लागत नाही. अशा ' स्वैर ', ' लहरी ' मनाच्या तालावर नाचून मनुष्य आपले जीवन बेताल करतो. म्हणून त्या हळहळतात. काही माणसांच्या जिभेला बुद्धिबळातल्या उंटासारखे तिरके चालणे आवडते. म्हणून त्या प्रश्न करतात,–

' कडू खानं रूचेना, कडू बोलनं रूचे
अशी कशी दुजाभाई बोल बो वाचे ' [७]

मनुष्य फार स्वार्थी आहे. स्वार्थ मनुष्याचे जीवन नासवून टाकतो. त्याचे निरागस जीवन कायमचे उधळतो. क्षुद्र स्वार्थाने कुंतीचे महन्मंगल मातृत्वही डागाळले. कृतघ्नांचा जन्मही स्वार्थातूनच होतो. म्हणून वहिणाई माणसांच्या स्वार्थी वृत्तीवर प्रहार करतात.

' नको लागू जीवा, सदा मतलबापाठी
हिरीताचं देनं घेनं नही पोटासाठी '

असे त्या कळवळून सांगतात. आपल्या शेतीच्या व्यवसायातील निरनिराळे दृष्टांत देतात. वाईट गोष्टी पाहिल्याने अंगावर काटे येतात ही कल्पना आधाराला घेऊन त्या म्हणतात,–

'पाहीसनी रे लोकाचे
यवहार खोटे नाटे
तव्हा बोरी बाभयीच्या
आले अंगावर काटे '

असा हृदयस्पर्शी दाखला वहिणाईने आपल्या खानदेशी बोलीत दिल्यावर त्या लगेच बोरी बाभळींची,

' राखोयाच्यासाठी झाल्या शेताले कुपाटी '

अशी निःस्वार्थी व परोपकारी वागणूक सांगतात. या मुक्या वनस्पतीपासून माणसाने काही शिकावे या उदात्त हेतूने त्या वरील ओळी लिहून जातात. माणसाच्या

---

६. 'माझ्या जीवा'– पृष्ठ १७.
७. वाटच्या वाटसंरा– पृष्ठ २९.
८. 'मन'–पृष्ठ–२१
९. 'म्हणी' पृष्ठ–१३८
१०. 'हिरीताचं देनं घेनं' पृष्ठ–२३
११. किता पृष्ठ–२३
१२. हिरीताचं देनं घेनं–पृष्ठ–२३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

कृतघ्नपणाची त्यांना विलक्षण चीड आहे. गायी, म्हशींचा दाखला आधाराला घेऊन,–

> ' खाईसनी चारा
> गायम्हैस देते दूध ' [13]

या मुक्या जनावरांना खाल्ल्या मीठाची जाण आहे. पण,

> ' मतलब्यासाठी मान मानूस डोलये ' [14]

असा माणसाच्या लवाड प्रवृत्तीला त्या चिमटा घेतात. पोट कितीही भरले तरी ते रिकामे होणारच आहे. देह नश्वर आहे पण शुद्ध प्रेम मात्र चिरंजीव आहे. काळजाची ऊव ही श्रेष्ठ आहे. या उच्च तत्वज्ञानातून,

> ' हिरीताचं देनं घेनं
> नही डोडाराकरता ' [15]

असा अमर संदेश वहिणाई देतात. त्या आधारे ' शुद्ध प्रेम ' या मानवी जीवनातील मांगल्याची त्या जाणीव करून देतात.

कर्तृत्वाचा संदेश

दैववादी भूमिका वहिणाईंना मान्य नाही. ' असेल माझा हरी । तर देईल खाटल्यावरी ' ही भूमिका त्यांना संमत नाही. त्या पूर्णपणे बुद्धिवादी आहेत. पराक्रमी व्यक्तिमत्व त्यांना पसंत आहे. माणसाच्या मनगटी असलेल्या ' करतूता 'वर त्यांचा विश्वास आहे. भविष्यावर त्यांचा विश्वास नाही त्या स्पष्टच म्हणतात,

> ' नही नशीब नशीब
> तयहाताच्या रेघोट्या '

आपले नशीब आपल्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. नशीबाच्या खांद्यावर माणसाने मान टाकणे त्यांना पसंत नाही. कर्तृत्वाला नशीबाच्या मर्यादेत त्या कोंडत नाहीत. पतिनिधनानंतर शेजारच्या आयाबाया त्यांना सहानुभूती दाखविण्यास आल्या तेव्हा त्या म्हणतात,

> ' जरी फुटल्या बांगड्या
> मनगटी करतूत
> तुटे मंगयसूतर
> उरे गयाची शपत. ' [17]

मनाच्या अगदी विकलावस्थेत वहिणाईने दिलेले हे उत्तर त्यांचा कर्तृत्वावरील विश्वास आणि निष्ठा सिद्ध करण्यास पूर्णपणे समर्थ आहे. आळशी आणि कर्तव्यशून्य माणसाला जागे करण्यासाठी त्या लहानश्या सुग्रणीचा दाखला देतात,

> 'तिची उलूशीच चोच
> तेच दात तेच ओठ
> तुले देले देवानं
> दोन हात दहा बोटं ' [18]

तरीही सुग्रणीच्या तुलनेत तू कर्तृत्वशून्य आहेस. माणसाच्या हितासाठी त्या कळवळून म्हणतात,

> पाखराची कारागिरी
> जरा देख रे मानसा ' [19]

आणि पुढे,–

> ' मानसापरी मानूस
> राहतो रे येडजाना
> अरे छापीसनी होतो
> कोरा कागज शहाना ' [20]

' येडजाना ' हा रांगडा शब्द वापरून त्या माणसाची खरमरीत हजेरी घेतात. माणसाच्या वरील

---

१३ मानूस–पृष्ठ–९८
१४. कित्ता–पृष्ठ–९८
१५. हिरीताचं देनं घेनं–पृष्ठ–२३
१६. लगे करमाची रेखा–पृष्ठ–२४
१७. 'आता माझा माले जीव'–पृष्ठ–२६
१८. 'खोप्यामधी खोपा'–पृष्ठ–४६
१९. कित्ता पृष्ठ–४५
२०. 'घरापासून मळ्याकडे'–पृष्ठ–६३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
अनुक्रमणिका

[illegible] जाणवून त्या हळहळून म्हणतात,

मानसा ! मानसा !
कधी व्हशील मानूस ? [२१]

स्त्रीचे मानसचित्र व उपदेश

बहिणाई स्त्रियांकडेही वळल्या आहेत. स्त्रियांची काही खास वैशिष्ट्ये त्यांनी दाखविली आहेत त्यांच्या भल्यासाठी उपदेशही केला आहे. स्त्रियांना आपले माहेर विशेष प्रिय असते. माहेर सुटले तरी माहेरची माया सुटत नाही. ही स्त्रियांची मनोवृत्ती ओळखून त्या म्हणतात,

माझ्या माहेराची वाट
माले वाटे मखमल [२२]

माहेरची वाट कितीही विकट, काट्टेरी असली तरी ती ' मखमल ' वाटते. ते साहजिकही आहे. कारण काही झाले तरी ते रक्ताचे नाते आहे. अतूट ! लेक सासरी का जाते तर बहिणाई सांगतात,

' लेकीच्या माहेरासाठी
माय सासरी नांदते ' [२३]

आपल्या सारखं माहेर तिला मिळावं म्हणून बहिणाई सासूरवाशीणीला म्हणतात,

' घे सोशीन घे
घालू नको वो वाद
कर माहेराची याद ' [२४]

तिची वेदना तिला मिटल्या ओठाने सहन करायला लावतात. स्वतःचे दुःख उंबरठ्याबाहेर गेल्याने होणारे घातक परिणाम त्या जाणून आहेत. म्हणून मातेच्या प्रेमळ अंतःकरणाने त्या सूनेला उपदेश करतात. आईचे प्रेम जगात अजोड आहे. त्याची सर कुठल्याच प्रेमाला येऊ शकत नाही. शेवटी आई ती आईच. म्हणून बहिणाई म्हणतात,

माय म्हणता म्हणता
होट होटालागी भिडे
आत्या म्हणता म्हणता
' केवढं अंतर पडे ' [२५]

ही मानवी प्रवृत्ती निसर्गसिद्ध आहे. मानवी संसारातील सर्व बारीक सारीक गोष्टींचे सूक्ष्मावलोकन झाल्यावर मानवाला जीवनात यशस्वी करण्यासाठी त्या म्हणतात,

' जगनं मरनं
एका सासाचं अंतर ' [२६] आहे तेव्हा,
' रडू हासव जरा
यात संसाराची चव ' [२७]

● ●

---

२१. 'मानूस'–पृष्ठ–९८
२२. 'माहेर' पृष्ठ–६
२३. 'योगी आणि सासुरवाशीण' पृष्ठ–५५
२४. 'सासुरवाशीन'–पृष्ठ–५४
२५. स्फुट ओव्या' पृष्ठ–१२०
२६. 'माझ्या जीवा'–पृष्ठ–१६
२७. 'माझा माले जीव'–पृष्ठ–२६

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शामराजांच्या आख्यानकाव्याचा नामनिर्देश

वि. बा. प्रभुदेसाई

प्राचीन मराठी वाङमयाच्या इतिहासात 'शामराज' नावाचे अनेक कवी नमूद आहेत. किंबहुना 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि. ल. भावे यांनी म्हटल्याप्रमाणे, या कवी पैकी काहीजण स्वतःच्या नावाचे निर्देश 'शाम,' 'शामराज' आणि 'सामराज' असे तीन तऱ्हांनी करतानाही आढळतात. यापैकी 'शामराज' उर्फ 'कृष्णदास शामा' या नावाचा एक कवी इसवीसनाच्या पंधराव्या-सोळाव्या शतकात होऊन गेला. त्याची मूळ संस्कृत भागवताच्या आधारे रचिलेली काव्यबद्ध मराठी टीका शके १४४८ मधली (इ. स. १५२६), म्हणजे ती संतकवी एकनाथाच्या भागवतावरील सुप्रसिद्ध टीकेच्या (इ. स. १५७३) आधीचीच आहे. भागवताच्या दशमस्कंधावरील बहुतेक मराठी टीका या सोळाव्या शतकातील आणि काही त्यानंतरच्या कालखंडातील आहेत. मराठी वाङमयावर झालेल्या परकीयांच्या (मुसलमान आणि फिरंग) आक्रमणाचा घोर परिणाम ध्यानात घेता या धामधुमीच्या कालखंडात उपलब्ध झालेल्या साहित्याचे महत्व विशेषत्वाने जाणवते.

'शामराज' उर्फ 'कृष्णदास शामा' या कवीने संस्कृत भागवताच्या दशम स्कंधातील केवळ 'पूर्वार्धा'वर आपली टीका रचिली आहे. मूळ ४५ अध्यायांचा कथाभाग त्याने मराठीत १९ 'अवस्वरु' मध्ये (अध्यायात) आणलेला आहे. संस्कृत दशम स्कंधाच्या ४५ व्या अध्यायातील पंचवीसाव्या श्लोकापर्यंतचा कथाभाग (वसुदेव देवकीचे सांत्वन, उग्रसेनाला राज्याभिषेक व नंदाला निरोप येथपर्यन्तचे कथानक असलेला) शामराजाच्या काव्यात आढळतो. याच ४५ व्या अध्यायातील या पुढच्या २५ श्लोकातील उर्वरित कथाभाग (राम-कृष्णाचे उपनयन व त्यांचे सांदीपनी ऋषींकडे अध्ययन) हा मराठी काव्यात आलेला नाही. म्हणजे संस्कृत भागवतातील अध्याय ४५ व श्लोक पंचविसावा, येथपर्यंतची एकंदर श्लोकसंख्या १८०१ होते; तर शामराजाच्या मराठी टीकेतील १९ 'अवस्वरू'ची एकंदर ओवीसंख्या ३१२३ एवढी भरते.

संपूर्ण श्रीकृष्णचरित्रातील केवळ कंसवधापर्यंतचा भाग शामराजाने आपल्या काव्यात वर्णिला आहे. हे बाळपणाचेच कृष्णचरित्र तेवढे आपण का वर्णिले, याचे मजेशीर समर्थन कवीने केले आहे ते असे :—

पुढिल ग्रंथाचि टिका । चरित्र वैकुंठनायका ।
ते सांगविया शुका । लागि ठेविलें ॥ २६७ ॥
थोरांचे सभे थोर । तेथ लहानाचे न चले प्रकार ।
व्यक्त शुकादिक मुनेश्वर । जेथ झाले ॥ २६८ ॥
आम्हि बाळपणीच्या चरित्राकडे । पुढिल ओझें न चढे ।
बुद्धिचे भांडवल थोडें । म्हणोनिया ॥ २६९ ॥
जें काइं संतां निरोपिलें । उनें पुरें जिउलें ।
अंगिकारावे तिउलें । सेवकाचें ॥ २७० ॥
मि तुमचें अपत्यें । जैसें जननी बाळकातें ।
बरव्या वोंकट्या गुणांतें । नेघे काहीं ॥ २७१ ॥
तैसें तुम्हि मातें । साधुजनें कृपावंतें ।
ऐकोनियां दिनातें । क्षमा करावि ॥-२७२ ॥

(अवस्वरू एकोणिसावा)

प्रस्तुत काव्यात, लेखनकालाप्रमाणेच कवीने गुरूंचे नाव व स्वतः विषयीही थोडीशी माहिती दिलेली आढळते. कवीचे मूळ नाव 'शामराज' (किंवा 'सामराज') असे असून तो गोमंतकातील केळोशी नावाच्या गावातील कौशिक गोत्रोत्पन्न 'रामाचा नंदन' होता. तो पुढे 'कृष्णाचा दासु' बनला या कृष्णभक्तीने कृतार्थ झालेल्या 'शामराजा'नेच 'कृष्णदास शामा' हे दुसरे नाव धारण केलेले दिसते. 'कृष्णदासु सामा' असा कवीनें आपल्या काव्यात अनेक ठिकाणी स्वतःचा नामनिर्देश केलेला आढळतो.

'कृष्णचरित्र' आणि 'श्रीकृष्णचरित्र कथा' ही दोन्ही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यनामे कवीला अभिप्रेत असल्याचे दिसते. त्यातल्या त्यात आकडेवारी तपासून पाहता 'श्रीकृष्णचरित्रकथा' हा काव्यनामनिर्देश अकरा वेळा तर 'कृष्णचरित्र' हा काव्यनामनिर्देश केवळ नऊ ठिकाणी आढळतो. याचा तपशील पुढे आढळेल. शामराजाच्या प्रस्तुत काव्याच्या आतापर्यंत तीन प्रती उपलब्ध झालेल्या आहेत. गो प्रत (गोव्यातील प्रत ही त्यातल्यात्यात संपूर्ण आहे.) उ प्रत (उज्जयिनी येथील प्रत, ही प्राचीन असली तरी खूपच त्रुटित आहे.) पो प्रत (पोर्तुगाल येथे रोमन लिपीत उपलब्ध झालेली ही प्रत ऐतिहासिक दृष्टया महत्वाची वाटते.) बाकीच्या दोन्ही प्रती देवनागरी लिपीतल्या आहेत.

पो–प्रत ही उपलब्ध प्रतींमध्ये प्राचीनतम असली तरी त्या प्रतीतील सर्व 'अवस्वरू' (अध्याय) सलग असे उपलब्ध नाहीत. तसेच अधूनमधून काही ओव्या गाळलेल्या आढळतात. मूळ देवनागरी लिपीतील काव्याचे, रोमनीकरण करीत असताना मूळ मराठी भाषा व तिची देवनागरी लिपी यांचे नीट आकलन न झाल्यामुळे. जेजुइत पंथीय ख्रिस्ती परदेशी मिशनऱ्याकडून अनेक वैचित्र्यपूर्ण शब्दरूपे निर्माण केली गेली आहेत. त्यातील काही नमूने असे आहेत. अवस्वरू १३ वा– तमु लखण अविदेसी, व्रुतातंतु, निःप्रपंच, अवस्वरू, क्रुस्ट्णु, विस्ट्णुराता, द्रुस्टी, सुक्लपख्खीं, मुनेस्परा, क्रुस्ट्णदासु सामा, परंमस्परी, स्त्री, स्रुंखला, विस्ट्णुच्या, वृसिकेसु, विळाहितु.

उ-प्रतीतील शब्दरूपांशी तुलना केल्यावर पो-प्रतीत कवीच्या मूळ भाषेचे (तत्कालीन मराठीच्या विशुद्ध स्वरूपाचे) खरेखुरे दर्शन घडणे अवघड आहे, याची खात्री पटते. आस्वादकांच्या दृष्टीने गो-प्रतीत जेवढी संबंधित मजकुराशी एकंदर सलगता आढळते तेवढी ती अन्य दोन प्रतिमध्ये नाही. या गो-प्रतीत शब्द सलग व चरण तोडून लिहिलेले आढळतात. गो-प्रतीत पुढील १० ठिकाणी 'श्रीकृष्णचरित्रकथा' असा काव्यनामनिर्देश आढळतो. अवस्वरू– २, ३, ४, ५, ६, ११, १२, १८, १९ (तिसऱ्या अवस्वरूच्या अखेरीस तसे उल्लेख दोनदा आहेत.)

श्रीकृष्णचरित्रकथा परीकर । शुका परीक्षीतीचे उत्तर ।
सुत सांगे रूपेस्वरा । म्हणे कृष्णदासु सामा ॥ १६१ ॥
इति श्रीभागवते महापुराणे दशम स्कंधे परमहंससंहितायां श्रीकृष्णचरित्रकथा तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ समाप्ती :
(अवस्वरु तिसरा, गो–प्रत)

वरील दोन्ही उल्लेख तिसऱ्या अवस्वरूच्या अखेरीस आलेले आहेत, तर पुढील उल्लेख तेराव्या अवस्वरूच्या आरंभी आढळतात.

श्रीकृष्णचरित्रकथा सांगतां । प्रसन्न होवुनि श्रीगुरूनाथा ।
सीधी पावीजे आतां रासक्रीडा ॥ १ ॥
(अवस्वरू तेरावा, उ, पो प्रती)

उ–प्रतीतील (देवनागरी लिपीतील प्राचीनतम) पुढील काही निर्देश पाहा

"इति श्री भागवते दशम स्कंधे श्रीकृष्णचरित्र कथा सटवा अवस्वरू" ॥ ६ ॥ (अवस्वरू सहावा)

"श्रीकृष्णचरित्र कथा तेरावा अवस्वरू शुभमस्तु ॥"
(अवस्वरू तेरावा)

"श्रीकृष्णचरित्र कथा पनरावा अवस्वरू"
(अवस्वरू पंधरावा)

"श्रीकृष्णचरित्र कथा इकरावा अवस्वरू"
(अवस्वरू अकरावा)

पो, उ, गो अशा तीन्ही प्रतींचा एकत्र विचार केल्यास पुढील १२ 'अवस्वरूं'मध्ये 'श्रीकृष्णचरित्र कथा' असा काव्यनामनिर्देश आल्याचे स्पष्टच दिसते.–

२, ३, ४, ५, ६, १० (पो), ११, १२, १३ (उ), १५ (उ), १८, १९ = १२.

'कृष्णचरित्र' असा उल्लेख फक्त पुढील १० 'अवस्वरूं' मध्ये आला आहे.–

१, ७, ८, ९, १०, १४, १५, १६, १७, १८ = १०

पो–प्रतीत 'अवस्वरूं'च्या शेवटी सर्वत्र 'स्त्रि क्रुस्ट्ण चरित्र कथा' असाच उल्लेख आहे. उ–प्रतीत देखील उपलब्ध सर्व अध्यायांच्या अखेरीस 'श्रीकृष्णचरित्रकथा' असाच काव्यनामनिर्देश आढळतो. (६,११,१२,१३,१५) सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक डॉ. पांडुरंगराव पिसुर्लेकर यांनी ब्राग (पोर्तुगाल) येथील संग्रहालयातील हस्तलिखित संग्रहे प्रत्यक्ष पाहून प्रस्तुत काव्यग्रंथाचा निर्देश केला आहे तोही वरील विधानाला निस्संदिग्धपणे पाठिंबा देणाराच आहे.– "कृष्णचरित्रकथा–कृष्णदास शामा" यावरून, 'श्रीकृष्णचरित्रकथा' हेच नाव कवीला अभिप्रेत असावे, असा निष्कर्ष काढणे सयुक्तिक वाटते.

गोमंतकात वास्तव्य करून मराठी काव्यग्रंथांची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रचना करणाऱ्या मिशनऱ्यांमध्ये फादर स्टिफन्स (हा इंग्रज), पाद्री एतिएन–द–ला–कृवा (हा फ्रेंच) आणि पाद्री आंतोनियु–द–साल्दांज (हा पोर्तुगीज) हे प्रमुख होते. या मिशनरी लेखकांनी अनुकरण व खंडण मंडण करण्यासाठी म्हणुन हिंदू धर्मीयांचे जे पुराणग्रंथ आपल्या संग्रही ठेवले होते, त्यामध्ये प्रस्तुत शामराजाच्या श्रीकृष्णचरित्र कथेचाही समावेश होतो. पाद्री कृवा यांचे सेंट पीटरच्या जीवनावरील पुराण हे मुख्यत्वे हिंदूंच्या देवदेवतांची निंदानालस्ती करून ख्रिस्ती धर्माचे महत्व मनावर बिंबविण्याच्या उद्देशाने लिहिलेले प्रदीर्घ काव्य आहे. या खंडनात्मक पुराणात कवीने शामराजाच्या श्रीकृष्णचरित्रातील रासक्रीडा, ब्रम्हदेवाने केलेले गोकुळातील गोपबालक व वत्स यांचे हरण इत्यादी अनेक प्रसंगीच्या ओव्या जशाच्या तशा उद्धृत केलेल्या आढळतात. याविषयी सुप्रसिद्ध मराठी संशोधक व प्राचीन काव्याचे रस विमर्शक डॉ. वि. भि. कोलते यांचा पुढील मार्मिक अभिप्राय ध्यानात ठेवण्यासारखा आहे.–

"रासक्रीडेचा शृंगार कृष्णदास शामाने पाल्हाळाने वर्णन केला आहे असे वाटते. एखादा प्रसंग अनावश्यक विस्ताराने वर्णन करण्यात कवीच्या सुप्त मनोवृत्तीवर प्रकाश पडतो, हे विसरता येत नाही. 'त्यांनी सांगितले तें करावे । परी आचारती तें नाचरावें, (१४–१३८) असे त्याविषयी सांगावे लागते ते प्रसंग, वर्णन करावयाचेच असल्यास, मूळ भागवतात असले तरी, सूचकतेने व संक्षेपाने वर्णन करायला पाहिजे होते, असे वाटल्या वाचून राहत नाही. जारबुद्धीने केलेल्या 'उत्तम पुरुषा' च्या सेवेमुळे परमेश्वर प्राप्त होतो, यावर श्रद्धा ठेवायची तर 'संभोगातून समाधी' कडे जाण्याचा उपदेश करणाऱ्या आचार्य रजनीशांना नावे का ठेवायची? भागवताच्या आधारे का होईना पण त्या काळातील या सामाजिक प्रस्थापित विचारसरणीचे प्रतिबिंब दर्शविणारे हे श्रीकृष्णचरित्र लिहिणाऱ्या कृष्णदास शामाला ही कल्पनाही नसेल की आपण अत्यंत भक्तिभावाने (?) 'पुढां तेणें जगजिवनें । गोपीका आळंगील्या धावोने । मुखि दीधलें चुंबनें । धरोनी केशीं ॥ वस्त्रां घातला हात । करीं धरोनी आसुडीत ।'

'डोर घेऊनियां करीं । हात घालि स्तनावरी । नखें करुनि विदारी । वक्षस्थळ.' सारांश

'गोपीका जे म्हणीतलें । तीनुकें लाणे केलें । यापरी भोगीलें । सकळेकातें ॥' (१३१५४ ते १५९) अशी श्रीकृष्णाची जी कामचेष्टिते वर्णन करीत आहोत त्यांच्याच आधारे' त्या आपल्या देवाला 'लंपट अदेव', 'कामतुरू' म्हणून संबोधून, व 'येवढा दोमी कामतुरू । किनावा काए परमेस्वरू?' असा प्रश्न विचारुन आपला धर्मप्रसार करणाऱ्या ख्रिस्ती मिशनऱ्यांसाठी आयती सामुग्री निर्माण करून ठेवीत आहोत! आपल्या सांस्कृतिक परंपरेप्रमाणे स्वतःला मोक्षप्राप्तीसाठी कृष्णदास आपल्याच भजनानंदात व श्रुतिस्मृति पुराणात मग्न राहिल्यास आश्चर्य नाही" अशा अनेक अभिनव दृष्टिकोनांतून अभ्यासकांचे लक्ष वेधून घेणारे हे आख्यानकाव्य आहे.

(शामराज उर्फ कृष्णदास शामा-विरचित श्रीकृष्ण चरित्र कथा हे प्राचीन आख्यान काव्य डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांनी डॉ. बा. ना. मुंडी यांच्या सहकार्याने संपादीत केले असून ते डॉ. वि. भि. कोलते यांच्या 'पुरस्कारा'सह मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशित करणार आहे.)

● ●

दिवाळी अंक

युगवाणीचा दिवाळी विशेषांक येत्या दिवाळीत प्रसिद्ध होईल. त्यासाठी कथा, कविता, एकांकिका, ललित लेख, संशोधनात्मक व समीक्षणात्मक लेख, पुस्तक परीक्षणे इत्यादी लेखन ५ आक्टोबर १९७५ पर्यंत पाठवावे ही विनंती. जाहीरातीसाठी उत्तम माध्यम.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

गर्द झाडीत शिरण्यापूर्वी

प्रफुल्ल चौधरी

गर्द झाडीत शिरण्यापूर्वी.
मी निरखून घेतो, माझेच खुरटे संदर्भ !
हिरव्या पानांसाठी राखून ठेवतो,
शुष्क पानांची बिन्धास सळसळ !!
अशावेळी, तू मात्र–
'ससा–कासव' स्पर्धेतील एक कंटाळलेली परीक्षक !!!
कधी चमकत्या देहावरची निखळती आरास निरखणारी
एक अनावृत्त गर्भगळीत खसखस. .पुन्हा पाना आड !
मी आजही गर्द झाडीत शिरण्यापूर्वी.
हे सारे निरखून घेतो.
खरंच ! तुला बिळातील अंधार वाढताना दिसतोय ?

फक्त निवेदन

सु. म. तडकोडकर

रात्र,
हो, भयानकच रात्र ही,
कडकडाट विजेचा, सुसाट वारा
सोबतीला मुसळधार पाऊस

एकूण वातावरण वादळलं होतं खरं.
तर मी निघालो, विजेचे दिवे पेटत होते,
अर्ध्याहून कमीच वाट तुडवली
तेव्हा सटासट खांबे काळे पडले.

नग्न सावल्यांचा तो नाच थैमान घालूं लागला.
हां, आतामात्र मी पुरता घावरलो, आणि
'हातात कंदिल असून एवढा काळोख कसा !'
म्हणून पाहूलं, तेव्हा
तो देखील काळोखात डुचमळत होता.

मला खात्री आहे, तूं कंदिल न पेटवताच
मला दिला होतास, आणि निर्वुद्धासारखा
तो न पहाताच निघालो होतो. मी.
हे असं घडलं.

तू थांब जरा मी येते रे

उषा लिमये

तू थांब जरा मी येते रे ।।धृ।।

लावियलेला बाग फुलांचा क्षणभर पाहुन घेते रे ।
नाम तुझे हे मंगलसूत्रच । कर्माची ही करी कंकणे
वाटचाल ही पदी पैंजणे, सारे लेवुन येते रे ।।१।।

तुझ्या प्रीतिची शाल पांघरून । तव प्रीतीची मनी आठवण
त्यासाठी हे जीवन तुझिया पायी वाहुन देते रे ।।२।।

आसक्तीचा आसमंत हा । नव्हता कधि प्रीतीत उजळला
नंदादीप तुझ्या प्रीतीचा तमात लावुन येते रे ।।३।।

कुणास माहित परतुन येणे । संपवुनीया देणे घेणे
सोडुनिया हे सर्व दिवाणे संचित घेऊन येते रे ।।४।।

माहेर कुठे सासर कुठले । हेहि राजसा अता विसरले
तूच मला सर्वस्व परंतु निरोप घेऊन येते रे ।।५।।

आता कुठले ओझे स्कंधी । मी न अता बंधनात बंदी
कुठली आली मनात धुंदी तुझ्याकडे जी नेते रे ।।६।।

मिरूग

रंजना विगम

मिरगाच्या पाण्यामधी
वास झोंबला मातीले
सांदी-मेऱ्यानं धुऱ्याच्या
पान फुटले कोंबाले

येल पानानं झाकली
झाला मांडव हिरवा
फूल कारल्याचा शोभे
मधामधात पिवरा

कशी झाली व आवड
हा त ऽ बार पयलाच
इतल्या वद्रचा कारला
कसा दिसला तुलेच.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रावण

कृष्णा चौधरी

हा येतो श्रावण रोज असा नेमाने
भिजवीत मनाची रुखरुखलेल्या माती
पाऊस–उन्हाचा खेळच हा स्वच्छंदी
जुळवीत चालला गतजन्मांची नाती।

गंधात विहरतो गंध तुझा अवखळसा
कानांत सांगतो गूज मनीचे वारा
तू भास रात्रिचा, पहाट होऊनि येसी
कधी आषाढातील कोसळणारी धारा।

सृष्टीचे हिरवे रूपच तू लसलसते
वर्षेतुनि येसि छेडित ख्याल-तराणा
मावळतीच्या नेत्रातिल तूं आसूं
संधेचा धूसर, कातर एक वहाणा।

हेमंतामधल्या कोमल आर्त पहाटी
दंवबिंदू होउन इथे कधि गहिवरसी
तू चांदण्यातले एक रूपेरी पान
व्यापिसी तमावर होऊन संथ उदासी।

हा येतो श्रावण रोज असा नेमाने
जुळवित क्षणांची विस्कटलेल्या नाती
आकाश दिवाणे उकरित बसते केंव्हा
अलवार क्षणांची जणु झालेल्या माती।

दुभंगली वाट

दे. शि. दुधलकर

अशी दुभंगली वाट
पहाटेच्या पायापाशी
तरी अजून कोरडी
वेड्या पापणीची उशी

तिने ताडले आधीच
मोल कफल्लक झाले
कुसुमाच्या देठातळी
नांदे घुबडाची पिले

असा कोरडाच बरा
सरणाच्या सोईसाठी
नको ओल्याची ती शाल
पोट सांभाळण्यासाठी

सारी अशीच उघडी
कणाकणांवर पेठ
माझ्यातल्या माझ्यासाठी
बरी मिळाली ही भेट

तरी रक्तास वजाचले
लाल होऊन रे काय
अशा जगात तुमची
सदा वांझोटीच माय

बिलोरी

वासंती इनामदार

ओठांवरचे चंद्रगाणे. . नेत्रपाकळ्यातल्या स्वप्नांसह
प्राजक्त फांदीचा डौल उभारून मनसोक्त गाऊन घे. . !

कदाचित् आपल्या मुक्कामातले अर्धमुर्दे स्पर्शतरंग
गळ्याखालून आपोआप वहात राहतील.

अंधाराचा तोल निखळेल प्रत्येक कडव्यांमधून
दर्शनोत्सुक वाटांनी मात्र. . बेहोश लय नेऊ नकोस

हातांवरच्या प्राक्तनरेषा. . निःस्तब्ध वादळ मनात
लपंडाव खेळत सजग राहणाऱ्या. . !

फक्त शब्द सावरीत. . मौन सजवित ये
काळजातले शतजन्मीचे बिलोरी वण
चंद्रताऱ्यांसह राहणारे. . !!

डोळ्यातील कवितेच्या कालिंदी जळात

उ. रा. गिरी

आश्विनातील उत्तररात्रीच्या अत्तरथेंबांची ठिबकण
चांदण्याच्या चित्रलिपीवर
पारवाकाशावर विसावलेली
दूरस्थ गोपुरांची स्वप्निल मयसभा.
वाऱ्यावरून तरंगत येणारी
सतारीवरील चकधून चंद्रकंसाची
झुमऱ्याच्या पंखांनी.
आणि बुडत चाललेला
एक घननीळ अपार्थिव आशय
डोळ्यातील कवितेच्या कालिंदी जळात !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अपराच्या पाराखाली !

नारायण रा. पेडणेकर

श्रद्धा जळासम याटलेली शीतळ शांत काळी
श्राद्धे उरकलेली मोकळघापणाची
भडकलेल्या उनांत भोंवळलेली !

एकटाच उरलोंय.
वाट नव्हती. नाही.
काळीज खोटं शीळ शिळी
धंदा उठवळ
वठले नाटक
उठले गोकुळ सुटला कान्हा
स्तन राधेचा, स्तन यशोदेचा
मी तहानेला जरी सुटला पान्हा !

नाळ तोडून जाड्याळ उरलेलं हे करंटेपणच खरं
आहे का ?

अपराच्या पाराखाली झेलतंय खातंय ते वार का ?

तिथेच तर

नीलकंठ महाजन

डोक्यावर काचेच्या पिंजऱ्यात
तडफडती दुपार घेऊन जातांना
पाचोळयाचे समुद्र कुरतळून पुढे गेलेली वाट
रखरखत्या उन्हात होती न्हात
वादळ मागे पडल्याचे
माझ्या काखेत तारा तुटलेली सतार
सांगत होती पुढच्या आकाशाला.
फांदी फांदीवरच्या सावलीतल्या
पाखरांच्या थव्यांमधुन
ऐकू येत होती संवेदनांची कुचकुच
तेव्हा माझी सावली
मलाच म्हणत होती, 'हो पुढे तूच ?'
मी असा रेटलो गेलो
अंधाराच्या तळयात
तिथेच तर वितभर जागेचे मोल म्हणून
माझे डोळे मागत होते सूर्याचे हात.

फळ

शिरीष गोपाळ देशपांडे

प्रथम घेतली झेप रवीवर,
यत्नाचे मुखमंडल जळले ।
कौसल्येने चंद्र फसविला,
दर्पणामधे बिंब तरळले ।।

पिकलेले फळ अशक्य ठरले,
धरा ओढते पुच्छ खालती ।
वसुवज्राची धार घासते,
वायुसुताच्या त्वचेभोवती ।।

नियमावर नियमांची राखण,
अचूक पण रचले प्रक्षेपण ।
माया तोडत इंद्र जिंकला,
पुन्हा शापिले त्यास कुणी, पण ? ।।

फसलेला हनुमंत हनूवर,
सूर्याची कुरवाळे खिपली ।
रान अपोलोतून सांगतो,
'मी चंद्रावर जखम कोरली ।।"

बेवारशी

वा. रा. सोनार

आभाळाचे ओझे वाहिले शीरावर
धसमुसळ्या ढगांनी
निग्रहाने वारे तोडलेस माझ्या दिशांचे
धरणी तर त्यांनी कधीच कावीज
केलेली, पावलांनिशी...
उरलेल्या निराधार निःशब्दांना
किती कोंडून धरशील ?
माझ्या करंट्या स्पर्शाने
त्यांची गाणी होतील आताशा
खात्रीपूर्वक. बेवारशी.

लोपून जावं निळेपण

सुशील पगारीया

लोपून जावं निळेपण
इतके ढग वहात आहेत
भारावून आलेल्या चिता...
मन साहत आहेत
विस्तारलेले आकाशभर डोळे.
कुठे गडगडत नाही
पाऊस झडतही नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोकळतो मी

फुलसिंग परदेशी

पोकळलो मी कसा अचानक !
नाही—नव्हतोच मी
माझ्यातच अन् कशातही.
पल्याड सूर्य अन् आधाराला भूई
जखडून होतो अगदीच
बनून साऊली कुणा—कशाची तरी.
कुठे गळाली भूई
(अस्तित्व तर आता माझेच नाही)
माझ्याचसाठी शोधीत आहे
त्यांना आधी
ओळखल्याविण माझा मी.
पोकळलो मी कसा अचानक !
नाही—नव्हतोच मी
माझ्यातच अन् कशातही.

अनामिका

विजया जहागीरदार

हिंडले सभोवती, मी अनामिकापरी ।
नाकळे कसा इथे, जीव गुंतला तरी ।

ना कुठेच रोवली, खोल खोल पाउले ।
मी तवंग होउनी, जीवनी तरंगले ।
सात रंग का बळे, फेर घेत अंतरी ॥१॥

जे अबोल राहुनी, खूप खूप बोलले ।
दूर राहुनी कसे, जवळ जवळ भासले ।
कमलवेल ती करे, घालते मिठी उरी ॥२॥

नवीन घाव झेलता, घाव विसरले जुना ।
दोन आमुची फुले, हासली पुन्हा पुन्हा ।
यास शाप मानु का, समजु या वरापरी ॥३॥

नाकळे कसा इथे, जीव गुंतला तरी ।
हिंडले सभोवती, मी अनामिकापरी

ऊन्हाचे दिवे

सुधाकर नेर्लेकर

आणि
आम्ही पहाटताना
कोरडवाहू समुद्रांची वाळवंटं
उपाशी शांतता कोपरे फाटलेली,
वाळुवाळुतुन फुललेल्या कर्दळीची
मखमल,
निरशा तळपायावर
सवाष्णीच्या कुंकवाचे डाग गोंदवुन
भर पौणिमेलाच
आमच्या देहाचं सरपण,
तू आलीस तेंव्हा
आम्हीच लावलेले ऊन्हाचे दिवे
वाराच्या चौकटीवर
काजळीचे शिलालेख कोरत होते
धुरांची पिशाच्चं पांगत असताना
शांतता तशीच अनुशापोटी
एकसंध -
कुंकवाचे डाग झिरपलेच नाहीत
आम्ही मावळु लागलो तरी देखील.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत. १९२३

पाण्यातली वर्तुळं

मुरलीधर कुळकर्णी

ती रात्रीपासून थोडी घुश्श्यातच असते घुश्श्यात असली की तिच्या नाकाचा शेंडा लाल, हे मला अनुभवानं आता चांगलं कळू लागलंय. तिला कित्येकवेळा मी रागावलेलं पाहिलेलं आहे. ती रागावली की सुंदर दिसते. स्त्रिया रागावल्या की सुंदर का दिसतात, हा खरं तर संशोधनाचा विषय. ते सोडा. ती रागावलेली. रागावणं विवाहित स्त्रियांचा जन्मसिद्ध हक्कच. बस; केव्हाहि रागवावं. मला एकाकीपणाचा तसा कंटाळा. अस्वस्थ. म्हणून लेंगा चढवून मी गॅलरीत येतो.

समोर अगदी स्वच्छ आरशासारखं ऊन. श्रावणातलंच ते! सुंदर. उपमा अपुरी अडेल असं. सूर्यकिरण झाडांच्या पानावर छुमछुमत असतात. झाडांची पानं त्यांना शेकहॅंड करतात. किरणं उलट गुडमॉर्निंग म्हणतात. कसं काय? ठीक? बरं चाललंय! मी मनाशीच हसतो ते माझं मलाच उमजलेलं नसतं. तेवढ्यात कावळोबा समोर टपकतात. ते माझ्या चांगले ओळखीचे. सकाळचे प्रहरी गॅलरीत येऊन उभा राहिलो की हे टपूनच आशाळभूत नजरेने पहातात. क्वॉव् क्वाव. बटवटीत डोळा फिरतो. वाकडी मान. चोच जमिनीवर परजवतात. ते का येतात हे मला माहितायू. सकाळी मी पाववाल्याकडून पाव घेत असतो. ते यांनी एकदा कुठूनसं पाहचलं. आले क्वॉव् क्वाव! मी त्यांना एक सबंध पाव टाकला. त्यांनी तो तडतडा तोडून खायला सुरुवात केली. खाताना आवाज. गुपचुप मामला कुठला? एकदा मोठ्यानं हाळी. जातभाई गोळा झाले. वाटयासाठी तुटून पडले, कावळोवा त्यांच्याशी भांडू लागले. चोच मारू लागले. एक मोठा तुकडा त्यांनी पळवला. साताठ जण त्यांच्या मागं लागले. एकट्यानं गुपचुप खाल्लं असतं तर? यांनी केली जाहिरात. बसले बोंबलत. भोगा आपल्या कर्माची फळं. मारामारी चालू राहिली. दूर झाडावर ओरडा. विव्हळणं. फडफड. मजा आला. मोठी गंमत झाली. शेवट शांत रसात झाला. कावळोबाचा प्रवेश संपला.

आता हा साला इथं आलाय्. आज रविवार. वेटचा वार पाठ करून ठेव! रविवार, सोमवार, मंगळवार— आज मी उशिरा उठतो. पाव घेत नसतो. हे तुला ठावूक असायला हवं.• हं, कर पाठ! रविवार. .शिवाय पाववाला केव्हाच हजेरी देऊन गेलाय्. तुला मूर्खाला ते कसं कळणार? परंतु मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी. . पावाचा तुझा हक्क आहे. हो रे, जन्मसिद्ध हक्क मान्य! पण आज रविवार. हं म्हण रवि. . .क्वॉव् क्वाव. मला स्वच्छ पाव पाव ऐकू येतंय्. .

'छान छान! तू पाव पाठ केलायस्. पण गड्या आज पाव नाऽऽही! नाही म्हणजे नाही. अगदी स्वच्छ नाही.'

'पाव पाव' वेटा अगदी खनपटीलाच बसलाय.

'शुक् शुक्, उडून जा! पाव नाही मिळणार लेका. ऊड ऊड. जा! उड उड रे काऊ। तूझे सोनेनी मढविन पाऊ॥ तुझा शुभशकुन मान्य. पाव नाही मान्य. 'एकदा तो समजल्यासारखं टवकारून पहातो. मग डोळ्यात निराशा तरळते तो केविलवाणं ओरडतो.

'पाव, पाव! पोटाला लागलीय् भूक फार!' साल्याला कळलं पण वळलं नाही. तरी मला थोडी करूणा. मनात थोडा सॉफ्ट कॉर्नर. पण इलाज नसतो. खंत. पक्षांची देखील उपासमार? काय ही अन्नान्नदशा पोटासाठी दाही दिशा। आम्हा फिरविशी जगदिशा॥ काय ही शोचनीय अवस्था! परमेश्वरा कुठं फेडशील ही पापं? चोच निर्माण केलीस, चारा कुठाय?

'अरे, जारे बाबा आता! काय ही उगाच पिरपिर खुशालचंदा?' मी म्हणतो पण तो ऐकतच नाही. केविलवाणं मागत राहतो. मी चिडतो.

'मी तुझ्या बापाचं काही देणं लागत नाही. जा उडत साल्या!' मी किंचाळतोच.

तेवढ्यात ती झोपेतून उठून भ्याल्यासारखी धावत येते. डोळ्यात अथांग संशय.

'कोण आहे हो? कोणाशी बोलताहात?'

'संशयग्रस्त समंधा शांत!'

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'कोण समंध ? मी ?'

'नाही. तो कावळा.'

'खोटं. सांगा कुणाशी. एवढ्या सकाळी कोण मिळालं गुलगुल गोष्टी करायला ?'

'अगं, खरच कावळा. तो वघ कसा तिरक्या नजरेनं वघतोय. पाहिलंस ?'

'पक्षी माणसाशी बोलत नसतात.'

'बोलतात तर. पोपट नाही बोलत ?'

'कावळा कसा बोलतो ?'

'तसाच क्रॉव् क्वाव. पाव पाव.'

'मला नाही खरं वाटतं.' म्हणून ती कावळ्याला खडा मारते. कावळा उडून जातो. तिचा अवतार ! केस विस्कटलेले. कुंकाचा धूमकेतू. पदर कुठल्या कुठं. डोळ्यावर झापड. मग लांबलचक जांभयी. डोळे चोळणं खाजवणं.

'रात्रीचा राग गेला दिसतोय'

'मुळीच नाही.' मानेला हिसडा. केस झुलपतात. मी ओळखतो, राग पन्नास टक्के मायनस्.

'चल मला चहा हवाय.'

'मी नाही करणार. जा तुमच्या त्या स्टेनोकडं.'

'स्टेनोकडं ? कोण स्टेनो ?' एकूण कालचं प्रकरण निवलेलं नाहीय्.

'काल जिला आपल्या छत्रीतून पोचवलं तिच्याकडं. बारा–तेरा तासात माणसाला एवढा विसर पडू शकतो ?'

'व्याख्याच करायची तर–माणूस हा एक विसराळू प्राणी आहे, माझं इन्टरचं तर्कशास्त्र मी अर्ध्या किमतीला विकल्याचं आठवतं. तिचं वेड डोक्यातून गेलं नाही वाटतं ?'

'कसं जाईल ? एखाद्या बाईला आपल्या छत्रीतून न्यायचं म्हणजे. लोक हसले असतील.'

'हसतात त्यांचे दात दिसतात.'

'म्हणजे तुम्ही लोककार्य केलंत. लाज वाटली नाही,'

'अलबत्. लाज वाटली असती तर पुढाऱ्यांनी लोककार्य कशाला केली असती ?'

'थोडीफार मनाची तरी म्हणते मी ? खुश्शाल त्या स्टेनोला भर पावसात छत्रीत घेऊन गेलात. उद्या तिला घरी घेऊन याल.'

'काय हरकत आहे ? जाईल चहापाणी घेऊन.'

'माझं अडलंय खेटर !' तिचा आंगठा. चहाच काय, पण पाण्याचा थेंब मिळणार नाही म्हणावं माझ्या इथं.' म्हणत फणकाऱ्यानं ती आत जाते. सरळ बिछान्यावर लोळण. माझंहि लोळण.

'स्वरूपा, काय हे वेड्यासारखं !' मी तिची हनुवटी धरून तोंड माझ्याकडं वळवतो. ती हात झिजाटून टाकते.

'चला, मला नाही येत असा लाळघोटेपणा. एखाद्या बाईनं रिक्वेस्ट केली म्हणून चालले आपले तिला पावसात पोचवायला. शोभलं नाही हे तुम्हाला ! जाताना तिचं अंग तुमच्या अंगाला, खांदे तुमच्या दंडाला घासले असतील. तिच्या मांड्या–शी: किती घाणेरडे आहात तुम्ही !'

'तू म्हणतेस तसं काहीच घडलं नाही. अगदी हातभर दुरून चालली होती ती. तिनं विचारलं तर मला नाही का म्हणता येणार ?'

'तुम्हीच कसे सापडलात हो तिला ?'

'कसे म्हणजे ?'

'बावळट आहात अगदी. लोकांना छान गंडवता येतं तुम्हाला. तुम्ही गंडता. लोकांची कामं करून देता.'

'कुणाचं दिलं ?'

'सुपरिटेंडेंटचं हागरं नाही सारत ?'

'खरंय्.' मी अपराधी आवाजात म्हणतो. 'नोकरी आहे. वरिष्ठांची मर्जी सांभाळावी लागते.'

'ते पटतं. पण हे छत्री प्रकरण नाही पटलं. लोक काय म्हणाले असतील !'

'म्हणेनात. आपलं मन विशुद्ध असलं की–'

'आ ऽऽ हा हा. मोठे आले भोळे सांब ! पायांचं तीर्थ घेऊन घ्या ! म्हणे, मन विशुद्ध असलं की. कुठं आश्रमा विश्रमात काढलीत काय इतकी वर्षं ? मी सांगते, तुमचं मुळीच माझ्यावर प्रेम नाही. तुम्हाला दुसऱ्या स्त्रियाच अधिक आवडतात. तुमचं कुणावर तरी प्रेम असावं' मी बावरतो. म्हणजे तसं प्रेमबीम मी कधी कुणावर केलेलंच नाही. आजवर प्रेम म्हणजे कसला पदार्थ हेहि ठाऊक नव्हतं. पण हिला कसं पटवून द्यायचं?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी गडबडतो.

'अगं, नाही गं.'

'घ्या तर माझी शपथ!'

'शपथांवर माझा विश्वास नाही.'

'मी मेले तर चालेल का हो तुम्हाला?' उलट तिच्याच डोळ्यात पाणी.

'वेडी का तू? तू मला हवी आहेस.'

'मग घ्या तर शपथ. ठेवा इथं हात!' ती माझा हात तिच्या गळ्यावर ठेवते.

'त्रस्त समंधा शांत हो!'

'घ्यायची की नाही?'

'तुझी शपथ. माझं कुणावर प्रेम नाही. फक्त एक वगळता.'

'पहा, राखलाच ना एक हाच्चा? मला वाटलंच होतं. ही कोण अवदसा?'

'शीः अवदसा काय म्हणतेस?'

'सांगा. नाहीतर अशाच खरपूस शिव्या घालीन त्या रां–'

'शः ऽऽऽ. काय हे घाणेरडं? अगं, इतकं तुला कळू नये? तुझ्यावर देखील प्रेम करू नको?' आता तिच्या डोळ्यात समाधान आणि प्रेम. क्षणभर शांतता. मग एकाएकी तिचं विचारणं.

'काहो? कशी आहे दिसायला ती तुमची 'छत्रीवाली'?'

'माझी?'

'म्हणजे तेच ते. माझ्यासारखी की माझ्यापेक्षा सुंदर?'

'अत्यंत घाणेरडी. म्हणजे जाडजाड आहे. वटवटीत डोळे. काळी मिचकूट. टीचभर वेण्या. आणि चालते अशी फेंगडी.' मी चक्क चालून दाखवतो. हां म्हणजे संशयाला जागा नको.

'मग इतकी आवडली ती तुम्हाला?'

'आवडली?'

'म्हणजे तेच ते. छत्रीत घेऊन गेलात म्हणजे आवडलीच म्हणावं.'

'त्यामागील माणुसकीची भावना विसरतेस तू.'

'वा मानवतावादी. दृष्ट काढावी तुमची. उदार कर्णच की नाही.'

'कर्ण नसेन पण उदार मात्र आहे थोडाफार मी.'

'मग टाका घर बहाल करून कुणाला तरी आणि व्हा वैरागी.' तिचं फनकारणं. मला वाटतं या गोष्टीला एण्डच नाही. ही पाण्यातली वर्तुळं आहेत. एकामागून एक मोठी होत जाणारी. माझं लक्ष कोपऱ्यात वरती जातं. तिथं एका कोळ्यानं छान जाळं विणलेलं आणि एका कडेला ध्यानस्थ योग्याप्रमाणं तो बसलेला. जाळ्याचे तंतू ताणून बसवलेले. त्याचं ते चक्रासन. तो माशीवर टपून बसलेला. केव्हा जाळ्यात गवसतेय याची वाट पहात.

'अग ते बघ कोपऱ्यात काय आहे.' ती भयंकर दचकते. चटकन् उठून बसते. ती तशी भित्री आहे. म्हणून बरं आहे. भित्र्या माणसाच्या अंगात धाडस नसतं. म्हणून ती जन्मात माझ्याशी घटस्फोटबिटस्फोट घेऊ शकणार नाही. माझ्यावर तिचं प्रेम असचं राहणार आहे. म्हणून सारं कसं छान. एखाद्या सुंदर चित्रासारखं. एकच वाईट आहे. ते म्हणजे ती संशयी आहे. पण हा संशयहि आवश्यकच नाही का? म्हणूनच ती माझ्यावर पाळत ठेवते ना? ती माझी राखण करते ना? ती माया मी ब्रम्ह. माया नुसती उत्पत्तीला कारण नसते असं माझं आपलं मत. ती ब्रम्हावरही लक्ष ठेवते त्याला कह्यात ठेवते. नाहीतर काहीच्या काही होऊन बसलं असतं

'काय आहें?' ती गळ्यात पडते.

'अगं ते जाळं. आपलं कोळ्याचं गं.'

'हाऽऽय. किती घाबरले मी!' तिचा सुटकेचा श्वास.

'भित्री आहेस झालं!'

'डोंगर पोखरून उंदीर काढलात.'

'दाखवलं ना तुला.'

'कशाला?'

'तू कोळी आहेस.'

'आणि तुम्ही?'

'मी माशी.'

'ते कसं?'

'कोळी आपल्या सावजावर टपून बसतो तशी तू माझ्यावर टपलेली असतेस. सापडलो की तू मटकावणार मला. छळतेस तू मला. ठार मारणार आहेस. तुझा काहीतरी हेतू आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रात, १९२३
विदर्भ साहित्य संघ

'म्हणजे ? बोलताहात काय तुम्ही ?'

'म्हणजे तेच. मला ठार मारून तू आपली संधी साधणार. तुझं कुणावर तरी प्रेम असेल त्याच्याशी तू फिरून लग्न करणार. म्हणून हे सारे प्रयत्न. मला सारे समजतात हे कावे.'

बघता बघता तिचा चेहरा केविलवाणा. ती गोरीमोरी त्या भुकेलेल्या कावळ्यासारखी नजर. डोळ्यात पाणी.

'इतकं कसं हो बोलवतं तुम्हाला निष्ठूरपणानं?'

'तुला कसं बोलवतं गं ? भेटेल त्या स्त्रीवर माझं प्रेम तुझ्या दृष्टीनं कसं बसू शकतं ? आश्चर्य आहे.'

'मेला माझा स्वभावच असा.'

'नेहमीचीच तुझी ही पिरपिर कशी सहन करावी माणसानं ?'

'इतर स्त्रियांच्या बाबतीत केव्हा बोलले मी ?'

'मागं माझ्या एका मित्राची बायको आली होती. आठवतं ?'

'आता पुन्हा काढू नका ते. तुम्ही तिचं गुणगान केलंत. तिच्या फॅशन्स तुम्हाला आवडल्या. तिची केश-रचना, तिचा टीचभर पदर, लिपस्टिक आणि कडीखालचं अर्धं उघडं कंबर. मला कसं सहन व्हावं ते ?'

'पण मी फक्त ती कशी मॉडर्न रहाते हे दाखवलं.'

'म्हणजेच ती तुम्हाला आवडली होती.'

'आवडली नव्हती. तिची वागण्या बोलण्याची रीत आवडली होती.'

'आणि मी काय आफ्रिकेतल्या मागासलेल्या जमा-तीतली स्त्री होते ?'

'तू मला आवडत नाहीस असं मी केव्हा म्हटलंय? पण अधिक टापटिपीनं राहिलीस तर मला अधिक आवडणार नाहीस का ?'

'तुम्हाला तर फॅशन्स आवडत नाहीत.'

'फॅशन्स नाहीत पण टापटीप आवडते.'

'म्हणजे मी गबाळी. मी तुम्हाला आवडत नाही. आलं एकूण तिथंच.'

'वर्तुळामागून वर्तुळं. लांबत जाणारी. पुन्हा निर्माण होणारी. केव्हा संपणार ही ? पण वर्तुळं संपली की पाणी संथ शांत होतंच ना ?

'मी तुला कधीहि गबाळी म्हटलेलं नाही. मला मात्र तू बावळट समजतेस. ते चालतं तुला.'

'चला, चहा करू या.'

'विषयाला फाटा देऊ नकोस. कितीतरी गोष्टींकडं मी कानाडोळा करतो.'

'कोणत्या गोष्टी ?'

'मला लांबवायचं नाहीय. दगडांच्या खाणीतून दगडाशिवाय निघणार काय ? तुझंहि माझ्यावर खरंखुरं प्रेम नाहीय् याचा मला कित्येकदा अनुभव आलाय्.'

'कोणता ? सांगाच.'

'त्या दिवशी तुला माहेरी जायचं होतं. बसवून द्यायला आलो. तुझा मामेभाऊ न्यायला आलेला. आणि मोटारीत तू त्याला चिकटून बसलीस खुशयाल. त्याच्या-शीच गप्पा मारतेस. माझ्याकडं लक्षहिं नाही.'

'चिकटून बसले ? काय बोलता तरी ! अहो भाऊ तो माझा.'

'भाऊ नव्हे भावड्या.'

'तुम्ही मला छळता आहात.'

'मी छळत नाही. तू मला छळतेस.'

'तुमचं माझ्यावर प्रेम नाही.'

'तेच तुणतुणं लावू नकोस. प्रेम म्हणजे काय ? चारचौघांची प्रेमं कशी असतात ? मी या घरात राहतो. तू माझी पत्नी म्हणून राहतेस. कारण आपलं लग्न झालेलं आहे. मी नोकरी करतो. तू घरी असतेस. घरचं कामधाम पहातेस. नवऱ्यासारखाच मी काम संपलं की घराच्या ओढीनं घरी येतो. तुला मिठीत घेतो. वगैरे वगैरे. कधी आजारी वगैरे पडलीस तर माझं काळीज उडून जातं. मी घाबरतो. सर्दी झाली तरी डॉक्टरला बोलावतो. मी तुझ्यावर बायकोसारखंच प्रेम करतो.'

एवढ्यात पेपरवाला पेपर टाकतो. मी पेपर घेतो. पहिल्याच पानावर मेलेल्या स्त्रीचा फोटो. मी भराभर वाचतो. कुणा श्री नागमणी नावाच्या उच्च श्रेणीतील अधिकाऱ्यानं राजेश्वरी नावाच्या पत्नीचा केलेला खून. नागमणीच्या मुलानं कोर्टापुढं दिलेली साक्ष. श्री नाग-मणीचं बड्या अधिकाऱ्याच्या बायकोशी लफडं. राजेश्वरीला हे आवडत नाही. ती एका सकाळी नाहीशी झालेली. मृत्यू संशयास्पद. खुनाचा संशय श्री नागमणी यांच्यावर. इत्यर्थ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ती बातमी मी तिला वाचून दाखवतो. तिची जिज्ञासा. शेवटी खोचून म्हणते.

'बघा किती निष्ठूर असतात पुरुष. तुम्हीहि माझा असा खून कराल काहो ?' माझ्या अंगावर सरकन काटा.

'आलीस मूळ पदावर ?'

'कारण–'

'समजलं. माझं तुझ्यावर प्रेम नाही. माझ्या मनात परस्त्रिया येतात. हो ना ? पण तू तरी शपथपूर्वक सांगतेस का की माझ्या शिवाय तुझ्या मनात कधी परपुरूष आलेला नाही सांग. घे शपथ! इथं हात ठेव!'

'म्–म्–म्.' ती झटकन् हात सोडवून घेते.

'एक गोष्ट सांगू ? मी परस्त्रियांकडं पहातो का ? पुरूषांची ती प्रवृत्तीच. नाहीतरी डोळे कशाला केलेयत? जगातलं सौंदर्य पहाण्यासाठीच की कुरूपता पाहाण्यासाठी ? मीहि पाहतो. त्यात अभिलाषा नसते. लग्नापूर्वी असेल थोडीफार. पण आता नाही. तसं पाहिलं तर प्रत्येक माणसाला पापी म्हणावं लागेल. लक्ष्मण एकच होऊन गेला. आई मुलग्यावर प्रेम करते, वडील मुलीवर करतात, भाऊ वहिणीवर. या प्रेमात अभिलाषा असते.'

'शी: ऽऽऽ'

'असं मी नाही म्हणत. फ्राईड नावाच्या आधुनिक मानसशास्त्रज्ञाचं हे मत आहे म्हणतात.'

'तुमचं आपलं काहीतरीच.'

'तुला नाहीच पटणार. तूहि पापी आहेस. शपथ घ्यायची टाळलीस त्याअर्थी. मी पापी आहे. सगळी माणसंच पापी. जाऊ दे. तू वुद्धू आहेस. डोक्यात प्रकाश पडणं कठीणं. तुला एकच कळतं, नवऱ्याचा छळ कसा करावा.'

'पुरे झाला चावटपणा. चला चहा पिऊया.' म्हणत ती गळ्यात पडते.

'जगात पतिव्रता स्त्रिया शोधून सापडणार नाहीत.' मी तिला आणखी टोचतो

'पुरे झाले हं आता.'

'हेहि माझं वाक्य नाही. 'गारंबीचा बापू'कार श्री. ना. पेंडश्यांचं आहे. बी. ए. ला मराठी होतं ना तुझं?'

'पास क्लासात पास झालेय. चला चहा घेऊ या.'

'आमचा आज चहावर बहिष्कार. मी घेणार नाही.'

मी उठतो. गॅलरीत जातो. कावळोबा टपून बसलेले. काव काव फडफड. पावाची मागणी. मला आता वाटू लागतं तो माझ्या पोटात शिरून कोकलतोय्. भयंकर तिडीक येते. वाटतं याचाच पुलावा करून खावा नाहीतर कच्चाच खावा. तो ओरडतो. मी त्याच्याकडं कानाडोळा करतो. त्याचा कानाडोळा माझ्याकडं केविलवाणं पहात असतो.

माझ्या पोटात कालमेल. कावळ्यांच्या किचाळ्या. चहा केळी काहीतरी पाहिजे. मी हल्ला करायला शोधत असतो. तेवढ्यात महाराणी येतात.

'गुळणा करा. चहा झालाय.'

मी पाय गच्च रोवतो. हाताला धरून लाडिकपणं ती म्हणते–

'चला वरं आता घरात.'

माझा विरोध लुळाच पडतो. माझा पडतो की पायांचा तेच कळत नाही. पाय आता चालू लागतात. म्हणजे मी नव्हे. चूळ भरतो. टिपायवर सारं सजून तयार. तिच्या मिस्किल डोळ्यात खट्याळपणा. लांडग्यासारखा मी शिरा केळी चहावर तुटून पडतो. चहा अगोदर मग शिरा मग केळी. ती खवचटपणानं हसत असते. मी प्रश्नार्थक पहातो.

'अगदीच वावळट नि गबाळे आहात झालं?' शेवटी माझ्याच पदरी बावळटपण आणि गबाळेपण. हे कसं झालं ?

'अहो, अगोदर शिरा खायचा, मग केळी, मग चहा घ्यायचा. खाण्याची देखील अक्कल नाही अगदी.' मी बावळटपणानं तिच्याकडं पहात राहतो आणि मसाल्याच्या सुपारीचा बकाणा मारतो.

सुपारीची डिश खाली ठेवतो. तोच दोन गोंडस हात गळ्यात येतात. काढ सखे गळ्यातील । तुझे चांदण्याचे हात म्हणत मी तिचे हात झटकन् काढून टाकून पळत पळत जातो. गॅलरीच्या दाराला कडी घालतो. तोवर रागावलेला चेहरा पुन्हा सुंदर हसरा झालेला. मी गळ्यात हात माळतो. तोच बाहेर गॅलरीत कावळ्यांची कावकाव. दूर कुठंतरी रेडिओवर लागलेलं गोड आवाजातलं गाणं उड उड रे काऊ । तूझे सोनेनी मढविन पाऊ ऽऽऽ.

● ●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शांतवन

आशा दामले

बाहेर रिमझिम पाऊस पडतो आहे भादव्याच्या सरत्या सरींचा: त्याचा आवाज अंधारात कालवला जात आहे. खाली रस्त्यावर क्वचित एकादी गाडी ओल्या रस्त्यावर रपरप करीत जात आहे. पण ते सगळं दूर आहे इथे या सातव्या मजल्यावरच्या शुभ्रतेने अच्छादलेल्या खोलीत. आहोत तू आणि मी.

तूं आणि मी . . . जननाच्या एका अतीव अनुभूतीच्या ध्यासाने एकत्रित बांधले गेलेलो. तूं आणि मी. तुझी जाणती जबाबदारी, माझी अजाण अपंगता, वसला पीळ न सुटणारा न जळणारा हा सुंभ जळाला तरी

उशापासचा दिवा मंद आहे. थेंबाथेंबाने प्राणरस ओतणारी डाव्या हाताच्या नसेत खोंवलेली ड्रीप एका निरिच्छ, निरपेक्ष शांततेने, आजूबाजूच्या वातावरणाला सुरकुती पडणार नाही या बेताने आपलं काम निःशब्दपणे करते आहे. पण तिचं अस्तित्वच हे सगळं वातावरण —हे झगडचाचं, हे लढचाचं या अंतिम कसोटीच्या प्रयत्नाचं हे उभं वातावरण निर्माण करीत आहे. मला ते विसरता येत नाही. ते नाकारता येत नाही. या काठावरचे आपले हे एकत्रित क्षण अखेरचे आहेत हे मला पूर्णत्वाने जाणवत आहे.

तूंच सांगितली आहेस ती कथा मला—लोकमान्यांच्या मृत्यूच्या वार्तेने हादरलेली शोकाकुल मुंबई विवशतेने सैरावैरा धावत होती — समुद्राच्या दिशेने, वर्तमानपत्र कचेऱ्यांच्या दिशेने, सरदारगृहाच्या दिशेने, टॅक्सी, व्हिक्टोरीया, गाडीघोडा काही मिळण्याची शक्यता नव्हती. अशा त्या वेळी-तूं वेदनेने बेचैन झाली होतीस, सुटकेच्या अपेक्षेने सुखावली होतीस, डोळचात प्राण आणून एका क्षणाची वाट पहात होतीस. हा क्षण त्या क्षणीच का येऊ घातला तुला कळत नव्हतं पण तो आला होता. उत्कटतेने सगळचा गडबड धांदलीला बाजूला सारून त्याने आपलं अस्तित्व प्रस्थापित केलं. तू आणि मी, त्या वेणांच्या वलयात, या सुखाच्या रिमझिमीत, कोलाहलापासून दूर, विलग झालो आणि बंधीत झाले, नव अस्तित्व निर्माण झालं, नाळ कापली गेली. एका नव्या अदृश्य बंधनाला तयार करून. तू आणि मी. दोन नवनिर्मिती, एका सजाण सबल, जबाबदार मायेच्या नाभीतून उगवलेलं तुझं नवं अस्तित्व, अन् अजाण, अबल, त्या मायेच्या आधारावर पहिला श्वास घेणारं माझं अस्तित्व.

जागी आहेस ना तू ? आठवतं ना ते ? तो एक यज्ञ, ती एक आहुती, ती एक निर्मिती आज आपले हे दोन जीव — त्या क्षणांना साक्षी असलेले — हा क्षण अनुभवित आहेत. हाही यज्ञ ! पूर्तीचा, समाप्तिचा, पूर्णाहुतीचा.

वेदना तेव्हाही होत्या, आजही आहेत. तेव्हा सुटकेची वाट पहात होतीस. आजहि आता सुटका आहे· या क्लेशांपासून, या रहाटापासून, या ताणांपासून— सुटका, या चक्रापासून, या हवं नकोपासून या आहे नाही पासून.

या सुटकेची जरूर आहे. हे शरीर आता थकलं आहे. त्याने खूप प्रवास केला. काटचाकुटचातून, खाचाखळग्यांतून, धुक्यापावसातून, उन्हातान्हातून, त्या प्रवासाने सामर्थ्य आलं होतं एक प्रकारचं, निर्भयता आली होती. आत्मविश्वास निर्माण झाला होता. डोंगरदऱ्या पालथ्या घालायचा, सात समुद्र ओलांडून जायचा, आकाशयानात फिरून यायचा. पण तरीहि रुतल्या काट्यांनी पावलांना क्षते पाडीली. रुतल्या खडचांनी तळवे हुळवे झाले. धूळधूर नाकातोंडात गेले. शीण आला, थकवा आला, आता आवश्यकता आहे स्नानाची, महास्नानाची ? निद्रेची, महानिद्रेची !

आठवतं. माझ्या हट्टासाठी आपण सिंहगड पहायला गेलो. पहाटेपासून उठलो होतो, तू तर आदल्या दिवसापासून तयारीने दमलेली होतीस. दिवसभर उन्ह अंगावर घेतलं; चढण जाणवली, तसा उतारहि जाणवला. हातात हात धरून जपून जपून उतरवलंस मला. घरी आल्यावर रात्री तेल लावून न्हायला घातलंस गरम गरम पाण्याने, तू पण नहालीस. गरम गरम पिठलं भात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केलास. प्रसादाच्या अमृताच्या चवीने आपण खाल्ला. आणि रात्री दिवा बंद करून वळकटी पसरून एका शालीच्या आवरणाखाली आपण दोघी निद्रेच्या स्वाधीन झालो — सकाळी उठलो तेव्हा एक अनुभूतीच्या मदानें. आनंदाने विशाल झालेली मते आदल्या दिवसाचे श्रम विसरून गेली होती.

आजहि असंच होणार आहे. आजची निद्रा महा-निद्रा आहे तुझी. बाहेर पाऊस आहे, अंधार आहे. याची कशाला पर्वा ? रिमझिमत्या वेदनेने ओथंबलेला हा क्षण समोरा आला आहे. निद्रेचा, महानिद्रेचा, विश्रांतीचा चिरविश्रांतीचा, त्यात मी पण सहभागी आहे. आज तुझ्या-जवळ आहे म्हणून, नसते तरीही ! तू समग्र जीवनाचा त्याग करीत आहेस, माझ्या जीवनाला तुझ्या समग्र अस्तित्वाचा त्याग करावा लागणार आहे. वेदना तुला आहेत, मला पण आहेत. ही अनुभुति कधी तरी मला उपयोगी पडणार आहे, माझ्या मनाच्या घडणीचा अभंग चिरा बनणार आहे. तो त्या ऑगस्टच्या रात्री निर्माण झालेला पाश तुटताना दोन्ही बंधितांना हादरे देणार आहे. आणि त्याची ती पांगळी काटछाट जाणीवेत रुतत रहाणार आहे. तू मात्र जाणार आहेस आता जाणीवेच्या पलिकडे.

तुला वेदना सहन कराव्या लागत आहेत पण त्याबरोबर तुला सुटकेचे आश्वासन आहे. या यज्ञात आता तुला आहुति टाकायच्या आहेत.

प्रथम अग्नि प्रज्वलीत व्हायला काष्टमय झालेल्या समिधा त्या कटु स्मृति. त्या लवकर बाळतात. कुणाचं देणं घेणं आता राहिले नाही. आता भरपाईचा वायदा उरला नाही. कुणावंर ओझं राहिलं असेल त्यांना प्रणाम करायचा. कुणाचं ओझं वाळगलं असशिल तर ते उतर-वून ठेवायचे. या दाराच्या पलीकडे काहीच नेता येत नाही. सगळ उतरवून ठेवायचे, ही वस्त्र अन् हे शरिरसुद्धा....

त्या मधूर स्मृतिचे कलश, ते मात्र अजून हवेत, या ड्रीपसारखे, शेवटपर्यंत सोवत करणारे. वेदनांची तीव्रता कमी करणारे. ही माझ्या वडलांनी दिल्लीहून आणलेली शाल, ती अशी पायापाशी असूदे काकू करता, आत्यां-करता आणलेली लुगडी विसरून जा — त्यांचा या शालीशी काही संबंध नाही. ही तुझ्या सासूने दिलेली तेलाची झारी आणि कुंकवाची कुयरी. या कुयरीतलं कुंकू फक्त २०–२५ वर्षंच लावलेस. पण तरीहि ही कुयरी तुझी आहे. तुझं भाग्य त्यात होत. ती आज मुद्दाम देवघरातून उचलून इथं तुझ्याजवळ आणली आहे.

हे तुझ्या नातवंडा पतवंडाचे सगळे फोटो, पांची खंडात तुझा वंशवेल विस्तारला आहे. त्या सर्वांना तुझी सय येते. त्यांच्या रक्तांना उधाण येतं तेव्हा त्यात तुझ्या सहवासाचं अमृत घुसळलेलं असते.

ही स्मरणीका. कर आठव त्या सगळ्या क्षणांची. पहिल्या बाळंतपणाला हिरवागार चूडा लेऊन माहेरी आलेली मी, तुझ्या डोळयात त्याचं प्रतिबिंब अजून असेल. शिक्षण पूर्ण करून विलायतेहून परतलेला दादा. भिंतीभिंतींना खुदूखुदू हंसवणारी मैनावहिनीची पहिली पावलं. नंतरची डोहाळ जेवणं, नातवंडांची कौतुक आणि तुझी एकसष्ठी आठवतं लेक लेकी सुना जावई नातवंड पतवंड आम्ही पंचवीस माणसं होते. आणि पुरणपोळ्या करायचा तुझा हट्ट. अजून हाताला केशराचा वास असेल बघ, त्या दिवशीच्या पुरणाचा.

आता कृतार्थ आहेस. कृतकृत्य आहेस. कर्मयोग संपला आहे. आता यज्ञ आहे आहुतीचा, त्या बघ ज्वाळा प्रज्वलीत झाल्या आहेत. बाहेरच्या धग देणाऱ्या लाल-नारींगी, धूर देणाऱ्या, त्यांच्याकडे लक्ष नको देऊ. आतला गाभा बघ, निळा, शांत, पूर्ण ज्वलीत, पूर्णत्वाचे प्रतीक, तोच आहुति स्विकारणार आहे.

ते वलय बघ इंद्रधनूच्या रंगाचं. ते विस्पारित जात आहे. मधेच आकुंचित होत आहे. क्षणाक्षणाला रंग बदलत आहे. पण हा भास आहे, नजर स्थिर कर, केंद्र-बिंदूकडे लक्ष दे, ते छेदायचं आहे. जाणीव ठेऊन, तुझ्या नजरेने, तुझ्या वृत्तीने, तुझ्या अखंड अस्तित्वाने त्याचा वेध घ्यायचा आहे. लक्ष केंद्रित कर. आता आजूबाजूला कुणी नाही कुणाचा आवाज ऐकू येत नाही. जितकी तुझी नजर स्थिर होईल, मन निर्भय होईल, तितका तो छेद सुलभ होईल. हळूहळू आजूबाजूचे रंग पालटायचे थांबतील. वलय विस्ताराची राहून जातील. आतला निळा रंग अवकाश भरून राहील. केंद्र आणि वर्तुळ हा भेद मिटेल. वर्तूळ लहान होईल, केंद्र विशाल होईल. त्या पलीकडचा शांतीचा निळा रंग सर्वत्र प्रस्था-पित होईल. हात पाय सैल सोड, श्वास शांत होऊ दे. पण त्याचा ताल इतक्यात सुटु देऊ नको, डोक्याखालची ऊशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काढू नको ? नको. कुशीवर होऊं नको. नजर वर हवी आकाशाकडे. या छतापलीकडे त्याचा विस्तार आहे खरा पण या छताला छेद देऊन तेच इथे येणार आहे वसतीला आजच्या रात्री — बाहेर पाऊस पडतो आहे त्यात अंधार कालवला आहे, रस्त्यावर एकाकी वाहन रपरप करीत जात आहे.

तो नाद ऐकू येत आहे ? शिवालयाच्या गाभाऱ्यातला ऊंच हात करून वाजवलेल्या घंटेचा, त्या नादाची वलयं गाभाऱ्यात प्रतिध्वनीत होत आहेत, पण हळूहळू मिटणाऱ्या कमलदलासारखी. भृंगाला कुशीत घेऊन मिटत आहेत. आता प्रतिध्वनी अस्पष्ट होत आहे. मूळ ध्वनीचे रूप ओंकारात विसावत आहे. 'अकार ऊदर विशाल,' पण अजून हा ऐक म् म् हा गाभा सर्व नादाचा, ध्वनीचा, प्रतिध्वनींचा, यातच श्वास, प्राण, शेवटी विसावणार आहे. पहिला आकार ऐकू येतो आहे ना, हळूहळू ऊकार आणि मग म कार, शांत, निशःब्द. अंतिम, प्राणाला विसावणारा ! 'अकार' ऐकू येतो आहे ना ? तो दोर आता सोडू नकोस. पावसाची रिमझिम चालू आहे. त्यात अंधार कालवलेला आहे. रस्त्यावर एकाकी वाहन रपरप आवाज करीत जात आहे पण तुझ्या अकाराचा भंग होणार नाही.

ते रूप आठवतं, बालरूप, लाडू, लंगडा बाळकृष्ण, नंतरचा राधेपाशी रमणारा, त्याही नंतरचा अर्जुनाला युद्धक्षेत्रावर गीता सांगणारा. पण आज हे रूप आठव, शिवलिंगाचं, अभिषेकाच्या धारेखालचं शिवलिंग, कुठे चिर नाही, भेग नाही, छिद्र नाही असं शिवलिंग, चेहरा नाही, अवयव नाही असं रूप. ते विध्वंसक, पण तेच विशाल, तेच अंतिम दयामयी. विनाशात स्वातंत्र्य असतं. अस्तित्वाचा नाश म्हणजेच सुखदुखाचा नाश.

या चक्राची गती आता संपणार आहे. भिरभिरत्या गतीला विश्रामाची ओवळ येईल कदाचित. म्हणून शरीराची गती संपते तशी मनाची पण गती हळू हळू कमी कर. मनाचा वेग फार मोठा असतो, म्हणून हे कठीण पडेल. सातासमुद्रापलीकडून त्याला इथे आण आणि स्थिर कर. कारण त्याला अनुभवायची आहे ही शांति, ही विश्रांती.

हा क्षण अटळ आहे. अपेक्षित आहे. त्याचे स्वागत कर कारण तो सुखाचा आहे. बघ, आता हातापायाला संवेदना राहीली नाही. ती गळून पडली, अजून मन जागृत आहे, त्याला गती आहे विस्तार आहे जाणीव आहे, ती शेवटपर्यंत टिकणार. पण त्या जाणीवेच्या कक्षेत, आता तू आणि तो निरंतन गाभा एवढ्यांनाच जागा असू दे. तू कदाचित तिथून निर्माण झाली असशील. तिथेच परत जात आहेस. आता प्रवासाच्या आठवणी नकोत प्रवासाची सुखदुखं त्याच्या उद्दीष्टांच्या मर्यादेत येईपर्यंत भोगायची असतात. आता पायावर पाणी घे आणि उंबरठ्याच्या आत प्रवेश कर, प्रसादाचे ताट आत वाढून तयार आहे.

शांत शांत हो, हे धागे तुटतांना थोडसे दुखायचेच पण या जखमा पुवळणार नाहीत, ठमठसणार नाहीत, या व्याधींच्या पलीकडे तू जात आहेस. मृत्यू करुणामय आहे, तो सगळी आग विझवणार आहे. त्याच्या कुशीत माया आहे. तू आता मुक्त आहेस विमुक्त आहेस, हे सत्य आहे, हे ज्ञान आहे याला तू कवळणार आहेस, ही जीवाशिवाची भेट आहे, हे मंगल आहे. हे विलयन आहे, हे आत्मार्पण आहे. आजपर्यंत कमावलेला विश्वास धैर्य तुझ्या पाठीशी उभे आहे. उरलं सुरलं अमंगल इथे जळून जात आहे, या पुढे तीर्थरुपता आहे, चंदनाचा सुवास आहे, ओंकाराचा नाद आहे शांत अयांग निळाईची साथ आहे.

चेहऱ्यावर सुरकुती नाही. डोळे पूर्ण मिटलेले आहेत, सैल झालेले हातपाय शरीराला समांतर स्थिर आहेत. उदराची वक्षाची हालचाल आता स्थिर झाली. या निर्विकारतेत तेज आहे. तुझ्या शांतीच्या वेदनेची धूळ मी आता भाली लावते. तुझ्या हवनाचा चंदनी गंध मी श्वासात भरून घेते. आणि त्या दिव्य मीलनाची मी एकमेव साक्षीदार या अनुभुतीचा कण मनात जपत मागे फिरते.

मला मागे फिरायला हवं, बाहेर पाऊस रिमझिम पडत आहे. त्यात अंधार कालवला आहे. एकाकी वाहन रपरप आवाज करीत रस्त्यावरून जात आहे. मला त्याची दखल घ्यायला हवी आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कॉन्शस

सुनील जोग

ती : ए ऽऽ.
तो : अं. . .?
ती : पुन्हा भेटणार ना ?
तो : अं. . .? हो भेटेन की.
ती : पण केव्हा. . . .?

तिनं असं विचारलं की तो मनातच म्हणतो, 'तुला कॉफी ऑफर करायला पैसे साठले की मग.'

तर प्रेमात असतानाच्या भावना नक्की आठवत नाहीत पण काही 'शॉटस्' मात्र चांगलेच लक्षात राहिलेत; म्हणजे मनावर अगदी कोरले गेलेत. प्रेम म्हणजे नक्की काय अनुभव, हॅपनिंग की आणखी काही ? तरीपण प्रेम करीत असे पूर्वी आणि सध्या करतोय. म्हणजे रोमिओ, मजनू वगैरे नव्हे.

ठराविक साच्याच्या मुलाखती वाचतांना जशी जाणीव होते तसं तिच्याशी बोलतांना आता या टाईपनं बोललं पाहिजे. तिचा मूड सांभाळला पाहिजे किंवा या सिच्युएशनवर एखादा नर्म विनोद केला पाहिजे अशी ही सापेक्ष जाणीव सतत बोचणारी किंवा दुखावणारी. या जाणीवा वाढायला लागल्या की स्वतःचं हे डिसेक्शन करण्यापेक्षा लहान वर्तुळात उभं रहावसं वाटतं म्हणजे लिमिटेड गरजा आणि लिमिटेड कॉन्शस.

आज भिकाऱ्याला पैसे टाकावे तसं चहा घेताना तिनं वाक्य टाकलं 'चपला घे नवीन. किती तुटल्यात ?' बिल देतांना ती आणखी एकदा टोचते 'आठवणीनं घे हं' आणि माझे हात ? हात पैसे शोधताहेत बिलाचे अन् चपलाचे.

हाच शॉट Vice-Versa! मी आणि पूर्वीची ती. कॉलेजवर मी. ती यायची. मी नेहमीसारखाच तिला पिक्चर्स, चहा वगैरेसाठी घेऊन हिंडायचा पण भारी लहरी होती ती. कधी कधी ती फिरायला बाहेर पडली की माझा दृष्टीक्षेप नकळत एखादेवेळी तिच्या पायांकडे जायचा आणि ती अनवाणी असली की मला कसंतरी वाटायचं. आणि ती चपला विसरल्याचा अविर्भाव करत चपला घालायची. म्हणजे मी नसतांना ही अनवाणी फिरते काय ? कदाचित काटकसर असावी, टाचा लवकर झिजू नयेत म्हणून, माझी कुशंकेची पाल नेहमीप्रमाणेच चुकचुकायची.

हे आठवलं की वाटायला लागतं की आताच्या 'ती' चा विचार पूर्वीच्या मी' सारखा नसेल ना ? सध्या 'ती' लेक्चरर आहे आणि आपण बेकार. तिनं कॉफी घेऊ या का म्हटलं तर मी शंभर फाटे फोडतो— 'आता नको. घरी वेळ होईल शिवाय हॉटेलमध्ये मोकळेपणानं गप्पा मारता येत नाहीत' या सारख्या अनेक थापा आणि टाळाटाळ; कारण पैसे ? जरी बिल तिनं दिलं तरी मनावर एक ओझं वाटतं. पण प्रेमात असला विचार येतोच कसा ही आणखी एक शंका. तिची पार्टी म्हटलं की माझा जीव खाली-वर होतो. पार्टीत तिचे मित्र, प्रोफेसर्स; त्यांच्या नेहमीच्या पोझीशनमधल्या गप्पा, जोक्स्, मध्येच ती ओळख करून देते,— 'मीट माय फ्रेंड. . ' तिच्या या नेहमीच्या परिपाठानं अगदी गुदमरायला होतं. मग कित्येक दिवस मी तोंडच दाखवत नाही. मग ती ओरडते— 'असं रे का वागतोस, तू भेटत जा. तू भेटला नाहीस तर मी. . . मी... माझी शपथ ' तिची समजूत काढण्यासाठी भारावल्यासारखं करून मी म्हणतो— 'मी कधी कधी असं का वागतो हे माझं मलाच कळत नाही. कदाचित् या जन्मी तरी मला ते कळणार नाही !'

मग ती विचारी माझी समजूत काढते— 'ए असं नको रे बोलूस वेड्यासारखं.' मग ती नेहमीचा प्रश्न विचारते— 'आपण लग्न केव्हा करायचं ?' मी उगीचच गंभीर होतो— अग पण तू विचार का करत नाहीस, मी हा असा बेकार. . .' ती समजावणीच्या सुरात म्हणते— 'नोकरी लागेल रे, तोपर्यंत मी आहे ना, माझं घर आहे तोपर्यंत.' मला अधिकच मिंधा झाल्यासारखं वाटतं.

ती पिक्चरला नेते तेव्हा देखील हीच जाणीव. मग

(पान १४० वर पाहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पतीचा स्त्रीधनावरील अधिकार

संध्या देव

'यज्ञार्थं द्रव्यमुत्पन्नं तस्माद्द्रव्यं नियोजयेत् ।
स्थानेषु धर्मयुक्तेषु न स्त्रीमूर्खविधर्मिषु ॥' –
कात्यायन.

यज्ञासाठीच द्रव्य उत्पन्न होते. धर्मकार्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. स्त्री, मूर्ख, विधर्मी यासाठी त्याचा उपयोग केला जात नाही. असे कात्यायनाचे मत आहे. यावरून स्त्रीला धनाच्या बाबतीत अधिकार नाही असे दिसते.

पण असे असूनही स्मृतींमध्ये 'स्त्रीधन' हा विषय चर्चिला गेला आहे. मनु, याज्ञवल्क्य, नारद इत्यादींचे त्यावर महत्वपूर्ण विवेचन आढळते. स्त्रीला जरी धनावर अधिकार दिला गेला असला तरी तो संपूर्णतया दिला गेलेला नाही. तर कांही विशिष्ट परिस्थितीत त्या अधिकारावर बंधने पडलेली आढळतात.

मनूने म्हटलेच आहे–

'भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाऽधनाः स्मृताः ।
यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तत् धनम् ॥'
(अध्याय ८.४१६)

पत्नी, पुत्र व दास हे 'अधन' म्हणजे निर्धन मानले जातात पत्नीला जर 'निर्धन' मानले तर 'स्त्रीधन' कल्पनेला धक्का बसतो. तर याचा अर्थ असा की स्त्रीचे धन असतेच पण तिचा जो मालक असतो त्याचा त्यावर अधिकार असतो. म्हणजे क्रय–विक्रय दृष्टीने स्त्रीचे परतंत्रत्व दाखवले आहे.

याज्ञवल्क्य व नारद इ. च्या मते पती व पत्नी धनाच्या दृष्टीने स्वतंत्र असतात व सर्वसाधारण नियम असा आढळतो की पतीच्या कर्जाची जबाबदारी पत्नीच्या धनावर व पत्नीच्या कर्जाची जबाबदारी पतीच्या धनावर नसते. असे जरी या स्मृतीकारांचे मत असले तरी त्याच स्मृतींमध्ये असे उद्धृत केले आहे कि कांही परिस्थितीत स्त्रीच्या स्त्रीधनाचा उपयोग पतीने करणे आवश्यक आहे. आपस्तंबाचे मत जवळजवळ मनुसारखे आहे. त्याच्यापुढे तो म्हणतो कि पतीच्या धनावर पत्नीचा व पत्नीच्या धनावर पतीचा अधिकार असतोच (प्रश्न २, पटल ४ थे, कांड १४ vv. १६–१८; W. and B. ३०८) त्याचे हे मत न्याय्य वाटते.

पण त्याच्या या नियमाचा पुष्कळ टिकाकारांनी थोडा विस्तार केला. त्यामुळे पतीचा पत्नीच्या धनावरील अधिकार काही बाबतीपुरताच सिमीत राहीला. कांहींनी त्याला विशिष्ट परिस्थितीतच स्त्रीधनाच्या योग्य पण मर्यादीत उपभोगाला मान्यता दिली.

'पत्नीच्या धनावरील पतीचा अधिकार' या विषयाचा आपण आढावा घेऊ त्या अधिकारांची मर्यादा कोणत्या स्मृतीकारांनी व टिकाकारांनी कशी ठरवली ते पाहु.

याज्ञवल्क्य म्हणतो–

'दुर्भिक्षे धर्मकार्येच व्याधौ संप्रतिरोधके ।
गृहितं स्त्रीधनं भर्ता न स्त्रीयै दातुमर्हति ॥'

दुष्काळात, धर्मकार्यासाठी, निरनिराळ्या व्याधींच्या निवारणासाठी जर पतीने स्त्रीधन घेतले तर ते त्याने परत करू नये. ती त्याची नैतीक जबाबदारी नाही.

यावर कांहींनी भाष्य केलेले आहे.

'एवं प्रासंङ्गीकमुक्त्वा प्रवृतमेवाह भर्तृवचनादन्योअगादिर्दृभिक्षादि गृहितमपि न दद्यादिति गम्यते । संप्रत्येवादत्त्वा मा यास्यसीत्येवं रोधाद्धरणं संप्रतिरोधकम् । विध्व. २।१५१

'एतेषु निमित्तेषु स्वकीयधनाभावे स्त्रीधनं गृहित्वेता आपदस्तरेत । प्रतिदानसमर्थधनाभावे च तत्तस्यै न दद्यात् ।' – असे अपरार्कीत म्हटले आहे.

'संप्रनिरोधके वन्दीकरणादौ । चकारेण भर्तृधंनाभावे सतिति सर्वत्रान्वितं विशेषणं समुच्छिनोति शेषं सुगमम् ।' – वीरमित्रोदय

या सर्व गोष्टींवरुन लक्षात येते की संकटाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिस्थितीत सापडल्यास स्त्रीधनाचे साह्य पतीने घेतल्यास त्याला दोष लागत नाही. व त्याने ते परतही करु नये.

याज्ञवल्क्याच्या मतावर भाष्य करताना विज्ञानेश्वराने ('कार्य' याचा अर्थ धर्मकार्य व 'विपत्ति चा अर्थ कैदी झाल्यास वा शारिरीक दंड झाल्यास असा होऊन) म्हटले आहे कि या व्यतिरिकत परिस्थितीत जर स्त्रीधन त्याने खर्च केलं तर त्यानें ते लगेच परत करावे. 'न स्त्रीयै दातुमर्हति' या विधानाचे स्पष्टीकरण विरमित्रोदयात पुढीलप्रमाणे केले आहे कि (विपति इ.) तशाच इतर कारणांमुळे तो जर असमर्थ असेल तर त्याने ते स्त्रीधन परत करु नये. पण मित्रमिश्रांच्या मते असे हे आपत्तीत खर्चीत केलेले धन परत करण्यास तो समर्थ असेल तर त्याने ते लगेच परत करावे. (Tagors translation. p. 264).

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात म्हटले आहे

'प्रतिरोधकव्याधीदुर्भिक्षभयप्रतिकारे धर्मकार्ये च पत्यु: ।
तदात्मपुत्रस्नुषाभर्मणि प्रवासाप्रतिविधाने च भार्या-या भोक्तुमदोष: ।।

असे याज्ञवल्क्याप्रमाणे आपले मत सांगून शेवटी त्यानेही असाच इशारा दिला की 'इतोऽपि स्त्रिधनस्य व्ययात् भर्तुरदोष इत्याह ।'

देवलांच्या मते अन्न, अलंकार, अवांतर धन इ. ची प्राप्ती हे जर स्त्रीला इतर जवळच्या नातेवाईकांकडून मिळाले असेल तर त्यावर पतीचा अधिकार रहात नाही. पण पती जर अत्यंत विपत्तीत सापडला तर तो त्याचा उपयोग करु शकतो. (II 147) देवल पुढे म्हणतात—

'वृथा मोक्षे च भोगे च स्त्रियै दद्यात्सवृद्धिकम् ।
पुत्रार्तिहरणे वापि स्त्रिधनं भोकतुमर्हति ।।'—
देवल 9.by स्मृतीच् II P. 283.

म्हणजे कारणाशिवाय पतीने स्त्रीधनाचा उपयोग केला तर ते 'सवृद्धिकम्' म्हणजे व्याजासकट पत्नीला परत करावे. पण तेच जर कुटुंबाच्या वा मुलांच्या संकट निवारणासाठी खर्च केले तर त्याचा दोष पतीला लागत नाही किंबहुना त्याचा तो अधीकारच आहे.

यावर कांहींनी पुढीलप्रमाणे भाष्य केले आहे.

'मोक्षस्त्यागो दानमितियावत् । अत्रपतिर्नार्हत्यनापदिति पत्युत्वापत्तिस्त्रीधनभोगार्हता नान्येवमिति सूचितम् ।' — रत्न. १६२.

धृतगीतादिप्रयोजनो धनव्ययो वृथा मोक्ष: । मोगास्तु स्त्र्यन्नपानाद्युपयोग: पुत्रार्तिहरणे स्त्रीधनमुपभोग्यं ग्राह्यमित्यर्थ: ।' — अपरार्क.

देवलांच्या विधानातील 'विपत्ती'चे भाषांतर विरमित्रोदयात 'भुक व इतर तशाच गोष्टींमुळे होणाऱ्या दु:खाने ग्रस्त' असे केलेले आहे. (2. W and B. 77) आणि 'च' याचे स्पष्टीकरण 'धनाच्या अत्यंत निकडीच्या अवस्थेत पत्नीच्या संमतीशिवाय तीचे धन खर्च करण्याचा अधिकार पतीला आहे' असे केलेले आहे.

स्मृतीचंद्रीकेत असे मत आहे की प्रतिष्ठेचा पोहोचलेला धोका स्त्रीधनाच्या उपयोगाने टळत असेल तर त्याचा उपयोग पतीने करावा. तो त्याचा अधिकार आहे.

विवादचिंतामणीत म्हटले आहे की नोकरी व कामधंद्याला मुकवणारा आजार असेल म्हणजे अर्थार्जनाचे सर्व मार्ग बंद करणारा आजार असेल तर त्यात खर्च झालेले स्त्रीधन पतीने परत करु नये. q. in Marriage and stridhand - Mr. Banerjee).

कात्यायनाच्या पुढील विधानाने एक नविन नियम सांगीतला आहे. पतीचा पत्नीच्या धनावर अधिकार आहे हे मत सर्वांना मान्य आहे. पण तो जर जबरदस्तीने आपला अधिकार कारणाशिवाय गाजवू लागला तर त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी कात्यायन म्हणतो— 'न भर्ता नव च सुतो न भातरो न च ।

आदाने वा विसर्गे वा स्त्रिधने प्रभविष्वव: ।।
यदि ह्येकतरस्त्वेषां स्त्रीधनं भक्षयेद्वलम् ।
सवृद्धि प्रतिदाप्य: स्यात् दण्डं चैव समाप्नुयात् ।।

म्हणजे स्त्रीच्या कायदेशीर धनावर तिच्या पित्याचा मुलाचा वा पतीचासुद्धा अधिकार नसतो आणि तिच्या ईच्छेविरुद्ध जबरदस्तीने यापैकी कोणीही स्त्रीधनाचा उपभोग घेतला तर ते व्याजासकट त्याला फेडावे लागेल. एवढेच नव्हे तर हा गुन्हा केला म्हणून काही रक्कम दंड म्हणून राजाला पण द्यावी लागेल. पण जर पत्नीच्या अनुमतीने स्त्रीधन खर्च केले व तिच्याशी चांगली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बांगणुक ठेवली तर फक्त मुद्दलच परत करावे लागेल कात्यायनाने म्हटलेच आहे 'मूलमेव तदा दाप्यो ।'

देवल म्हणतो–

'व्याधितं व्यसनस्थं च धनिकैश्चोपपिडितम् ।
ज्ञात्वा निसृष्टं सम्प्रीत्या दद्यात्मेच्छया हि सः ॥

पत्नीच्या लक्षात आले कि पती व्याधीग्रस्त आहे किंवा सावकारांनी घेरलेला आहे व अशावेळी जर तीनें स्वतः खुशीने धन पतीला दिले तर ते स्वतःच्या ईच्छेनुसार सोयीनुसार परत करावे. या ठिकाणी वेळेचे बंधन नाही. पण याला अपवाद कात्यायनाने सांगीतलेला आहे. –

'अथ चेत् स द्विभार्यः स्यात् न च तां भजते पुनः ।
प्रीत्या विसृष्टमपि चेत् प्रतिदाप्यः स तद्बलात् ॥

म्हणजे 'यया प्रीत्या, यया भार्यया धनं दत्तं तां पतिर्न भजते ऋतुकालादावपि तया ग्रासाच्छादनवासानामाच्छेदो वा भवती, तथा व्याधाद्युपहतं पतिमालोक्य स्वधनं दत्तमपि तया बलाद्ग्राह्यं, इति अयं शास्त्रधर्मः।' असे त्याचे विवेचन कात्यायनाने केलेले आहे. म्हणजे पतीच्या विपत्तिसमयी पत्नीने स्वतःहून कांही धन दिले. पुढे पतीने दुसरे लग्न केल्यावर प्रथम पत्नीचा योग्य तो मान ठेवला नाही, तिचे पालनपोषण केले नाही तर तीचे स्त्रीचे धन घेण्याचा त्याला अधिकार रहात नाही. व त्याने घेतलेले स्त्रीधन जर तो परत करत नसेल तर तीने ते जबरदस्तीने त्याच्याकडून घ्यावे हा तीचा अधिकार आहे.

स्त्रीच्या धनात 'सौदायीक' धनाचा समावेश केल्या जातो. त्या धनावर पती जोपर्यंत जीवंत असतो तोपर्यंत त्याचाच अधिकार असतो. असे वीरमित्रोदयाचे मत आहे. (2 W. and B. 70). पण या उलट मत आपल्याला कात्यायनाच्या भाष्यात आढळते. तो म्हणतो 'सौदायिके सदा स्त्रीणां स्वातंत्र्यम् परिकिर्तितम् ।' का. ३०६ (कात्यायन स्मृती सारोद्धार. P ११०). पण असे जरी असेल तरी 'तुकाराम v. गुणाजी 8 Bom. H. C. 129 या केसमध्ये विरमित्रोदयाच्याच नियमाचा उपयोग केलेला आढळतो. (Nature of stridhana – शरदचंद्र चौधरी).

स्त्रीधनावरील अधिकाराच्या बाबतीत स्त्रीसाठी 'नैतीकता' (Morality) हा एक निकष ठेवलेला आहे. यावरुन त्यावेळच्या नैतिकतेचे दर्शन घडते. स्त्री जर व्यभिचारी, निष्कारण खर्चिक वृत्तीची असल्यास तीचा स्त्रीधनावर अधिकार रहात नाही. ते धन पतीच्या ताब्यात जाते.

'अपचार क्रियायुक्ता निर्लज्जा चार्थनाशिका ।
व्यभिचाररता वा च स्त्रीधनं न च गार्हति ॥–
कात्यायन III SG.

स्वतःच्या विद्येने, मेहनतीने कोणी धनार्जन केल्यास त्यावर इतरांचा अधिकार नसतो असे मनूने म्हटले आहे. पण स्त्रीयांनी जरी कलाकुसर इ. नी धन मिळवल्यास त्यावर तीचा अधिकार नसतो तर पतीचा असतो. यावरुन ती किती परतंत्र होती हे लक्षात येते. एवढेच नव्हे तर मैत्रीण इ. निस्त्रईनांकडून भेटीदाखल धन वगैरे मिळाल्यास त्यावरही पतीचाच अधिकार असतो.

'प्राप्तं शिल्पैस्तु यद्वित्तं प्रीत्या चैव यदन्यतः ।
भर्तुः स्वाम्यं भवेत्तत्तु ॥ कात्यायन.

यावर 'शिल्पैः तन्तुवायादिस्त्रीणीर्यद्वस्त्रवायनादिनां प्राप्तं भर्तृ प्रीत्या च यदन्यैर्दत्तं तत्र भर्तृः स्वामित्वमित्यर्थः ।'– बाल २।११४ असे भाष्य आढळते.

दायभाग व विरमित्रोदयाच्या मते अशा स्त्रीधनावर पती विपत्तीग्रस्त नसला तरी त्याला पूर्ण अधिकार असतो. पण तसे स्वातंत्र्य स्त्रीला नसते. तीचेच धन असते पण त्याचा क्रय, विक्रय किंवा देणगीदाखल कुणाला देणे याचा अधिकार तीला नसतो. Muthu Ramkrishna V. Marimuthu Gouhdh. 38 Mad. 1036 at p. 1060. या केसमध्ये या विधानाचा आधार घेतलेला आढळतो. यात स्त्रीचा धनावरील अधिकार त्यांना मान्य आहे पण त्याला कांही बंधने घालून तो पतीच्या ईच्छेचा विषय बनवलेला आढळतो.

स्वतःच्या चैनीसाठी पत्नी ज्याच्यावर अनेकांची मालकी आहे त्याचा, त्या धनाचा उपयोग करू शकत नाही. एव्हढेच नव्हे तर स्वतःच्या धनाच्या बाबतीतही पतीच्या अनुज्ञेशिवाय त्याचा उपयोग ती करू शकत नाही.

'न निर्हारं स्त्रियः कुर्युः कुटूम्बाद्बहुमध्यगात् ।
स्वकादपि च वित्ताद्धि स्वस्य भर्तुरनाज्ञया ॥
मनु. अध्याय ९ वा १९९.

(q. in History of Dharmashastra. Vol. 3 – P. V. Kane).

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
अनुक्रमणिका
विदर्भ साहित्य संघ

स्त्रीधनाचा उपयोग ही गोष्ट पतीच्या अधिकारातील आहे. त्याने जरी कर्ज भरण्यासाठी त्याचा उपयोग केला तरी वेळ आल्यावर सावकार मात्र त्यावर जप्ती आणू शकत नाही एवढेच नव्हे तर कुटूंबातील व्यक्तींसाठी दुर्दशावस्थेत त्या स्त्रीधनाचा उपयोग पतीने केला तरी त्या व्यक्तींना तशा परीस्थीतीत तसा उपयोग करण्याचा अधिकार नाही. तो फक्त पतीलाच आहे

पत्नीने पतीला स्त्रीधन द्यावे असा वेदातही उल्लेख सापडतो.

'जाया पति वहति कनुना समूत्पुंस इन्द्रद्रो वहतुः परिष्कृतः ।

वैवाहिकं स्त्रीधनं भर्तुरपि भोग्यम् ।– वेद (q. in धर्मकोषः व्यवहारकांड P. 1423).

या सर्व मतांवरून असे लक्षात येते की पुरुष हाच द्रव्यवंत असतो म्हणजे धनवान असतो. स्त्रीचे धन मालकीचे असूनही ती 'अद्रव्यत्वम्' म्हणजे निर्धन असते. हे निर्धनत्व 'धनाच्या क्रय विक्रया बाबतीतलेच असते' म्हणजे सर्वार्थाने ती 'धनवान' असतेच. (द्रव्यवत्वात्तु पुंसां स्याद्द्रव्यसंयुक्तं, क्रयविक्रयाभ्यामद्रव्यत्वं स्त्रीणां – जैमिनीसूत्रम्).

या सर्व लेखाचे सार आपल्याला एका वाक्यात सांगता यईल– 'धनप्रयोगे स्त्रीणामनाधिकारः पत्युरेव तदधिकारात् ।' स वि ३८१.

एक गोष्ट आणखी महत्वाची आहे ती म्हणजे 'पतीचा पत्नीच्या धनावरील अधिकार' या विषयावरील एक कायदा, एक नियम म्हणून बंगाल व बनारस इ व्यतिरिक्त इतर संप्रदायांनी (schools) याज्ञवल्क्य, देवल व कात्यायन यांचे भाष्य प्रमाणभूत म्हणून मान्य केलेला आहे. (Marriage and stridhand. Mr. Banerjee)

● ●

(पान १३६ वरून)

लक्षात येतं, नाहीतर मीच स्वतःची समजूत काढतो– लोकांना कुठं माहीत कुणी तिकीट काढलय ?'

कधीकधी ती मैत्रिणीला बसला पैसे देऊन कटवते तेव्हा तिच्या मैत्रिणीपेक्षा मलाच चोरट्यासारखं वाटतं, बिचारीला माझ्यासमोर पैसे दिले. आणि परत आठवतं की माझा मित्र त्याच्या अपॉईंटमेंटच्या वेळेस असाच मला कटवायचा; आणि मग मनाला थोडंसं बरं वाटतं. चला ही जाणीव आणि ही जाणीव हा कॉमनफॅक्टर; बीजगणितात काढतात तसा. चला तेवढीच एक जाणीव कटाप.

माझ्या वाढदिवसाला पँटपीस देण्याचा विचार ती बोलून दाखवते आणि माझं संकोची मन दुखावतं. कदाचित् माझी अल्टर केलेली पँट हीनं पाहिली तर नसेल ना ? परत महिनाभर मी गायब. ती चिठ्ठ्या पाठवते, निरोप धाडते. गेली २ वर्षं तिचा आग्रह चाललाय– वीटभर चिठ्ठी लिही, नुसताच भेटू नकोस. माझं ठराविक उत्तर– 'अगं मला पत्र लिहायला नाही जमत. शिवाय खोटी गोडगोड पत्रं लिहायला नाही आवडत मला' ती हिरमुसली होते.

मनात येतं पूर्वीची ती मुद्दामच लहरी वागायची का म्हणजे सध्या मी वागतोय तसा? तसं असेल तर माझी मला दया, दया म्हणण्यापेक्षा कीव आली पाहिजे. आपापली वर्तुळं छोटी असली म्हणजे बरं असतं नाही ?

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त

१६ जुलै १९७५ ते १५ सप्टेंबर १९७५

गो. स. देहाडराय,
सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन :

१.१ दि. २७–७ ला सकाळी कार्यकारी मंडळाची सभा झाली.

१.२ दि. २७–७ ला दुपारी ४ वाजता वार्षिक साधारण सभा झाली.

२. सांस्कृतिक कार्यक्रम

२.१ दि. ३१–७ ला नाशिकचे सुप्रसिद्ध साहित्यिक व विनोदी लेखक डॉ. अ. वा. वर्टी यांचे 'शब्दसृष्टीचे ईश्वर' या विषयावर भाषण झाले.

२.२ दि. १ ऑगस्टला लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

२.३ दि. १३ ऑगस्ट हा कै. प्र. के. अत्रे यांचा जन्मदिन. त्याच दिवशी वि. सा. संघाचे एक कार्यकर्ते श्री. मधुकरराव राजे यांनी एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण केल्यावद्दल त्यांचे हस्ते अत्रे यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण केली. श्री. मधुकरराव राजे यांचे बरोबर श्री. गो. स. देहाडराय यांचाही ६३ वा वाढ दिवस त्याचदिवशी असल्यामुळे या दोघांचाही पुष्पहार घालून श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी सन्मान केला.

२.४ **वेहेरे व्याख्यानमाला:–** यंदाची कै. वेहेरे व्याख्यानमाला दि. १६, १७ व १८ आगस्ट या दिवशी गडकरी सभागृहात साजरी झाली. या प्रसंगी मुंबई एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे मराठीचे सेवानिवृत्त प्राध्यापक आणि आता मराठी संशोधन मंडळाचे संचालक प्रा. म. वा. धोंड यांची 'मराठी लावणी.' 'कलगीतुरा' व 'लावणी, पोवाडा आणि कीर्तन' या विषयावर तीन व्याख्याने झाली. सर्वप्रथम संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे उपाख्य कवि अनिल यांनी वेहेरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला आणि प्रा. धोंड यांचे स्वागत केले. रसिक वर्ग फार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

२.५ **श्री ज्ञानेश्वर सप्तमशताब्दि:–** या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला समर्पित करण्यात आली आणि श्री शिवाजी संदर्भ अभ्यासक मंडळाच्या विद्यार्थीनींनी ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांचे पठन केले.

२.६ **श्री गणेश व्याख्यान माला:–** यंदाची ही व्याख्यान माला दि. ३० व ३१ आगस्ट या दोन दिवशी सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक व पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्रमुख, डॉ. विनायक रामचंद्र करंदीकर यांनी गुंफली. त्यांचे विषय होते. (१) वामन पंडित व्यक्ति आणि वाङमय व (२) वामन पंडित कवि आणि तत्वज्ञ. दोन्हीही व्याख्यानांना रसिक वर्ग फार मोठ्या संख्येने उपस्थित होता. कविवर्य नारायण मुरलीधर गुप्ते 'बी' यांचा स्मृतिदिन दि. ३० आगस्टला येत असल्यामुळे व्याख्यान मालेचे पहिले पुष्प गुंफण्यापूर्वी व्याख्याते डॉ. करंदीकर यांनी कविवर्य 'बी' यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण केली. डॉ. करंदीकर यांनी तिसरे व्याख्यान आकोला येथे तेथील वि सा. संघ शाखेच्या विद्यमाने दि. १ सप्टेंबराला 'वामन पंडित–गीतेचे भाष्यकार' या विषयावर दिले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

३. अभिनंदन

३.१ कन्हाड येथील आयोजित ५१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखिका कु. दुर्गा भागवत यांची निवड झाली. वि. सा. संघातर्फे त्यांना अभिनंदनपर तार पाठविण्यात आली.

४. दोन मान्यवर साहित्यिक श्रेष्ठींचा अमृतमहोत्सव.

४.१ मराठी काव्यात मुक्त छंदाचे प्रथम प्रवर्तन करणारे, अनिल या कवि नावाने विख्यात असलेले श्री. आत्माराम रावजी देशपांडे यांनी दि. ११ सप्टेंबरला पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त दि. ११ सप्टेंबरला सायंकाळी ६–३० वाजता गडकरी सभागृहात अनिल सत्कार समितीने त्यांचा अमृत महोत्सव साजरा केला. व्यासपीठाची पार्श्वभूमी अत्यंत कलापूर्ण सजविली होती. या समारंभात नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दे. य. गोहोकर यांच्या हस्ते श्री. आप्पासाहेब देशपांडे (कवि अनिल) यांना शाल व श्रीफल अर्पण करून त्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. वि. भि उपाध्य भाऊसाहेब कोलते यांनी आप्पासाहेबांच्या काव्यकर्तृत्वाचे आणि प्रा. वा. कृ. चोरघडे यांनी त्यांच्या कलंदर व्यक्तिमत्वाचे वर्णन रोचक शब्दात केले. "कवी किंवा साहित्यिक म्हणून मी लिहिलं नाही. कविता लिहावयास निवांत वेळ मिळत होता तो आगगाडीतून प्रवास करताना. त्या सर्व कविता प्रवासात असताना लिहिल्या. कोणतेच नियम न पाळता मी इतका जगलो कसा ? मला वाटतं मी शंभर वर्षे सहज जगेन", अशा हृद्य शब्दात श्री. आप्पासाहेब देशपांडे यांनी सत्काराला उत्तर दिले.

सर्व प्रथम श्री. त्रि. गो. देशमुख यांनी प्रास्ताविक भाषण केले. नंतर वि. सा. संघाच्या सत्कार समिती व्यतिरिक्त रंजनकलामंदिर, स्वरसाधना, माग्रस, परिमल प्रकाशन, राजाराम वाचनालय वर्धा, भारतीय भाषा अध्ययन मंदिर, साई समाज, प्रगती आर्ट आदि संस्थानी व डॉ. श्री. ज. जोशी यांनी व्यक्तिशः आप्पासाहेबांचा पुष्पहाराने सत्कार केला. यावेळी गडकरी सभागृह साहित्यिक, रसिक व चहाते मित्रांनी अक्षरशः फुलून गेले होते.

४.२ महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, ग्रंथकार आणि थोर विचारवंत तर्कतीर्थ श्री लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त संघाने दि. १४ सप्टेंबरला सायंकाळी ६–३० वाजता धनवटे रंगमंदिरात डॉ. भवानी शंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार समारंभ संपन्न केला. "बौद्धिक आणि सामाजिक विषयात नवविचार प्रवर्तन कार्य करणारे तर्कतीर्थ श्री लक्ष्मण शास्त्री हे महापंडित आहेत. ज्ञान साधनात भर घालीत असताना त्यांनी एकापेक्षा एक सरस ग्रंथनिर्मिती केली आणि बुद्धिवादाचा निकष लावून ते विचार त्यांनी जनतेसमोर सादर केले. प्रागतिक विचारसरणीसाठी लोकांना त्यांनी उद्युक्त केले "अशा आशयाचे गौरवपर उद्गार अनेक मान्यवर वक्त्यांनी आपल्या भाषणात काढले. त्यात डॉ. भवानीशंकर नियोगी, डॉ. वि. भि. उपाध्य भाऊसाहेब कोलते, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, डॉ. ना. र. देशपांडे, डॉ. श्री. भा. वर्णेकर व डॉ. प्रभा हातवळणे ही प्रमुख मंडळी होती. सर्वप्रथम अध्यक्ष डॉ. भवानी शंकर नियोगी यांचे हस्ते तर्कतीर्थ जोशी यांना खादीचे वस्त्र, श्रीफल व पुष्पहार अर्पण करून वि. सा. संघाने त्यांचा सत्कार केला. वयोवृद्ध ज्योतिष पंडित श्री पेंडके शास्त्री यांनीही त्यांना शाल व श्रीफल अर्पण करून त्यांचा यथोचित सत्कार केला. तसेच अनेक संस्थानी तर्कतीर्थांना पुष्पहार अर्पण केले.

संघाचे उपाध्यक्ष श्री. त्रि. गो. देशमुख यांनी वरील दोन्ही सत्कार समारंभाचे संचालन केले व शेवटी आभार मानले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

५. माननीयांच्या भेटी

५.१ दि. १६–७ ला ख्यातनाम साहित्यिक व समीक्षक श्री. गं. वा. सरदार यांनी संघाला भेट दिली.

५.२ दि. १५–९ ला सर्वश्री डॉ. दाभोळकर (पुणे विद्यापीठ), शंकरराव खरात (मराठवाडा विद्यापीठ); डॉ. माधुरीबेन शहा (एस्. एन. डी. टी.), बॅ. पाटील (शिवाजी विद्यापीठ), प्रो. टोपे (मुंबई विद्यापीठ) व डॉ. दे. य. गोहोकर (नागपूर विद्यापीठ) या महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या कुलगुरुंनी संघाला भेट दिली. त्यांना संघाच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून देण्यात आला.

६. शाखा वृत्त

६.१ **यवतमाळः–**

६.२ प्राचार्य राम शेवाळकर यांचे चाणक्याच्या दशसूत्रावर दि. ५–७ ला व्याख्यान झाले.

६.२ कीर्तन केसरी श्री. भाऊसाहेब शेवाळकर यांची नरसी मेहता, पुरंदर विठ्ठल व एकनाथ या आख्याना वरील सुश्राव्य कीर्तने दि. ६, ७ व ८ जुलैला झाली. श्री. महादेव उईके यांनी तबल्याची व श्री. राजाभाऊ पांडे यांनी पेटीची साथ केली.

६.४ श्री. भाऊसाहेब शेवाळकरांच्या अमृत महोत्सवाप्रीत्यर्थ शाखेच्या वतीने श्री. ग. म. पुंडशास्त्री यांनी श्री. भाऊसाहेबांना शाल व श्रीफल अर्पण करून त्यांचा सत्कार केला. श्री. भाऊ साहेबांच्या गुणगौरवपर श्री. व. ना. एकबोटे यांचे भाषण झाले.

या सर्व कार्यक्रमांना श्री दत्तमंदिर संस्थान व श्री. रुक्मिणी पांडुरंग संस्थान यांचे सहकार्य मिळाले.

६.५ **वणी**

६.६ दि. २०–७ ला श्रीकृष्ण भुवनमध्ये वार्षिक सभा होऊन त्यात ७५–७६ या वर्षाकरिता खालील कार्यकारिणी निवडून आली.

अध्यक्ष–श्री. न. रा. भागवत, उपाध्यक्ष–श्री. माधव सरपटवार व सौ. नंदाताई दामले, सरचिटणीस–श्री. वामन ठाकरे, कार्यवाह–सर्वश्री. ना. ब. कावडकर, पु. भा. रेभे, सभासद–प्राचार्य शेवाळकर, प्रा. कवडे, म. ना. राजूरकर, के. ना. काटपाताळ, ना. मा. सरपटवार, डॉ. राजकोंडावार, भय्याजी ढुमे, प्रा. माधमशेट्टीवार, प्रा. र. वा. देशपांडे, बापूसाहेब दामले, वा. झा. कांबळे, गोलेलवार गुरुजी, रा. गि. घुमे, अ. स. ढुमणे, सौ. विमलाताई पाटील.

६ ७ **दारव्हा**

६.८ २७–७ ला भरलेल्या वार्षिक साधारण सभेत खालील कार्यकारिणी निवडून आली

अध्यक्ष–श्री. शं. गु. कणीकर, उपाध्यक्ष श्री. शं. वा. खानझोडे, कार्यवाह–श्री. म. शा. वल्लाळ, सदस्य–सर्वश्री. वि. रा. पिंपळखरे, ह. प्र. सेता, सौ. निर्मला महात्मे व श्री नीलकृष्ण देशपांडे (केंद्रीय का. का. मंडळाचे या विभागातील पदसिद्ध सदस्य)

६.९ इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी [Yugwani] Regd. No. 1174 MH

चोखंदळ रसिकांसाठी....

दोन संग्राह्य दिवाळी अंक

मौज

गेल्या वर्षीचे 'अनंत अंतरकर पारितोषिक'

१९७२ च्या वार्षिकांमध्ये उत्तम मुद्रणाचे भारत सरकारचे प्रशस्तिपत्र

सत्यकथा

आजची कथा आणि काव्य यांचे प्रतिनिधिक दर्शन

मर्यादित प्रती. आपले अंक विक्रेत्याकडे राखून ठेवा.

पुस्तके आणि नियतकालिके यांच्यासाठी जाहिरातीचे सवलतीचे दर

मौज-सत्यकथा संयुक्त जाहिरातदारासाठी खास, आकर्षक सवलत.

जाहिरात-दर-पत्रकासाठी कार्ड टाका.

मौज प्रकाशन गृह

खटाववाडी, मुंबई ४०० ००४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ